संगीत संशय

गजानन

31/3/1929

श्री

संगीत शेकस्पीयर नाट्यरत्नमाला.

वर्ष १ लें. त्रैमासिक पुस्तक. पुस्तक १ लें.

जानेवारी, फेब्रुवारी, मार्च.

संगीत संशयसंभ्रम नाटक.

हे.

महाकवि शेक्स्पीयरकृत

कुइंटर्सेटेल—या पुस्तकाच्या आधारें.

गजानन चिंतामण देव.

यांनीं रचिलें.

तें मालका करितां.

रामचंद्र विनायक चितळे

बुकसेलर मुंबई, गिरगांव आर्यसमाज चाळ.

यांनीं छापवून प्रसिद्ध केलें.

सन १८९५.

किंमत १ रुपया.

आवृत्ती पहिली.

पुणें येथें.

श्रीविठ्ठल छापखान्यांत छापिली.

संगीत शेक्सपीयर नाट्यरत्नमाला.

अत्यंत मनोहर त्रैमासिक पुस्तक.

सदर्ह् महाकवीचीं नाटकें किती उत्तम आहेत त्याची आम्ही शिफारस करावयास नकोच आहे. त्यांची मराठींत भाषांतरें अनेक विद्वानांनीं केलीं असून तीं लोकमान्य झालीं आहेत. ती संगीतांत आणलीं असतां हल्लीं नाटक मंडळ्या रंगभूमीवर संस्कृत नाटकाच्या आधारानें व ग्रंथकर्त्यांनीं स्वकल्पनेनें रच-लेलीं जीं नाटकें करतात, तींत शृंगारादि नवरसांचा किंचित फेरफार करून दाखवलेला एकच प्रकार सर्वत्र आढळून येत असल्यामुळें प्रेक्षकांस वीट येतो तर निरनिराळ्या प्रकारची या महाकवींचीं नाटकें पाहिल्यानें तो नाहींसा होईल. व करमणूक आणि ज्ञान प्राप्त करून घेण्याचें नवीन साधन वाचकास प्राप्त होईल या हेतूनें ही आम्ही संगीतांत आणण्याचा प्रयत्न आरं-भला आहे. हीं नाटकें निव्वळ भाषांतर न करितां आपल्या रितीभातीस योग्य दिसतील व रंगभूमीवर उत्तम वठतील अशा प्रकारानें आम्ही करीत आहोंत. तथापि शेक्स्पीयरचें बुद्धिकौशल्य, संविधानक मनोहरता, पात्रांच्या भाषणांतील

मार्मिकपणा; यांस किंचितही धक्का न लागूं देण्याविषयीं आम्ही होईल तितकी खबरदारी घेतली आहे.

इतर मासिक पुस्तकाप्रमाणें यांत निरनिराळीं नाटकें न घालतां तीन महिन्यांनीं एक संपूर्ण नाटक वाचकांस देण्याची योजना केली आहे. नाटक उत्तम जाड घोटीव कागदावर सुंदर टाइपानें छापलें जाऊन वर सोनेरी बांधणी अति मनोहर करण्यांत येईल व सांचाही खिशांत मावण्याजोगा संगीत शाकुंतलप्रमाणें डेमी १६ पेजी धरला जाईल. या आमच्या प्रयत्नांस नाटक मंडळ्याकडून व इतर रसिकजनांकडून पूर्ण आश्रय मिळेल अशी आशा आहे प्रत्येक नाटकाची किंमत आगाऊ ॥≈ पासून १ रुपया पडेल. पुस्तक व्हीपीनें पाठवूं. व्हीपीनें ०।॥० पडतील. आगाऊ किंमतीनें मागीलपुस्तक मिळणार नाहीं.

रामचंद्र विनायक चितळे.	गजानन चिंतामण देव-
मुंबई गिरगांव आर्यसमाज चाळ.	पुणें पेठ बुधवार लायब्ररी.

संगीत संशय संभ्रम नाटकाची प्रस्तावना.

———:o:———

महाकवी शेक्स्पीयरकृत वुइंटर्सटेल या नाटकाचें आधारें हे मी यथामती संगीतात रचिलें आहे. सदरहू नाटकाचें संविधानक अगदीं साधें असून अत्यंत मनोहर आहे. आपल्या संस्कृत नाटकांतील सविधानकाच्याच धर्तीवर कवीनें पुष्कळअंशीं याची योजना केली आहे. आतां हें मजकडून कितपत उठलें आहे याची परीक्षा करण्याचें काम मी विद्वज्जनावरच सोपवितो.

या नाटकाचें मूळ मराठींत भाषांतर रावबहादूर विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. यांनीं केलें असून त्याचाच मला फार उपयोग झाला असल्याने सदरहू भाषांतरकर्त्याचा मी अत्यंत आभारी आहे.

गजानन चिंतामण देव.
पुस्तककर्ता.

समर्पण.

बळवंत पांडुरंग उर्फ अण्णासाहेब किर्लोस्कर यांस

हें संगीत संशयसंभ्रम नाटक ग्रंथकर्त्यानें अति नम्रतापुरःसर अर्पण केलें असें.

ग्रंथकर्ता.

सूचना—सदरहु नाटकाचा प्रयोग ज्या नाटकमंडळीस करणें असेल तिनें आह्मास विचारावें ह्मणजें आह्मी त्याचा योग्य विचार करूं.

गजानन चिंतामण देव.
रामचंद्र विनायक चितळे.

या नाटकावर अभिप्राय.

रा० गजानन चिंतामण देव यांनीं चालू साला पासून आरंभलेल्या संगीत शेक्स्पीयर नाट्यरत्नमाला या त्रैमासिकांतील पहिलें पुस्तक संगीत संशयसंभ्रमनाटक आह्मी सर्व वाचून पाहिलें. हें त्या कवीच्या वुइंटर्सटेल या नाटकाच्या आधारें केलें आहे मूळातील बहुतेक गुण या पुस्तकांत उतरले असून किर्लोस्कर-सारख्या संगीत मंडळी कडून याचा प्रयोग रंगभूमीवर झाल्यास तो लोक मान्य होईल अशी आमची खात्री आहे. संविधानकांतील कांहीं गोष्टी संबंधानें मुळांत व यांत जो फरक आढळून येतो तो आपल्या देशांतील पद्धतीला जुळविण्याच्याच उद्देशानें केलेला आहे व तो इकडील वाचकांस अमान्य होणार नाहीं अशी आमची खात्री आहे.

पुणें.
ता. १।४।९५.

डाक्तर गणेश कृष्ण गर्दे.
एल् एम् ॲण्ड एस्

संगीत

संशय संभ्रम नाटक.

अंक पहिला.

नान्दी—

पद—चाल. हें वंदन मम हीं.

वंदुनि आधीं जगदीशाला ॥ मग वंदिन गणपति-
चरणाला॥ धृ० ॥ शेक्स्पीयर कविशिरोमणीची ॥
नाटककृति अति रमणियसाची ॥ संगीतामधिं
आणायाची ॥ इच्छा ही मम होवो सफ़ला ॥ १ ॥

पद—चाल. होईल कलहही.

श्रीहरि तुह्मां सकलां ॥ सुखकर होवो सभाजना-
लां ॥ धृ० ॥ यन्मुख कमलासम भासतसें ॥ भा-
र्या कमला पद सेवितसे ॥ नाभींतुनि उद्भवला ॥
कमलासन सुत शोभवि त्याला ॥१॥ शेषावरि जो
करि शयनाला ॥ सुपर्ण सेवक सन्मुख बसला ॥
तत्गुण वर्णायाला ॥ सुरमुनिगण तो सारा
आला ॥ २ ॥

(पारिपार्श्वक जातात.)

सूत्रधार—

साकी ॥

महा भयंकर पापरूप हा भवसमुद्र तरण्याला ॥
यन्नामाचा घोष सेतु कीं तत् भक्तांसी झाला ॥
तो शिव तुह्मांला ॥ देवो सांप्रत अभयाला ॥ १ ॥

प्रेमपुरःसर परमेश्वराचें स्तवन इतकेंच पुरें. आतां नाटका-

स आरंभ करावा. (पडद्याकडे पाहून) मारिषा, नेपथ्यांतील सर्व काम आटपलें असेल तर घटकाभर इकडे ये बरें.

(तदनंतर नट प्र. क.)

नट--महाराज, सर्व तयारी आहे. पण आज या सभाजनानां आपण कोणतें नाटक करून दाखविणार ?

सूत्रधार--ऐक--

साकी.

प्राचीनार्वाचिन भारतकविकृतिची गोडी सारी ॥ घेउनि जनहें उत्सुक झाले बघण्या नवकृति दुसरी ॥ इच्छा ही त्यांची ॥ आपण पूर्ण करू साची ॥ १ ॥

नट--पण ती आपणाकडून कशी पूर्ण होणार ?

सूत्रधार--पहा--

साकी.

इंग्लंदांतिल शेक्स्पीयर कवि त्याच्या एका

कृतिची ॥ प्रतिकृति केली संगितसंशयसंभ्रम या नांवाची ॥ दावुनि ती आतां ॥ सुखवूं सुजनांच्या चित्ता ॥ १ ॥

तर नाटक पात्रांसंबंधानें आज जितकी चांगली तयारी ठेववेल तितकी ठेवण्याविषयीं तूं खबरदारी घे.

नट—तें सर्व होईल. पण, आजच्या नाटकांतील कथाभाग आपल्या पुराणांतील किंवा इतिहासांतील नसल्यामुळें तो सर्वांस अपरिचित आहे, यासाठीं तो संक्षेपें करून कळला असतां त्याप्रमाणें आपली तयारी ठेवण्यास नाटकपात्रांस ठकि पडेल.

सूत्रधार—तूं ह्मणतोंस तें बरोबर आहे. आजच्या नाटकांतील कथानक संक्षेपेंकरून कळलें असतां सभाजनानांही तें पूर्ण अवलोकन करण्याविषयीं जिज्ञासा उत्पन्न होईल. ऐकतर—

पद. चाल. पंचतुंड नर ही

दिलीप मथुरापतिला त्याचा स्नेही आला भेटाया ॥ कांहीं दिन तत् गृहिं राहुनि तो निरोप

मार्गे मग आया ॥ त्या रहावया नृप आग्रह करि बहु परंतु तो राहीना ॥ शेवटिं त्या राहवुनी घेई राणी त्याची सुदक्षिणा ॥ पण यायोगें संशय असता तिजविषयीं तन्मनिं आला ॥ दुःख भयंकर मग भोगाया त्यानें लावियलें तिजला ॥ १ ॥

हाच या नाटकांतील कथानकाचा प्रधान भाग आहे; व तो या सभाजनानां मी दाखविण्याचे योजिलें आहे.

नट—ठीक आहे. या नाटकानें तर सर्व लोकांस एक नवीनच करमणुकीचें साधन होईल असें मला वाटतें. असो. आतां मी आपल्या कार्यास लागतों. (जातो.)

सूत्रधार—आतां सर्व रसिक जनांस माझी हात जोडून इतकीच विनंती आहे कीं—

दिंडी.

असे प्रतिकृतिचा मत्प्रयत्न पाहिला ॥ यांत जितके

दिसतील आपुणालां ॥ दोष घडले ममकरें सर्व साचे ॥ गुणचि जाणा त्या कविशिरोमणीचे ॥ १ ॥

(असें ह्मणून निघून जातो)

हीं प्रस्तावना झाली.

प्रवेश १ ला. स्थळ. मथुरानगरी. राजवाडा.

(राजा दिलीप. त्याची स्त्री सुदक्षिणा पुत्र रघु व मित्र राजा भद्रसेन प्र. क.)

दिलीप—(स्वगत)

पद. चाल. लाल झाली ही.

दैववान मी एक असे कीं वाटे मध्यमलोकीं या ॥
बहु दिवसांनीं बालपणींचा स्नेही ये मज भेटाया॥
स्वागत याचें किति केलें तरि पुरें न होई मम-

चित्ता ॥ तत्संगतिचा सर्व काल तो झाला अति-
शय सुखदाता ॥ १ ॥

आतां, आज हा परत आपल्या नगरांत जाण्याविषयीं मज-पाशीं निरोप मागत आहे, पण आणखी कांहीं दिवस तरी याला सोडावेसें मला वाटत नाहीं. कारण—

साकी.

प्रियमित्राहुनि प्रिय याभुवनीं नाहीं दुसरें कोणी।
इहलोकीं तत्संगति आहे सर्व सुखांची खाणी ॥
मिळतां सुकृतानें ॥ नच दवडावी मनुजानें ॥ १ ॥

भद्रसेन—कां दादा, विचार कसला करितां ? आमच्या ह्मणण्याकडें आपलें लक्ष्यच गेलें नांहीं वाटतें ?

दिलीप—लक्ष गेलें, पण आपणांस जाण्याला निरोप द्यावा असें मला वाटत नाहीं.

भद्रसेन—तें कांहीं नाहीं; येथें मला आणखी रहाण्याला मुळींच सवड करितां येत नाहीं. पहा—

पद. चाल. वीरशिरोमणी ही.

बहु दिन झाले असती मजला सोडुनिया निजपुरी ॥ गेलें पाहीजे लौकरी ॥ राज्यभार मम मजविण कोणि न समर्थ घेण्या शिरीं ॥ कार्यें उरलीं तीं किति तरी ॥ चाल ॥ द्या निरोप तुह्मी जाणुनि हें अंतरी ॥ मी आहे येथें मन्मन तेथें तरी ॥ चाल ॥ स्वागत माझें केलें ह्मणुनी ऋणि झालों बहुपरी ॥ ठेवा लोभ पुढें यापरी ॥ १ ॥

मग कसें काय ? आतां आह्मी जावेंनां ?

दिलीप—नाहीं बुवा; आपण इतक्यांतच कांहीं जाऊं देत नाहीं. एक आठवडा तरी आणखी लोटला पाहिजे. मग पाहिजेतर जा.

भद्रसेन—छेहो, मला गेलेंच पाहिजे. तुमच्या घरीं थोडेंकां दिवस राहिलों ? तुह्मांला कितितरी त्रास द्यावा ?

दिलीप—पण येथें त्रास होतो आहे कोणाला ?

भद्रसेन—हे पहा, दादा, तुम्ही आतां नका मला उगीच रहाण्याचा आग्रह करूं मी आपला उद्यां जाणारच. पहा—

साकी.

राज्यामधिं मी नसतां त्यावरि विघ्न काय येइल तें ॥ नकळे येथें राहुनि योजुनि उपायही नच टळतें ॥ 'हो' तव शद्वाला ॥ ह्मणुनी वद्वे नच मजला ॥ १ ॥

दिलीप—(राणीस) पाहिलेंस कां ? आह्मी आपणांकडून ह्यावें तें केलें पण तुझे भाउजी कांहीं आपला हट्ट सोडीत नांहींत. आतां तुझ्याकडूनच कांहीं होइल तर पहा.

सुदक्षिणा—पण, इतक्यांतच मला काय ह्मणून सांगावयाचं. भाउजींनीं मी जाणारच अशी शपथ घेतली ह्मणजे मग त्यानां राहण्याविषयीं मजकडून आग्रह करवावा. मला माहित आहे ते कां जाण्याची ओढ घेतात तें. वरून दाखवायाला मात्र राजकारण कायतें; पण मनांतलें निराळेंच आहे.

दिलीप—तें कोणतें ?

सुदक्षिणा—कोणतें ह्मणजे ? हे येथें एकटेच आले; बाई आणि माधव सुवर्णपुरांत आहेत. तेव्हां सगळा जीव त्यांच्या कडे लागला आहे. कां भाउजी खरेंनां ?

भद्रसेन--तुह्मी आपलें कांहीं तरी ह्मणतां. मला तसेंच काम असल्यावांचून मी कधीं तुमचा शद्ब मोडणार नाहीं.

सुदक्षिणा—कांहीं असो. भाउजी, पण तुह्मी आठवडाभर रहाच. आणखी सांगतें, इकडचें तिकडें येणें झालें ह्मणजे तुह्मी त्यानां पाहिजे तर महिनाभर ठेऊन घ्या. त्याबद्दल मी तुमच्यावर मुळीं रागावणार नाहीं. राहतानां मग ?

भद्रसेन—छेहो, वहिनी, मी उद्यां खचित जाणार.

सुदक्षिणा—खचित जाणार ह्मणजे ? मीही तुह्माला खचित जाऊं द्यायाची नाहीं. भाउजी, तुह्मी आपण होऊन येथें आलां पण परत जाण्याचें तुमच्या स्वाधिन नाहीं, बरें कां? मग सांगातर; खुषीनें रहाणार कां नाखुषीनें रहाणार ? कसेंही तुह्मांला मी रहावयाला लावणारच.

भद्रसेन—रहावयाला लावणारच मग खुषीनें कां न राहिलें? नाखुषीनें राहून तुमचें मनच दुखवावयाचें कीं नाहीं ? राहिलों आतां झालेनां ? दादांची व तुमची मर्जी आतां जागार नाही नां ?

सुदक्षिणा—(पतीस) ऐकलेंतनां ? भाउजी आतां रहायाला कबूल झाले.

दिलीप—(स्वगत) अरे, हें काय आश्चर्य !--

दिंडी.

यास आग्रह मी कितीतरी केला ॥ हा तयार न तरि होय रहायाला ॥ प्रियेनें मग या कसें राहवीलें ॥ सूत दोघांचें काय असें नकळे ॥ १ ॥

भद्रसेन—दादा, आतां तर झालीनां मर्जी सुप्रसन्न ? (राणीस) वहिनी, तुम्हांला काय सांगूं दादा आणि मी लहान होतो त्या वेळीं—

पद. चाल. टाकिला यानें ही.

नानापरिच्या क्रीडा दोघांनीं ॥ केल्या असती दिन रजनीं ॥ काळजि नव्हती राज्याची स्वमनीं॥ वाढलोंचि खेळुनि हंसुनीं ॥ परस्परासी स्वप्राणाहूनी ॥ सुखवीलें प्रेमचि करुनी ॥

परि सांप्रत तें कथ गेलें ह्मणुनी ॥ दुःख होय मजलागोनी ॥ १ ॥

(दिलीपास) दादा, तुह्मांला पण असेंच वाटत असेल नाहीं ?

दिलीप—(स्वगत) आज तुझें अंतःस्वरूप कळेंपर्यंत मला तसें वाटलें खरें. (उघड) आपण ह्मणतां तें खरें आहे. (राणीस) प्रिये, तुझ्या भाषणानें ज्यापेक्षां यांचें मन वळलें त्यापेक्षां आज तूं तें फारच मनोहर केलेंस.

सुदक्षिणा—मला उगीच चढवायाला नकों. मी आजच मनोहर भाषण केलें ह्मणजे ? यापूर्वी कधीं केलें नव्हतें वाटतें ?

दिलीप—होय एकवेळ केलें होतेंस खरें. पहा—

पद. चाल. सुदाक्षिणापति ही.

स्वयंवरास्तव तव जनकाच्या मंदिरिं नानाविध नृप से ॥ येउनि त्यांनीं त्वन्मन हरण्या प्रयत्न केले किति होते ॥ परि तूं वदलिस दिलिपाविण मी नच कधिं वरिनाचि अन्याला ॥ हें भाषण तरि ऐकुनि सखये प्रसंग तो मज आठवला ॥ १ ॥

सुदक्षिणा—एकून तो आणि आजचा प्रसंग आपणांस सारखाच वाटतो कां ? बरें तसें कां ह्मणानां ? त्याविषयीं उगीच वाद कशाला पाहिजे.

दिलीप--(स्वगत) छे छे; हें कांहीं ठीक नाहीं; अति स्नेह झाला ह्मणजे भलभलते तर्क मनांत येतात. पद्य—

पद. चाल. शैवालें युक्त ही.

आजवरी चंद्रिकेसम मन्नयनां वाटली ॥ ती भार्या आज त्यांमधिं कशि सलुनी राहिली ॥ या ईच्या वर्तनानें मन्मन हें क्षोभलें ॥ करणें तें काय आतां मुळिं त्यासी नाकळें ॥ १ ॥

अरे पण मला वाटतें तशीच ही पापबुद्धि असेल कशावरून ? गोडभाषण करणें हें एक आदरसत्काराचें चिन्ह आहे. पण छे; त्याला कांहीं मर्यादा आहे–

अंजनीगीत.

परस्परांनीं जवळी बसुनी ॥ सुखवावे त्या कटाक्ष

दिंडी.

अनावरही अस्थीर फार पाही ॥ इचा कळुनी-
नच तो प्रभाव येई ॥ कधीं संभव ज्या मुळिं न
घडायाते ॥ अशा घडवी ही पुरुषसंगमाते ॥ १ ॥

भद्रसेन—दादांचें मन एकाएकीं असें अस्वस्थ झालेलें कां बरें दिसतें ?

सुदक्षिणा—खरंच. कोण जाणं बाई काय झालं तें ?

भद्रसेन—दादा, आमच्याशीं बोलावयाचें सोडून आपल्या मनाशींच कसलें चिंतन करितां ?

दिलीप—कांहीं नाहीं. या रघूला पाहून मी याच्या वयाचा होतो त्या वेळची मला स्मृति झाली. त्यावेळीं—

साकी.

या रघुसम कीं मीही निजशिरिं लघु किरीट
घालुनिया ॥ लहान धनु करिं धरुनी होतो करि-
तचि लटको मृगया ॥ बघुनी मत्कृतिला ॥ सुख
होई बहु जनकाला ॥ १ ॥

मारुनि ॥ हंसवावें कीं आपग हंसुनी ॥ आदर हा कुठला ॥ १ ॥

हा प्रकार तर आपणांस कधींच पसंत पडणार नाहीं. (पुत्राकडे वघून) बाळा, रघु, तूं कोणाचारे ?

रघु-- मी तुमचा. पण बाबा--

पद. चाल. त्या माझ्या मयुराला ही.

विचारतां काय असें ॥ ताता ॥ अवचित तुमच्या वदनावरची प्रसन्नता कां लोपतसे ॥ धृ० ॥ टक लावुनिया मजला बघुनी ॥ विचार कसला क- रितां स्वमनीं ॥ संशययुत वच वदतां मधुनी ॥ दुःखित तुमचें मन भासतसें ॥ १ ॥

दिलीप--(स्वगत) खरोखर हा माझाच आहे. याचा तोंडवळा अगदीं मजसारखा आहे. (उघड) कांहीं नाहीं; बाळा, आपण खेळूं. (स्वगत) पण ही तुझी आई आजपर्यंत कितीतरी खेळ खेळली असेल ? तुजप्रमाणेंच ही माझी असेल कां ? न जाणो; असेलही. पण नाहीं; मला प्रतीमुळें असें वा- टतें. अरेरे ! ही प्रीती मोठी वाईट आहे.--

बाळा, रघु, तुझ्या हातातलें हे कडें कोणी काढून घेऊं लागला तर तूं काय करशील रे ?

रघु—काय करीन ह्मणजे ?—

पद. चाल. काय मला भूल ही.

घेउनिया ही माझी धनुकली करीं॥ जोडुनिया मग तिजला बाण सत्वरी ॥ जाइन मी करुनी-या चाल त्यावरी ॥ पाडिन कीं भूवरतीं त्या खरोखरी ॥ १ ॥

दिलीप—हं; एकूण तूं त्याशीं लढाई करशील तर. कां भाऊ, तुमचा माधवही आमच्या रघूएवढाच आहे तेव्हां मज प्रमाणेंच तुह्मांला त्याचें कौतुक वाटत असेल.

भद्रसेन—दादा, काय सांगूं ?—

पद. चाल. वसंतीं बघुनि ही.

सुत माधव या हृदयाला ॥ केवळ विश्रांतीचें स्थल तो होउनिया बसला ॥ नधरी लवही भीती-ला ॥ निशिदिनिं मज सह नानापरिच्या करितो

क्रीडेला ॥ क्षणैक मानी रिपु मजला ॥ पुनरपि समजुनि मित्राचि देतो बहु आनंदाला ॥ १ ॥

दिलीप—हा बाल रघूही मला तसाच आहे. बरें भाऊ, मी येथें याला घेऊन बसतो; तुह्मांला कंटाळा आला असेल तर घटकाभर बागेंत जाऊन करमणूक करा. प्रिये, तूंही यांच्या बरोबर जा आणि मी येईपर्यंत यांची चांगली करमणूक कर. यानां कांहीं कमी पडूं देऊं नकोंस बरें ?

सुदक्षिणा—पण, आपण कां येत नाहीं.

दिलीप—मी आपला घटकाभर येथेंच बसतो.

सुदक्षिणा—आपणांस येथेंच बसणें गोड वाटत असेल तर बसावें; पण रघूला पाठवा आह्मांबरोबर. त्याला बागेंत फिरण्याची फार हौस आहे.

दिलीप—तुह्मी पुढें व्हां. मी त्याला अंमळशानें घेऊन येतो.

सुदक्षिणा—पण खचित येणार ना ? बसूं कां आह्मी वाट पहात.

दिलीप--वाट नको कांहीं पहावयाला. भाऊ, व्हा पुढें तुह्मी.

(भद्रसेन आणि सुदक्षिणा जातात)

दिलीप--(त्यांच्याकडे पाहून स्वगत) पहा, कशी त्याच्याशीं गुलगुल गोष्टी बोलत आहे ती ! जशी कांहीं त्याची धर्मपत्नीच ! हा चांडालानो ! परमेश्वरा, काय माझी फजिती केलींस ही--

पद. चाल. दैवयोग दुर्विपाकही.

प्राणाहुनिही प्रिय मी मानिलें जिशीं ॥ ती म-त्स्त्री व्यभिचारिणि जाहली कशी ॥ धृ० ॥ पति-व्रता किति वनिता आज यापरी ॥ तत्पतिला वाटुनिया राहतीतरी ॥ बहु भोळे असती हे नर खरोखरी ॥ स्वस्त्रीची कृति नच कोंध त्यां कळे अशी ॥ १ ॥

खचित हजार स्त्रियांत एक स्त्री तरी खरी पतिव्रता असेल कीं नाहीं याची शंका वाटते; यांचें चरित्र कधीं कोणास-कळणार नाहीं असेंच आहे--

पद. चाल. राग-मालकंस-ताल-त्रिवट.

पतिला सुखविति मधुवच वदुनी ॥ वश त्या क-रिती निज चेष्टांनीं ॥ धृ० ॥ परि हृदयांमधिं भलत्या चिंतिति ॥ मूढलोक हे सारे फसती ॥ सुधाचि मानुनि अधरा पीती ॥ औषध नच या रोगा ह्मणुनी ॥ १ ॥ सर्वठिकाणीं पीडा याची ॥ सर्वां सारखि होते साची ॥ पण नच त्यानां भ्रांती त्याची ॥ चमत्कार किति हा या भुवनीं ॥ २ ॥

आणि याच रोगाच्या तडाक्यांत मी सांपडल्यामुळें माझ्या दुष्ट स्त्रीनें माझ्या कुलास लावलेला कलंक आजपर्यंत मला कळून आला नाहीं.

रघु--बाबा, मी अगदीं तुमच्यासारखा आहे नाहीं बरें ?

दिलीप--होय बाळा, आणि ह्मणुनच माझ्या मनाला कांहीं समाधान वाटतें आहे. बरें, बाळा, तुला काय खेळावेसें वाटतें ?

रघु--बाबा, मला काय वाटतें तें सांगू का--

पद. चाल. झळके हरिणही.

छोट्या घोड्या वरती बसुनी ॥ तुह्मांसंगें जावें विपिनीं ॥धृ०॥ तेथें नाना पशु जे फिरती ॥ त्यांची करुनी कीं मृगया ती ॥ तुह्मां द्यावें सुख बहु चित्तीं ॥ उत्कंठा आशि लागलि निशिदिनिं ॥ ॥

दिलीप--शाबास ! तूं खरा क्षत्रिय कुमार आहेस. बरें बाळा, आतां तूं कोठें तरी जाऊन खेळ. उद्यां खचित तुला मी आपल्या बरोबर शिकारीला नेईन. (रघु जातो.) खचित हा रघु माझ्याच पोटचा आहे. तिच्या उदरीं जन्म घेतल्या-वांचुन काय तें याला लांछन आहे. बरें तें असो. पण या माझ्या मंदिरांत नित्य होत असलेल्या या पापाचा प्रतिकार आतां मी कसा करावा ? (समोर पाहून) अरे, हें इकडे कोण येत आहे ? प्रधान वसुभूति वाटतें.

(तदनंतर प्रधान वसुभूति प्र. क.)

वसुभूति--महाराजांचा विजय असो.

दिलीप--प्रधानजी, या. तुह्माला एक वर्तमान सांगतों. ऐकलेंतकां ? हे भद्रसेन महाराज येथें आणखी रहाणार ?

वसुभूति--होय तें मला कळलें आहे. त्यानां राहण्याविषयीं महाराजांनीं किती आर्जव केलें पण प्रथम कांहीं केल्या ते राहीनातच.

दिलीप--एकूण हें तुह्मांला देखील कळून चुकले तर. (स्वगत) झालें ! इतक्यांतच ही कुणकुण इतकी पसरली ! आतां ती आणखी कोणकोणांस कळेल याचा अजमास मला करवत नाहीं. (उघड) पण कांहो प्रधानजी, हे प्रथम रहात नव्हते मग कसें हो राहिलें ?

वसुभूति--मग राणी साहेबांनी न जाण्याविषयीं जेव्हां अतिशय आग्रह केला तेव्हां त्यांचें मन मोडूं नये ह्मणून राहिले.

दिलीप—असें काय ? वस. इतकेंच पुरे आहे.

वसुभूति—पण महाराज, ते राहिले ह्मणून आपणांस विशेष आनंद व्हावयाचा तो तर आपल्या मुखावर मुळींच दिसत नाहीं.

दिलीप—प्रधानजी, ‘ आनंद व्हावयाचा ’ हे शब्द तुह्मींच मला बोलत आहां काय ? तर मग—

पद. चाल. देवस्त्री मेनका ही.

राजनिष्ठ तुह्मि आहां हें मी अजवरि मानियलें ॥ मु-
ळि चोरुनि नच तुह्मां कथिलें हितगुज कीं अपुलें ॥
तुमचा बोधचि हितकर जाणुनि वर्तन ठेवियलें ॥
परि सर्वस्वीं फसलों ऐसें सांप्रत मज कळलें ॥ १ ॥

वसुभूति—महाराज, हें आपण काय ह्मणतां असें हो-ईल कसें ?

दिलीप—निःसंशय मी ह्मणतों तें खरें आहे. तुह्मी पुरे लबाड आहांत; कारण तसें नसतां तर एखाद्या परिजनाप्रमाणें सत्य घडलेलें कृत्य मजपाशीं लपविलें नसतें.

वसुभूति—महाराज, या दासाच्या हातून आजपर्यंत आपला पुष्कळदां प्रमाद घडला असेल, प्रसंगीं मूर्खपणा नेभळेपणाही आपणांस दिसला असेल, मनुष्याकडून असे दोष घडावयाचेच; तरी त्यासाठीं प्रभूंनीं क्षमा केली पाहिजे. आणखी अशी विनंति आहे कीं महाराजांनीं असें संदिग्ध न बोलतां मजकडून काय अपराध घडला असेल तो स्पष्ट सांगावा ह्मणजे तो कबूल करण्यास मला ठीक पडेल.

दिलीप--मी संदिग्ध मुळींच बोलत नाहीं. तुम्हांला सर्व कांहीं ठाऊक आहे; आणि नसेल तर तुम्ही नेत्र असून अंध झालां आहां व श्रवण असून बधिर झालां आहां असें समजलें पाहिजे. पहा--

साकी.

राज्ञी माझी परवश होउनि जारकर्म आचरिते ॥
ठाउक तुह्मां हें असुनी कां मजशीं लपवीतां तें ॥
सांगा तरि आतां ॥ प्रमाणपूर्वक या दुरिता ॥१॥

वसुभूति--(कानावर हात ठेवून) शिव शिव ! महाराज, आपण काय बोलतां हें ? राणीसाहेब आम्हां सर्वांच्या मातुश्री आहेत, त्याविषयीं दुसरा कोणी असें बोलतां तर मी तें कधींही सहन केलें नसतें. त्याची जिव्हाच तत्काल छेदन केली असती. राजाधिराज अधिक बोलतो याची क्षमा करा; व पुनः असें शद्ब आपण उच्चारूं नका; व आम्हांलाही ते ऐकवूं नका.

दिलीप--प्रधानजी, मी बोलतों तें खोटें असें तुम्हांस वाटते काय ?

वसुभूति--ज्यांस कांहीं प्रमाण नाहीं तें खोटेंच मानलें पाहिजे.

दिलीप—प्रमाण दुसरें तें कोणतें पाहिजे. पहा—

दिंडी.

कान कानां लावणें गाल गाला ॥ हळुंच वदणें कीं खुणावणें त्याला ॥ स्थलचि एकांतीं बघावया जाणें ॥ मध्यरात्रीची वाट तशि पहाणें ॥ १ ॥

या सर्व गोष्टी हें नीच कर्म करण्याची साक्ष देत नाहींत काय ? त्या जर तुम्हांस मिथ्या वाटत असतील तर मी म्हणतों कीं हें सर्वच जग केवळ भासरूप आहे--

साकी.

वसुंधरा ही खोटी तैसें नभ दिसतें नच तेंहीं ॥ मित्र नसे मम भद्रसेन तो दिलीपही मी नाहीं ॥ सुदक्षिणा तशि ही ॥ केवळ भासरूप पाही ॥ १ ॥

वसुभूति--राजाधिराज, आपणांस आलेला हा संशय

निव्वळ मिथ्या आहे असें मी पुनः पुनः सांगतो; हा लौकर काढून टाका, नाहींतर परिणाम कांहीं ठीक होणार नाहीं.

दिलीप--कांहीं नाहीं. हा माझा संशय खरा आहे. तुह्मी मात्र ठाऊक असतांही त्याकडे कानाडोळा करितां; पण हें तुह्मांस योग्य नाहीं. परमेश्वराच्या घरीं न्याय आहे हें जाणून तरी सत्याला स्मरून वागा.

वसुभूति--पण, महाराज, राणी साहेब ज्या परपुरुषास वश झाल्या तो पुरुष तरी कोण ?

दिलीप--कोण तो तुह्मांला माहीत नाहीं काय ?—

पद. चाल. भूमिजल तेज पवमान ही.

मैत्रि मजशीं बहु दाखवी वरि वरि आंतुनी शत्रुपरि मान कापी ॥ नीच नृप साच हा भद्रसेनचि पहा त्यास ती मत्प्रिया देह अर्पी ॥ सौख्य तिजपासुनी पूर्ण लाभावया ॥ आणखी राहि तो तिच ठायां ॥ १ ॥

(दांत खावून) अरेरे ! काय करूं ? यामुळें माझ्या सर्वांगाची कशी लाही होऊन राहिली आहे. प्रधानजी, तुम

माझे एकनिष्ठ सेवक आहां तर मीं सांगितलेलें काम तुम्हांला ऐकलें पाहिजे. एखाद्या जलाल विषाचा पेला तयार करून तो मद्य म्हणून त्या दुष्टाला पाजून त्याला नामशेष करून टाकाल असा तुमचा मला पूर्ण भरंवसा आहे.

वसुभूति--महाराज, हें आपण काय मनांत आणतां ? भद्रसेनराजास मला विष देतां येणार नाहीं असें नाहीं; व मी त्याला असें जलाल विष मुळींच देणार नाहीं, तर ज्याचा परिणाम त्यास. नकळे इतका सावकास पण खास, असेंच विष मी त्यास देईन. पण राजाधिराज राणी साहेबांकडून असें वर्तन घडलें असेल असें माझें मन मला सांगत नाहीं. केवढी त्यांची आपले ठिकाणीं भक्ति ! मी कांहीं आजच येथें आलों नाहीं माझें सर्व वय महाराजांच्याच सेवेंत गेलें, पण त्यांच्या पतिप्रेमांत अंतर मला कधीं दिसून आलें नाहीं.

दिलीप--प्रधानजी, यापासून माझें मन फिरविण्याचा प्रयत्न करितां तर तुह्मांला असें वाटतें काय कीं—

पद. चाल. दासि ऐसें मानुनियां ही.

वच मिथ्या वदतों हें मी वेडा बनुनीया॥कीं झाली

मति माझी चंचल बहु समयीं या ॥ कुतर्क हे स्त्री-विषयीं भलभलते घेउनिया ॥ इच्छितसें दूषण मी निजकुलास लावाया ॥ मज वाटे कीं सुखकर निद्रा ती नच घ्याया ॥ शोकशंकु ह्मणुनी हा रोपियला मम हृदयां ॥ १ ॥

वसुभूति--आपण इतकें खात्रीपूर्वक सांगतां आहां त्यापेक्षां तें खरें असेल. व या पापाचरणाबद्दल महाराजांच्या आज्ञेप्रमाणें मी भद्रसेनराजास जगांतून दूर करीन. पण महाराजांनीं माझी एक विनंती मान्य केली पाहिजे.

दिलीप—ती कोणती ?

वसुभूति—ती हींच कीं मग आपण कोणत्याही प्रकारें राणीसाहेबांचा त्याग करूं नये. कारण हा केवळ संशय आहे तर यामुळें युवराज रघूविषयीं प्रजाजनांच्या मनांत वाईट विचार येऊं नयेत.

दिलीप—ठीक आहे; हें तुह्मीं फार चांगलें सांगितलें. यापुढें प्रियपुत्राच्या कल्याणाकरितां मी राणीचा त्याग करणार नाहीं.

वसुभूति—आणखी, आतां महाराजांनीं शांतचित्त अ-

सावें व त्या उभयतांस आपला मुळीं संशय न येईल असें आपलें वर्तन ठेवावें. भद्रसेनराजाचा नाश करणें मजकडे लागलें; तो मी केलानाहीं तर पुनः हें काळें मुख आपणांस दाखविणार नाहीं.

दिलीप—मी तुह्मी सांगितल्याप्रमाणें करितो. तुह्मी मात्र आपलें काम इमानानें करा. तें केलें ह्मणजे तुह्मी माझे केवळ पंचप्राण व्हाल; नाहींतर मात्र प्राणांस मुकाल.

वसुभूति—ठीक आहे. आतां त्या उद्योगाला लागण्याला मला परवानगी असावी.

दिलीप—जा तुह्मी. (प्रधान जातो) अरे, दुष्टा, भद्रसेना—

साकी

रूप भयंकर कळुनी आलें तव ह्मणुनी आजवरी ॥
पाप गुप्त तव राहियले परि आज पडे बाहेरी ॥
शासन योग्य तुला ॥ मिळलें वाटतसें मजला॥१॥

(असें ह्मणून निघून जातो)

प्रवेश २ रा. स्थळ. सुदक्षिणेचा महाल.

———:*:———

(राणी सुदक्षिणा आणि तिची दासी गिरिजा प्र. क.)

सुदक्षिणा—(दुःखानें सुस्कारा टाकून) देवा—

पद. चाल. असतानां यति हा.

मजविषयीं विपरित काय ये पतिच्या अंतरीं ॥ नच ह्मणुनी येणें होय त्यांचें मन्मंदिरीं ॥ चाल ॥ कुतर्क नाना हृदयामधिं ते क्षणोक्षणीं कीं येउनीं ॥ साऱ्या रजनीमधिं निद्रा कशि नच लागे मजलागुनी ॥ चाल ॥ झालें बहु घाबरी ॥ १ ॥

गिरिजा—बाईसाहेब, भलभलतेंच मनांत आणून आपण कां उगीच जिवाची तळमळ करून घेतां ? ही पहा मध्यरात्र झाली. आतां किंचित् झोंप घ्या. मी खचित सांगतें कीं सरकार स्वारी आपल्या मित्राबरोबर आज गप्पा गोष्टी सांगण्यांत पूर्ण गुंगली आहे ह्मणून त्यानां महालांत येण्याची अठवण झाली नसेल. कारण पुष्कळ सायासांनीं भद्रसेनमहाराजांनीं येथें र-

हाण्याचें कबूल केलें तेव्हां त्यानां काय सांगूं आणि काय न सांगूं असें सरकारांस आतां झालें असेल. पहा, मी ह्मणतें तें खरें कां खोटें हें सकाळीं आपल्या अनुभवास येईल.

सुदक्षिणा—छेग, गिरिजे, तूं वेडी आहेस, आज त्यांचा मजवर रागच झाला आहे यांत संशय नाहीं. कारण, दुपारीं मी भाउजीबरोबर जेव्हां बागेंत जाऊं लागलें त्यावेळीं—

पद. चाल. वलसागर तुह्मि ही.

संशययुत अशि त्यांची मुद्रा मज दिसुनी आली ॥
मजकडेस सारखि टक त्यांनीं होती लावियली ॥
भाउजिशीं कीं मजशीं वदले एक न शद्वाला ॥
आम्हां जाण्या सांगुनि बसले घेउनि रघुबाला ॥१॥

गिरिजा—बाईसाहेब, कदाचित् त्या वेळीं कांहीं राजकारण आठवून त्यांची तशी स्थिति झाली असेल; ह्मणून त्याचा भलताच अर्थ करून तो तुम्हीं आपल्याकडे लावून घेऊं नका. माझी पुरि खात्री आहे कीं सरकारांचें आपणावर असलेलें प्रेम यत्किंचित्‌ही कमि झालें नाहीं. आतां या क्षुल्लक कारणाचा

आपणांस जो इतका बाऊ वाटत आहे हा आपणां उभयतांत असलेल्या अतिप्रेमाचा परिणाम आहे, दुसरें कांहीं नाहीं.

सुदक्षिणा—गिरिजे, तूं ह्मणतेंस तसेंही असेल; पण हें मेलं माझं मन भलभलते संशय घेतल्याखेरीज कसं तें रहातच नाहीं याला मी काय करूं?

गिरिजा—बाईसाहेब, तुम्हीं माझं ऐका आणि घटकाभर पडा म्हणजे पहा तुमच्या मनाची ही स्थिति खात्रीनें नाहिशी होईल.

सुदक्षिणा—बरें तर तूं म्हणतेंस तसेंच करितें; मी आतां निजते व मला पांघरूण घालून तूंही जाऊन नीज.

(असें म्हणून पलंगावर निजते व दासी पांघरूण घालते.)

गिरिजा—थोरांच्या घरचें सर्वच कांहीं विलक्षण ! इतक्या दिवसांत आज कोठें महाराजांचा महालांत येण्यास खाडा झाला तों बाईसाहेबांची कशी चमत्कारिक स्थिति झाली तरी ही ! आणि आम्ही दासी पहा; पतीशिवाय सारा जन्म घालवितों ! असो. आतां मी घटकाभर निजते.

सुदक्षिणा—(झोपेंत घाबरून बोलते) हायहाय ! देवा ! काय हा मज अबलेवर प्रसंग !

गिरिजा—(घाबरून) अगबाई ! बाईसाहेब एकाएकीं काय अशा बरळतात ! (जवळ जाऊन) बाईसाहेब, बाईसाहेब.

सुदक्षिणा—(उठून) गिरिजे, प्राणनाथ खरेंच कांग रागानें निघून गेले.

गिरिजा—बाईसाहेब, आपण काय म्हणतां हें ? सरकार स्वारी इकडे आली होती कधीं ? खचित तुम्हांला कांहीं भयंकर स्वप्न पडून तुम्ही इतक्या घाबऱ्या झालां आहां.

सुदक्षिणा—गिरिजे, खरेंच कां प्राणनाथ येथें आले नव्हते ? आणि मी पाहिलें हें सारें स्वप्न आहे ?

गिरिजा--बाईसाहेब, मी कधीं खोटें सांगेन असें आपणांस वाटतें कां ? इतक्यांत आपण निजला आणि लागलीच दचकून उठला.

सुदक्षिणा--तर मग ही मेली झोंप माझी वैरिणच आहे ! ती आतां मला मुळींच नको. बैस अशी मजजवळ आपण येथें गोष्टी बोलत बसूं.

गिरिजा--(तसें करून) बाईसाहेब, पण तुम्हीं एकाएकीं दचकून उठण्याला कारण काय झालें ?

सुदक्षिणा--सखे, ऐक. तूं सांगितल्यावर मी पलंगावर निजले आणि माझा डोळा लागतों न लागतों इतक्यांत मला बाई फार भयंकर स्वप्न पडलें.

गिरिजा—असें कोणतें स्वप्न पडलें तरी बाई !

सुदक्षिणा--ऐक—

पद. चाल. दासि ऐसे मानुनिया ही.

प्राणपती अवचित ते मजजवळी येउनिया ॥
दुर्भाषण मज वदले अंतरिं बहु कोपुनिया ॥
प्रिय रघुला मजपासुनि हिसकावुनि घेउनिया ॥
ह्मणती मी तुज त्यजिलें चालति हो येथुनिया ॥ १

गिरिजे, तुला काय सांगूं, स्वप्नांतली ती त्यांची रागिट मुद्रा मला कशी डोळ्यांसमोर दिसत आहे.

गिरिजा—बाईसाहेब, हें स्वप्न जरी भयंकर आहे तरी त्याबद्दल तुह्माला व्यर्थ काळजी करावयाला नको; कारण, स्वप्नच बोलून चालून तें ! त्याप्रमाणें कधीं घडून कां येतें ?

सुदक्षिणा--गिरिजे, असें बोलून उगीच नको तूं माझें समाधान करूंस; तें स्वप्न पाहिल्यापासून मला तर बाई खास वाटूं लागलें आहे कीं—

अंजनीगीत.

प्राणपतींच्या मनिं मजविषयीं ॥ विपरित आलें आहे कांहीं ॥ यावरि माझी धडगति नाहीं ॥ कथितें सत्य तुला ॥ १ ॥

गिरिजा—पण, बाईसाहेब, अपायाला उपाय आहेत. आपणांस जर या स्वप्नाचें फळ वाईट आहे असें वाटत असेल तर त्याचें निवारण करण्याचा कांहीं मार्ग नाहीं कां सांपडणार? मला वाटतें कीं आपण दाक्षायणी मातुश्रीस जर हें सर्व निवेदन केलें, तर त्या खचित याचा प्रतिकार करण्यास उपाय शोधून काढतील.

सुदक्षिणा—हें तूं मला चांगलें सांगितलेंस. तर चल आपण त्यांच्याकडे जाऊं. पण यावेळीं त्या निवांत असतील कां?

गिरिजा--बाईसाहेब, ही पाहिलीत कां अगदीं पहाट झाली. यावेळीं त्या अंग धुवून तुळशीची पूजा करीत असतील.

सुदक्षिणा--काय पहाट झाली ? तर मग अगोदर माझी वेणी घाल ह्मणजे मी ही अंग धुवून त्यांचें दर्शन घेण्याकरितां जाते.

गिरिजा—बरें तर चला तुमची वेणी घालते.

सुदक्षिणा--(जातां जातां) परमेश्वरा--

पद. चाल. मज नाहीं गडे ही.

जें पाप पुण्य जगिं घडतें सर्व तुज दिसें ॥ जाणुनि मी निज वर्तन ठेविलें असें ॥ धृ० ॥ मुळिं न दिलें कोणाही दुःख अजवरी ॥ पति विषयीं बहु धरिलें प्रेम अंतरीं ॥ टाकितसे ह्मणुनी मम भार तुजवरी ॥ दैवाच्या कृतिचा या भरंवसा नसे ॥१॥

(दासीसह जाते)

प्रवेश ३ रा. राजवाड्यांतील चौक.

———:o:———

(प्रधान वसुभूति प्र. क.)

वसुभूति—शिव शिव ! हे मंदभागिनी राज्ञी ! तुजविषयीं असा मिथ्या संशय राजाच्या मनांत यावा काय ? तसाच प्राणाहुनही प्रिय मित्र जो भद्रसेन भूपती त्यांस विषप्रयोग करण्याविषयीं मला आज्ञा व्हावी काय ? मज दुर्दैव्याची सांप्रत कशि कठीण स्थिति झाली आहे पहा; जर हें काम मी न करीन तर महाराज माझा शिरच्छेद करतील: व करीन तर त्या निरपराधी राजेंद्राचा वध केल्याच्या पातकाबद्दल मला नरकांत पडावें लागेल. तर काय आतां मी प्रभुकृपेसाठीं व धनलाभासाठीं हें भयंकर कर्म करावें ? छे छे ! या कृत्यानें स्वकुलास कलंक लावण्यापेक्षां हें राज्यच सोडून जावें हें बरें. येथें राहून जर मृत्यु चुकत नाहीं; मग दुसरीकडे त्याचें भय तरी कशास पाहिजे ? ठरलेंच तर असें. (समोर पाहून) अरे, हे भद्रसेन महाराज इकडेच येताहेत.

(तदनंतर भद्रसेन राजा प्र. क.)

भद्रसेन—अरे, काय हा चमत्कार !—

साकी.

एकाएकीं उदास झालें नृपमन कां मजविषयीं ॥ भेटिस गेलों असतां मजशीं वद्ला तो नच कांहीं ॥ कारण तें याचें ॥ मजला नकळे मुळिं साचें ॥ १ ॥

(प्रधानास) कसें काय प्रधानजी, ठीक आहेनां ?

वसुभूति—महाराजांच्या कृपेनें सर्व ठीकच आहे ह्मणावयाचें.

भद्रसेन—बरें कांहीं नवल विशेष ?

वसुभूति—नवल विशेष ह्मणण्यासारखें कांहीं नाहीं.

भद्रसेन कांहीं नाहीं कसें ह्मणतां ? पहा—

दिंडी.

फार दुःखित मुख दिसे कीं नृपाचें ॥ वदे नच तो एकही शब्द वाचे ॥ मला पाहुनियां दांत

ओंठ चावी ॥ काय अपकृति तरि केलि मी असावी ॥ १ ॥

वसुभूति—असें झालें आहे खरें. पण तुम्हांला याचें कारण काय सांगूं ? आणि कसें सांगूं ?

भद्रसेन—प्रधानजी, कसें सांगूं ह्मणतां यावरून याचें कारण तुह्मांला माहीत आहे खास. मग कां सांगत नाहीं ? तुमच्या या उतरलेल्या चेहऱ्यावरून त्या कारणाशीं माझा कांहींतरी संबंध आहे अशी माझी खात्री होते.

वसुभूति—महाराज, आपण केला तो तर्क खरा आहे. त्यांचें मन आपणाविषयीं तशाच कांहीं कारणानें विटलें आहे पण खरोखर त्यांत आपलें अंग मुळींच नाहीं.

भद्रसेन—काय दादांचें मन विटावयाला मी कारण झालों असतां त्यांत माझें अंग मुळींच नाहीं ? प्रधानजी, आपण चतुर अनुभवी, व निर्भीड असतां असें ह्मणतां हें केवढें आश्चर्य ?

वसुभूति—आपण कांहीं म्हणा; पण तें मला सांगवत नाहीं.

भद्रसेन—तें कांहीं नाहीं प्रधानजी, तुम्हांला माझी शपथ आहे. जें काय खरें असेल तें कसलीही भीति न धरितां सांगा.

वसुभूति—महाराज, तुम्हीं शपथ घातली त्यापेक्षां सांगतों तें ऐका; आणि लागलीच त्याप्रमाणें करा; नाहींतर तुम्हांला व मला दोघांनाही मृत्यूची वाट धरावी लागेल.

भद्रसेन—सांगा तर.

वसुभूति—आपला वध करावा, अशी महाराजांची मला आज्ञा झाली आहे.

भद्रसेन--आणि ती कशाकरितां बरें ?

वसुभूति--त्यांना असें वाटलें आहे-अथवा वाटलें कसलें त्यांची खात्री झाली आहे-कीं तुमचा व राणीसाहेबांचा प्रेमसंबंध जडला आहे.

भद्रसेन—अरेरे ! काय ही कुकल्पना ! त्या साध्वीच्या नखाला शिवावयाची तरी कोणाची प्राज्ञा आहे कां ? असें जर मजकडून घडलें असेल तर—

पद. चाल. सकलासी रवि प्रिय ही.

मजसम अति पातकि नर हा वसुंधराही नच ठेवो ॥

महारोग होउनि मजला शरिराचा दाहचि होवो ॥ कृमि यामधिं मग पडुनीया दुर्गंधी बहु त्या येवो ॥ चाल ॥ बुधजन मज शापचि देवो ॥ पूर्वज मम नरकीं जावो ॥ सर्व राज्य शत्रू घेवो ॥ यावद्विधु-दिनमणि सेवो ॥ चाल ॥ गंगेमधिं जिव देतांही ती वरती फेकुनि देवो ॥ १ ॥

वसुभूति—महाराज, आतां आपण कांहीं जरी सांगितलें; कितीही शपथा वाहिल्यात, वाटेल तें केलें तरी त्यांचा झालेला ग्रह बदलण्याची आशा नको; तर सांप्रत जें प्राणसंकट आलें आहे त्यांतून पार पडण्याचा तुम्हीं प्रयत्न केला पाहिजे. आतां मजवर जर आपला विश्वास असेल तर मी सांगतों तसें करा. आज रात्रीं आपण येथून निघून चला. हा आपला बेत मी आपल्या परिजनांस कळवून ते निरनिराळया वाटेनें तुह्मांस मिळतील अशी तजविज करितों. मी सांगितलेलें खोटें नव्हें, तथापि याचें प्रत्यंतर पाहण्याच्या भरील पडाल तर खचित आपला जीव धोक्यांत घालाल. आतां मी आपणांस हा महाराजांचा गुप्त बेत कळवला आहे त्यापेक्षां मलाही येथून कोठें तरी निघून गेलें पाहिजे, पण अगोदर तुह्मि चला; त्याचा विचार मी मग करीन.

भद्रसेन—प्रधानजी, आपण सांगता ती गोष्टखरी आहे. मघां राजाची रागीट मुद्रा पाहूनच त्याचे प्रत्यंतर मला आलें. असो. आजरात्रीं आपण सांगितल्याप्रमाणें माझा तर जाण्याचा निश्चय झालाच. पण ज्याअर्थीं तुह्मीं माझे प्राण वांचवून मजशीं नवीन मित्रत्वाचें नातें जोडलें आहे त्याअर्थीं तुह्मींही मजबरोबर माझ्या राज्यांत चलून पूर्ण निर्भय व्हा. तुमची जहागीर, तुमचा अधिकार, सन्मान वगैरे सर्व कांहीं तुह्मांस तेथें मिळेल.

वसुभूति—आपली इच्छा असेल तर मी येण्यास तयार आहे.

भद्रसेन—बरें प्रधानजी, आपण कसेंतरी सुटूं पण त्या बिचारिची काय वाट?——

पद. चाल वसंतसेना हारिणीसम ही.

लावण्याची खानि केवळ जी जननी सत्कुलजांची॥ करिलाचि संशयमूढ भूप त्या विटंबना राज्ञीची ॥ निष्कारण हा पतिकोप न ती कधिंही साहिल साची ॥ त्या दुःखाग्नीमधिं आहुति कीं देइल स्वप्राणाची॥ उपाय न दिसे कांहीं यांतुनि सुटका

होण्या तीची ॥ कमाल आहे दुर्दैवा या तव अ-घटित घटनेची ॥ १ ॥

असो, परमेश्वरा, त्या निरपराधि अबलेचें आतां तूं रक्षण कर. आह्मांकडून तिला सहाय होण्याची मुळींच आशा नाहीं.

वसुभूति—महाराज, अवश्य जें घडणें तें कोणालाही चुकावयाचें नाहीं. त्याबद्दल आपण व्यर्थ खेद करून काय उपयोग ?

भद्रसेन—बरें प्रधानजी, आपणांस संध्याकाळीं वेशीचा दरवाजा बंद झाल्यावर बाहेर कसें पडतां येणार ?

वसुभूति—महाराज, त्याची नको आपणांस काळजी; वेशीच्या दरवाज्याच्या किल्या मजजवळच असतात. बरें आतां मला फार वेळ आपणाशीं बोलत उभे रहातां येत नाहीं यासाठीं आतां मी जातो. वेळेवर मी आपणांस येऊन मिळेन.

भद्रसेन—ठीक आहे. जा तुह्मी. (तो गेल्यावर) या दोन दिवसांत काय विलक्षण चमत्कार घडला पहा—

पद. चाल. शिवशिव ही निर्धनता ही.

सद्गुणखनि जिस मानी हा महीपती ॥ ती स्त्री

त्या कशि जारिणि आज वाटती ॥ धृ. ॥ असुनी या जिवलग मम मित्र अजवरी ॥ उत्सुक मज भेटाया फार अंतरीं ॥ अवचित तो करि माँशि कां वैर यापरी ॥ नकळे तत्कारण मुळि गुंगली मती ॥ १ ॥

(असें ह्मणून निघून जातो)

अंक दुसरा.

—— :o: ——

प्रवेश. १ ला. स्थळ. राजवाड्यामागील बाग.

[राणी सुदक्षिणा, दासी गिरिजा व पुत्र रघु प्र. क.]

सुदक्षिणा—(सचिंत स्वगत)

पद. चाल मर्यादा सोडुनि वदणेंही.

मज सांप्रत नसुचें कांहीं समाधान अंतरिं नांहीं ॥
कशांतही सुख नच वाटे जग उदासवाणें होई ॥
तळमळकरि सर्वांगाची प्रियपतिची अशि रीती ही
॥ चाल ॥ प्रेम सर्व कैसें त्यांचें ॥ पूर्वीचें मजवि-
षयींचें ॥ अवचित लय पावे साचें ॥ करणी कुणि
केली कां ही ॥ चाल ॥ फिरफिरुनी विचार करित्ये
पण कारण नकळे पाही ॥ १ ॥

रघु—आई, या तळ्यांत पाहिलीस कां काय मौज दिसत
आहे ती—

पद. चाल. स्फटिकांचेहे पदही.

कमलें सारीं विकसुनि गेलीं ॥ ह्मणुनी बहु त्या
शोभा आली ॥ धृ० ॥ एकावरुनी दुसऱ्यावरती॥
मधुकर बघ हे उडुनी बसती ॥ मंजुल गुंजारव
तो करिती ॥ भीती वाटे नच त्या कसली ॥ १ ॥

सुदक्षिणा—(स्वगत) देवा ! प्राणनाथांचें मन मजविषयीं कां विटलें याचें कारण मला कळेल कां ?

रघु—आई, मी तुला मौज दाखवितो, पण तूं ती मुळींच पहात नाहींस व माझ्याशीं कांहीं बोलत देखील नाहींस; असें कांबरें करित्येंस ? तूं मजवर रागावली आहेस कां ? सांग लौकर सांग. नाहीं तर हा पहा मी आपला जातो.

सुदक्षिणा—(स्वगत) आतां मी याला काय सांगूं ? (उघड) नाहींरे बाळा, मी तुजवर रागावलें नाहीं. आज कीं नाहीं माझ्या मनाला समाधान नाहीं. बरें हें पहा, मी येथें या चौरंगावर बसते आणि गिरिजा तुजबरोबर खेळेल.

गिरिजा—या बाळासाहेब, इकडे, बाईसाहेबांच्या जिवाला चैन नाहीं तर उगीच नका त्यानां त्रास देऊं. मी तुमच्या बरोबर खेळते. काय तुम्हाला खेळावयाचें ?

रघु---मी नाहीं तुजबरोबर खेळावयाचा; आणखी तुजजवळ यावयाचा देखील कधीं.

गिरिजा---असें कां बरें बाळासाहेब ! हे पहा तुम्हांला मी एक चांगली मजेदार गोष्ट सांगतें.

रघु—मला नको ती तुझी गोष्ट.

गिरिजा—बरें पण असे तुम्ही किती दिवस माझ्या जवळ येणार नाहीं ? हे पहा, आतां तुम्हांला लौकरच भाऊ होणार आहे मग त्याला घेण्याकरितां तर मजजवळ याल कीं नाहीं ?

सुदक्षिणा—गिरिजे, हें कायग त्याला भलभलतें सांगत आहेस ? बाळा, ये तूं मजजवळ. दाखीव पाहूं मला मौज.

रघु—आई, काल बाबांनीं शिकारीहून येतांना एक मला मोठा वाघ धरून आणला आहे व तो येथेंच बांधून ठेवला आहे. चल तो तुला मी दाखवितो.

(तिला वाघाजवळ घेऊन जातो.)

सुदक्षिणा—अगबाई, केवढा तरी वाघ आहे हा ! याला बघतांच माझ्या उरांत तर धडकीच भरली !

रघु—आई, तूं याला इतकी भीतेंस ! हा पहा मी तर त्याच्या जवळ जातो. (जाऊं लागतो.)

सुदक्षिणा—बाळा, नको नको त्याच्या जवळ जाऊं. आपण येथूनच त्याची सारी मौज पाहूं.

रघु—आई, तूं इतकी घाबरूं नकोंस; तो मला कांहीं देखील करीत नाहीं. (वाघाजवळ जाऊन त्याला हात लावतो.)

सुदक्षिणा—अगबाई ! हा तर अगदीं त्याच्यापाशीं गेला.

रघु—(वाघ डुरकावतो तें पाहून) कायरे लुच्चा,—

पद. चाल. अंगिकार करुनि ही.

जाणुनिया मजला कीं पोर अंतरीं ॥ डुरकावुनि भिवविसी काय यापरी ॥ ध्रु. ॥ पण कोठें मम विक्रम ठाउका तुला ॥ पाठीवरि बसतों मी भय न मुळिं मला ॥ आहे तव बलमद तो सर्व उतरला ॥ गमजा किति करिशिल तूं मजपुढें तरी ॥१॥

(त्याच्या पाठीवर बसून खेळतो.)

सुदक्षिणा—अगबाई ! शिकस्त झाली याच्या धीटपणाची ! बाळा, येरे आतां मजजवळ.

रघु—हा पहा आलों. (तिच्या मांडीवर येऊन बसतो.)

सुदक्षिणा—(मनांत) हा काय बरें चमत्कार ! मी आपल्या बाळाला जवळ घेऊन बसले असतां याचा माझा

लौकरच वियोग होणार असें माझ्या मनांस वाटूं लागलें आहे ! काय असेल तें असो. (उघड) बाळा, रघु मी तुला कांहीं विचारूं कारें ?

रघु—आई, काय विचारतेंस मला ?

सुदक्षिणा—

पद. चाल. जाई परतोनी ही.

मजला सोडोनी ॥ बाळा ॥ जाशिल कांरे कोणी नेलें दूर जरी तुज मजपासोनी ॥ ध्रु. ॥ जशि मत्प्रीती तुजवरि आहे स्वप्राणावरि तशि नाहीं ॥ लालन पालन बहुपरि करुनी वाढविलें मी तुज पाहीं ॥ वियोगदुःखचि म्हणुनी तव मशिं अति दुःसह होइल दिनरजनीं ॥ १ ॥

(असें ह्मणून डोळ्यांस पाणी आणलें)

रघु—

पद. चाल. सदर.

काय असें वदशी ॥ जननी ॥ एकाएकीं तव मनिं कां हें विपरित आलें नकळे मजशीं ॥ धृ ॥ कोण तुझा मशिं वियोग करण्या इच्छितसे कीं

या भुवनीं ॥ त्या पाप्याला शासन करितों बघ लौकरि मी जावोनी ॥ प्राणांतींही दूर कधीं गे नच सोडुनिया जाइन तुजशीं ॥ १ ॥

पण, आई, सांग बरें, कोणाच्या मनांत तुझी माझी ताटातूट करण्याचें आलें आहे?

सुदक्षिणा—तसें कांहीं नाहीं बाळा, माझ्या मनांत उगीच आपलें असें आलें ह्मणून विचारलें. (मनांत) परमेश्वरा, या माझ्या बाळाला उदंड आऊक्ष घाल ह्मणजे खचित तो आपल्या पराक्रमानें त्यानां निरंतर आनंद देईल. आणखी माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत याची माझी ताटातूट करूं नकोंस.

(राजा दिलीप व एक सरदार प्र.क.)

दिलीप—अरे, हा काय विलक्षण प्रकार झाला पहा—

पद—चाल. नको हरिनिशीं ही.

विश्वासानें रिपुवधण्याचें कार्य जया मी सांगितलें ॥ त्या सचिवानें उलटें त्याला येथुनि पळवुनि रक्षियलें ॥ मत्भार्येनें पापकर्म जें त्याशीं करण्या योजियलें ॥ प्रधान हा त्या अनुकुल होता

आतां कळुनी मज आलें ॥ शंका पूर्वीं आली तीचें सांप्रत प्रत्यंतर मिळलें॥या सर्वांनीं मत्सौख्याच्या ताटामधिं विष कालविलें ॥ १ ॥

(सरदारास) जयसिंह, मला राहूनराहून मोठें नवल वाटतें कीं वेशीचे सारे दरवाजे बंद असतां वसुभूतीनें सर्व परिजनासह त्या भद्रसेनास पळवून कसें लावलें ?

जयसिंह--महाराज, वेशीच्या दरवाजांच्या किल्या तर नेहमीं वसुभूतीपाशींच असत. तेव्हां त्यानें मध्यरात्रीं दरवाजा उघडल्याचा कोणासच संशय आला नाहीं.

दिलीप—होय हीही गोष्ट खरी आहे. बरें तुम्हीं भद्रसेनाबरोबर तो गेलेला नीट पाहिलांत कां ?

जयसिंह—होय. हे सर्व त्या रस्त्यानें चालले असतां तो त्यांस येऊन मिळालेला मी प्रत्यक्ष पाहिला. पण हें असें कांहीं दगाबाजीचें प्रकरण असेल असें त्यावेळीं मला वाटलें नाहीं. नाहींतर लागलीच मी महाराजांस वर्दी दिली असती.

दिलीप—(मनांत) अरेरे ! ही गोष्ट फार वाईट झाली. भद्रसेन आणि तो लुच्चा प्रधान वसुभूति माझ्या हातांतून निसटून निर्भय झाले यानें माझ्या दुःखांत आणखी भर पडली ! कारण—

दिंडी.

सतत आतां मन्मूर्खपणाचा या ॥ जनामधिं कीं उपहास करोनीया ॥ मना करितिल ते करमणूक पाही ॥ दुःख माझें तें सौख्य तयां होई ॥ १ ॥

आतां या शत्रूंचा मला सूड कसा घेतां येणार? पुष्कळ विचार करितों पण कांहीं इलाज सुचत नाहीं. असो. कधीं-तरी प्रसंग आला म्हणजे पाहून घेईन. सध्यां—

साकी.

मद्रिपुपैकीं येथें आहे जारिणी ही मत्कांता ॥ तच्छल करुनी उगवुनि घ्यावा सूडचि अपुला पुरता ॥ याहुनि नच कांहीं ॥ दुसरें करितां मज येई ॥ १ ॥

(राणीजवळ जाऊन रघूला हिसकावून घेऊन क्रोधानें) दुष्टे, चल हो एकीकडे—

पद—चाल. सुखोपभोगा योग्य ही.

प्रियकर हा रघुबालक आहे माझा गे साचा ॥
लाभ तुला नच मिळुनी देइन कधिं तत्संगतिचा ॥

निर्मल तैसा कोमल पाहे स्वभाव गे याचा ॥ हो-
इल भलता परिणामचि त्यावरि तव दुष्कृतिचा ॥
जाणतसे मी गर्भ नसे हा मम तरि दुसऱ्याचा ॥
निजदेहामधिं वाढविसी जणुं संचय पापाचा॥१॥

जयसिंह, या बाळाला घेऊन चला आणि पुनः तिची याची गांठ न पडेल अशी तजवीज ठेवा. तिला आतां वाटेल त्यापासून ती आपली करमणूक करून घेईल.

रघु--बाबा--

पद—चाल. दवडु नका ही.

अवचित मम जननीवरि कोप हा असा ॥ निष्का-
रण तुमचा हो जाहला कसा ॥ ध्रु. ॥ कां करितां
दोघांचा तुम्हि वियोग हा ॥ तिजवांचुनि मज न
पडे चैन मुळिं पहा ॥ यापासुनि सर्वांसी दुःख तें
महा ॥ होइल तरि न करा या घोर साहसा ॥ १ ॥

(असें म्हणून त्याच्या गळ्याला दुःखानें मिठी मारितो.)

दिलीप—बाळा, नको उगीच रडूंस. तूं शहाणा असून असें कां बरें दुःख करतोस. पहा—

साकी.

निर्दयतेनें दूर न करितों इजपासुनि मी तुजला ॥
तरि आहे ही जारिणि पापिणि योग्य न त्वत्संग-
तिला ॥ जाणुनि हें चित्तीं ॥ सोडी इजविषयीं
प्रीती ॥ १ ॥

रघु—हायहाय ! !

पद--चाल. नृपाल कोप ही.

मम जननीविषयीं अपवाद हा असा ॥ तातमुखें
ऐकियला आज मी कसा ॥ याहुनि मज वाटे कीं
मरण तें बरें ॥ जगीं महाबळी असें दैव हें खरें ॥
दैव हें खरें ॥ १ ॥

(असें म्हणून मूर्च्छीत पडतो.)

दिलीप—बाळा, सावधहो सावधहो; (सरदारास) जयसिंग, याला मूर्च्छा आली आहे यासाटीं वाड्यांत नेऊन याच्या डोळ्यांस पाणी लावा म्हणजे हा सावध होईल. चला लौकर घेऊन याला.

जयसिंह—(रघूला घेऊन जातो)

दिलीप--(राणीस) दुष्टे, काय केलेंस हें ?—

दिंडी.

धर्म सोडुनिया पतिव्रतेचा गे ॥ काय अवडे व्यभिचार तव मना गे ॥ प्रेम बहु मम तुजवरी असोनीया ॥ कशी झालिस वश भद्रसेनराया ॥ १ ॥

सुदक्षिणा--महाराज, काय हें भलभलतें बोलतां ?-

पद. चाल. मजवरि हें आलेंही.

कैसी ही दयिता ॥ अप्रिय झाली ॥ आजाचि या चित्ता ॥ ह्मणुनी अति दुःसह दुर्भाषण तिस वदतां हें तुह्मि गुणवंता ॥ धृ. ॥ विचार याविषयीं ॥ आपण केला ॥ आहे कां कांहीं ॥ नच तरि ह्मणतिल काय सर्व जन तत्भय आणा मनिं नृपनाथा॥१॥

दिलीप--विचार कसला करावयाचा ? आणि लोकांचें भय कसलें धरावयाचें ? तें इतकेंच ह्मणतील कीं नाहीं ?--

पद. चाल. जयजय मदनाही.

रतिहुनि सुंदर ऐसी होती सुदक्षिणा ती राज्ञी अमुची ॥ तत्सर्वांगामधिं विलसुनिया राहिलि शोभा लावण्याची ॥ या भुवनामधिं अनुपम

कांति ही दिसुनी आली एकचि विधिची ॥ परि दुदैवें मुळिं नच लाभलि सुखसंगति कीं तिजला पतिची ॥

अरेरे ! मला तुला असें ह्मणणें बरें वाटतें आहे कां ? पण काय करूं ? जें सत्य आहे तें अप्रिय असलें तरी वदलेंच पाहिजे--

जारकर्म तूं करुनी धरलिस इच्छा मत्कुल बुडवायाची ॥ भाग पडे मज ह्मणुनी तुजसी शिक्षा करणें त्या पापाची ॥ १ ॥

सुदक्षिणा--हायहाय देवा ! काय हा मजवर प्रसंग !

पद. चाल. दयाळा स्वमनीं ही.

भूपाला ॥ दुःख असें कां देतां तरि मजला ॥ अपराध नसे मी केला ॥ धु. ॥ काय मिळे तरि प्रमाण अपुणा या माझ्या दुरिताला ॥ १ ॥ ह्मणुनी निष्कारण गहजब हा तुह्मि करुनी सोडियला ॥ २ ॥ नकळे अवचित कैसा होई भ्रम यापरि तुह्मांला ॥ ३ ॥

दिलीप—काय म्हणतेंस मला भ्रम झाला! छे! भलतेंच! तुला मात्र भ्रम झाला होता खरा. पहा—

साकी.

भद्रसेननृप तोच कांत कीं दिलीप आहे अपुला ॥
ऐसें तुज वाटुनि तूं त्यासी निज देहचि अर्पियला॥
मद हा मदनाचा ॥ असे भयंकर किति साचा॥ १ ॥

सुदक्षिणा—महाराज, नाहींहो नाहीं! आपणांस हा केवळ मिथ्या संशय आला आहे. पहा-

पद. चाल. उभि जवळ खरी तीही.

भद्रसेन निज बंधू कीं होता हो तुह्मि मानियला॥
त्यापरि मी समजुनि त्याशीं ठेवियलें आचरणाला॥
स्वप्नींही या पापाची बुद्धी नच झाली मजला ॥
॥ चाल ॥ आपण सांगितलें ह्मणुनी ॥ आग्रह
करुनी ॥ त्या राहवुनी ॥ घेतलेंचि मी भूपाला ॥१॥

दिलीप—या तुझ्या भाषणानें माझा ग्रह खोटा होईल असें तुला वाटतें कां? पापिणी, तूं त्याच्याशीं जारकर्म केलें आहेस अशी माझी पुरी खात्री झाली आहे, इतकेंच नाहीं, तर माझा

प्राण घेण्याचीदेखील त्याशीं तूं मसलत केली होतींस व या तुझ्या नीच कृत्याला तो अधम वसुभूति सहाय झाला. आणि हें सर्व कृत्य जेव्हां माझ्या लक्षांत आलेलें तुला कळलें तेव्हां तूंच त्या दोघालां येथून पळवून लावलेंस. किती तरी हें घोर आचरण तुझें ! हें कृत्य करण्याची मसलत करतानां स्त्रीजातीची लज्जा, भीती यांनीं कसा एकदम तुझा त्याग केला ! !

सुदक्षिणा—काय आपण हावे तें बोला ! कोणाचाही हात धरवेल पण तोंड धरतां येणार नाहीं. हे जे अपराध मजवर आपण लागूं करूं पहातां यांतील एकदेखील मजकडून घडला नाहीं याबद्दल मी हावी ती शपथ घेईन. फार काय सांगूं ?

पद. चाल. कांरे हरितूंही.

जरि कधिही मी मन अपुलें ॥ प्रियनाथांचें अप्रिय करण्यामधिं असेल कीं योजियलें ॥ ध्रु. ॥ तरि सारें हें नभ मजवरती ॥ कोसळुनी ॥ आज पडो कीं ॥ यम मज घालो रौरवनरकीं ॥ करोत छीथू मम यापुढतीं या लोकांतिल जन सगळे॥१॥

आणखी मी खचित सांगतें कीं हें आपण मजवर निव्वळ

कुभांड घेतलें होतें अशी आपली कधीं तरी खात्री झाल्याबांचून रहाणार नाहीं. मग 'माझ्याकडून ती मोठी चूक झाली' असें आपण म्हटल्यानें या माझ्या सर्व दुःखाचा परिहार होईल काय ?

दिलीप--काय ? या कामांत माझी चूक ? पहा--

पद. चाल. अंजनपर्वा नकरी पर्वाही.

पूर्वेचा रवि अस्ताचलिं गे येइल कधिं तो उदयाला ॥ या भूवरती येतिल साऱ्या तारा सोडुनि गगनाला ॥ निज मर्यादा सोडायाची इच्छा होइल उदधीला ॥ पण असत्यता नच येई मुळिं बघ या माझ्या उक्तीला ॥ १ ॥

असो, या कृत्यासंबंधानें माझी पुरी खात्री झाली आहे; तेव्हां तुझें मला कांहीं ऐकावयाचें नांहीं. आतां या पापाबद्दल तुला योग्य शासन म्हटलें म्हणजे तुझा वधच करावा पण मी तसें करीत नाहीं. तर---

साकी.

या नृपसदनामधिं कोठेंतरि प्रतिबंधामधिं तुजला ॥ ठेउनि देतो तेथें करुनी निशिदिनिं अनु-

तापाला ॥ या तव पापाचें ॥ कांहीं क्षालन करि साचें ॥ १ ॥

सुदक्षिणा--काय आपण शिक्षा कराल ती मी भोगण्याला तयार आहे. हल्लीं माझे ग्रहच फिरले असले तर मी म्हणते तें खरें कां खोटें याचा विचार करण्याची आपणांस कोठून बुद्धि होणार ? महाराज काय सांगूं ?

पद. चाल. दारिद्र्यें जनकाचीही.

यावेळीं येईना मुळिं रडें मला ॥ दुःखाग्नी हृदयांतरि पेटुनि बहु गेला तरि ॥ नयनसलिल पाझर तो सर्व आटला ॥ १ ॥

आज्ञेप्रमाणें मी कारागृहांत जाण्याला तयार आहे; पण इतकेंच मागणें आहें कीं--

अंजनीगीत.

प्रसूतिचे दिन माझे आतां ॥ जवळी आले असती नाथा ॥ कोणी नच मज सहायकर्ता ॥ या संकटकालीं ॥ १ ॥ तरि असण्या मजपाशीं दासी ॥ आज्ञा अपुली व्हावी तिजसी ॥ चरणीं करिते या विनतीसी ॥ मान्य करा सदया ॥ २ ॥

दिलीप—कांहीं चिंता नाहीं. तुझ्या दासीस तुजपाशीं रहाण्याची परवानगी आहे.

सुदक्षिणा—(दासीस) गिरिजे, चल मजबरोबर. अग अशी उगीच रडतेंस कां ? बंदिंत टाकलें ह्मणून मी अपराधी कां झालें ? वेडी कुठली. असेल परमेश्वराच्या मनांत तर तो खऱ्याखोट्याचा निवाडा लौकरच करील. देवा !—

पद—चाल. वायां शिणवु नका ही.

येई॥धांवुनि तूं यासमयीं ॥ पापकर्म मी नच केलें अशि साक्षचि या देई ॥ न्यायी ॥ असतां तूं मग कां ही ॥ आग पाखडिसि मज अबलेवर करुणा कशि तुज नाहीं ॥ कांहीं ॥ सुख नच या जगिं पाही ॥ दैवदुःख भोगावें लागे नटळे कोणा कधिंही ॥ १ ॥

(दासीसह निघून जाते)

दिलीप—कोण आहेरे ?

(जयसिंह प्र. क.)

जयसिंह—सरकार ? मी आहे जयसिंह ?

दिलीप--जयसिंह, सांगितल्याप्रमाणें रघूची व्यवस्था केलीत कां ?

जयसिंह--होय; त्यांच्या डोळ्यानां पाणी लावून त्यानां सावध केलें. पण लागलीच त्यानां सपाटून ताप आला म्हणून पलंगावर निजवून मी इकडें आलों.

दिलीप--त्याच्या मनाला एकाएकीं दुःखाचा धक्का बसल्यामुळें असें झालें यांत संशय नाहीं.

जयसिंह—सरकारांच्या चरणापाशीं माझी एक विनंति आहे कीं त्यांनीं राणीसाहेबांवर जो दोषारोप केला आहे तो करूं नये. कारण त्यापासून त्यानां, सरकारानां, बाळासाहेबानां आणि आह्मां सर्व प्रजाजनानांही महद्दुःख होण्याचा संभव आहे.

दिलीप—असें तुह्मी कशावरून ह्मणतां ?

जयसिंह—माझी खात्री आहे कीं—माझीच काय पण सर्व प्रजाजनांची आहे कीं-राणीसाहेब पूर्ण निर्दोषि आहेत. त्या जर खोट्या ठरल्या, तर या सर्व पृथ्वीवर औषधाला देखील कोणी साध्वी मिळणार नाहीं, यासाठीं सरकारांनीं उतावळे-पणानें भलतेंच कांहीं करून उगीच प्रजाजनांच्या क्षोभास कारण होऊं नये.

दिलीप—बरें तर तुह्मी सांगतां तसेंच करितों. आमचे गुरु श्रीपरमहंसस्वामी हे हिमालयावर तप करीत आहेत त्यांस हें सर्व वृत्त कळवून ते अंतर्ज्ञानानें जें खरें वर्तमान सांगतील त्याप्रमाणें पुढें तिला शासन किंवा क्षमा करूं.

जयसिंह--सरकारांनीं हा फार चांगला विचार काढला; स्वामींच्या खरेंपणाविषयीं सर्व जग साक्ष देत आहे; तेव्हां यांनीं राणीसाहेबांस अपराधी ठरवल्यावर त्यानां आपण कांहीं शासन केलें तरी कोणास कुरकुर करण्यास जागा रहाणार नाहीं.

दिलीप—बरें आतां तुह्मी जा आणि आमच्या उपाध्यायांचे दोघे चिरंजीव जे जनार्दन आणि मधुसूदन यांस मजकडे पाठवून द्या. मी आतां वाड्यांत जाऊन रघूची प्रकृति कशी काय आहे ती पहातो.

जयसिंह—ठीक आहे. आज्ञेप्रमाणें करितो. (जातो)

दिलीप—तिच्या पापकर्माविषयीं जरी माझी पूर्ण खात्री झालेली आहे तरी या कामांत कुलगुरूंच्या मतावर निर्णय ठेवणें हेंच मला अधिक श्रेयस्कर आहे. कारण--

साकी.

प्रजा सर्व मम मानी तिजला केवळ अपुली माता ॥ क्षोभ तिचा बहु होइल मजवरि मीहुनि तच्छल करितां ॥ श्रींनीं जरि दिधली ॥ आज्ञा भीती नच कसली ॥ १ ॥

(असें ह्मणून जातो)

प्रवेश २ रा. स्थळ. कारागृह.

———:*:———

(तान्ह्या मुलास घेऊन बसलेली अशी राणी सुदक्षिणा दासीसह प्र. क.)

राणी--देवा—

पद. चाल. जाते कीं मम ही.

स्त्रीजातीचा निंद्य जन्म हा कशास त्वां दिधला ॥
राज्ञी असुनी मी काय दशा आली तरि मजला ॥ध्रु.॥
व्यर्थ जिणें हें स्त्रीचें आहे खचितचि या भुवनीं ॥

सर्वथैव पतिवरती राहे ती अवलंबूनी ॥
तन्मन विटतां तिजला नमिळे वाली मग कोणी ॥
अपराध नमुळिं करितां होई पात्रचि शिक्षेला ॥१॥

गिरिजा—बाईसाहेब, प्रसंग येऊं नये तो आला. आतां त्याविषयीं दुःख किती करावयाचें. तुह्मी मनाच्या मोठ्या निग्रही आहांत तेव्हां धैर्य धरून या दुःखाचा प्रतिकार करण्याविषयीं मी आपणांस काय सांगावें ?

सुदक्षिणा--गिरिजे, तूं म्हणतेंस तशी मी खरीच धैर्यानें प्रसंगाला पाठ देणारी आहे. मी खरोखर निरपराधी आहे तर हें बंदिवासाचेंच काय पण याहून शतपट दुःख जरी त्यांनीं दिलें तरी तें मी मोठ्या आनंदानें सहन करीन. पण माझ्यामुळें दुसऱ्यानां होणारे दुःख मात्र मला सहन करवत नाहीं. पहा—

पद्य. चाल. सुटला पितृदिशेचा ही.

प्राणाहुनि जो प्रिय मज मानी ॥ तो रघुबालक मजपासोनी ॥ दूरचि ठेवियला बघ आहे नेवोनी ॥ बहु दुःखचि त्यासी होइल आतां ह्मणुनी ॥ १ ॥ तशि ही जन्मतांचि नृपदुहिता॥ उत्सव

किति तरि झाला असता॥पण या कारागृहिं पडली गे मजकरितां ॥ द्रव कोणा नच येइल ऐसी स्थिति बघतां ॥ २ ॥

गिरिजा—बाईसाहेब, सर्वांपुढें जाववेल पण दैवाच्या पुढें कोणाच्यानें जाववणार आहे? या बाळांस राजकुलांत जन्म देऊन गरिब लोकांच्या मुलानां जे सुख सोहाळे होतात ते देखील न होऊं देण्याचा त्या मेल्या दैवाचाच विचार होता; त्याला कोण काय करणार ? आतां आहे याच स्थितींत याच्याकडे पाहून तुह्मी आपलें समाधान मानून घेतलेंत ह्मणजे तेंच त्याचें मोठें भाग्य होणार आहे.

सुदक्षिणा--(मुलाकडे पाहून) बाळे, मजकडे टक लावून काय पहातेंस ? माझें दुःख अधिक कां तुजवरचें प्रेम अधिक हें समजून घेतेंस कां ? बये, तसें नाहीं बरें--

पद. चाल. जो मम नयन ही.

जें दुःख असें सांप्रत मजशी ॥ त्याच्या शतपट गे तुजपाशीं ॥ प्रीती आहे मम जरि ऐशी ॥ बंदिंत मी पडले ॥ १ ॥ तूं आणखि मी सारखि साची ॥ शोभा जशि तुज निर्मलतेची ॥ तशि आहे मज आचरणाची ॥ पवित्र पतिविषयीं ॥ २ ॥

गिरिजे, माझ्या बयेचें रूप पाहिलेंस कां कितितरी सुंदर आहे ! थेट त्यांची प्रतिमा आहे नाहीं बरें ?

गिरिजा—बाईसाहेब, मुली नेहमीं आईच्या वळणावर जातात. पण ही तर महाराजासारखी झाली आहे. यावरून महाराजानां आलेला खोटा संशय जाण्याकरितांच परमेश्वरानें इला त्यांच्या वळणावर घातलें असें मला वाटतें.

सुदक्षिणा—तिच्या कपाळीं सुख असलें आणि दैवाच्या मनांत माझा माथा उजळ करावयाचा असला तर तसें होईल.

(पडद्यांत) ' गिरिजे, राणी सुदक्षिणा काय करीत आहे? '

गिरिजा—कोण विचारते आहे ? (पाहून) बाईसाहेब, आर्या दाक्षायणी आपल्या भेटीला आल्या आहेत.

सुदक्षिणा—खरेंच कां ? जा त्यानां घेऊन ये.

(दासी जाते व पुन: दाक्षायणी सह प्र. क.)

दाक्षायणी—शिवशिव ! देवा काय ही या राज्ञीची स्थिति! इंद्राच्या अप्सरेलाही जी लाजविणारी तिला असा कारागृहवास प्राप्त व्हावा काय ? (राणीस) बाई, मुलगी खुशाल आहेना ? तुजवर जरी दुर्दैवानें असा महद्दु:खाचा प्रसंग आणला आहे तरी तिची हेळसांड करूं नको बरें ?

सुदक्षिणा—दाक्षायणीबाई, तुम्हाला काय सांगूं ?--

पद. चाल. बघुनि उपवनाही.

कन्या मज ही नसती झाली बरेंचि होतें तरी ॥
प्रसवुनि इजला सुख नच किंचित होई तें अंतरीं॥
प्राणपती ते वदल्यापासुनि अति कटु ती वैखरी॥
काय करूं मी कांहीं नसुचे बहु झाले बावरी ॥
॥ चाल ॥ मज जन्म थोर कुलिं कशास मिळला
तरी ॥ सखि निर्धनकन्या याहुनि असते खरी ॥
॥ चाल ॥ शल्यासम हा अपमान मला टोंचि-
तसे कीं उरी ॥ नको नको हा जिव कां न दया
यम मजवरि तो करी ॥ १ ॥

(असें ह्मणून दुःखानें तिच्या गळ्याला मिठी मारते.)

दाक्षायणी—मुली, रडें आवर तूं सूज्ञ असतां असें कां बरें धैर्य सोडतेस; पहा दुर्दैवानें मिथ्या अपवाद जगन्माता जानकीला देखील यावयाला राहिला नाहीं; पण तिनें तो निमूटपणें सोसला नाहीं कां ? तोच प्रकार सांप्रत तुजविषयीं झाला आहे; तर मन मोठें करून आजपर्यंत दुःख सोसलेंस तसेंच आणखी कांहीं दिवस सोस. देवाच्या घरीं तुझा न्याय

झाल्यावांचून रहाणार नाहीं. महाराजानां लागलेलें हें वेड लौकरच जाईल व तेच फिरून तुझी क्षमा मागण्याकरितां येतील या माझ्या वचनावर पक्का विश्वास ठेव.

सुदक्षिणा—बाई, तुम्ही केवळ धर्माच्या मूर्ती असून मला माझ्या मातेच्या ठिकाणीं आहां; मग मी तुमच्या वचनावर विश्वास ठेवला नाहीं तर मजसारखी पापी कोणी नाहीं. ईश्वर तुमचे बोलणें खरें करो.

दाक्षायणी--बरें मला एकदां माझ्या तान्हुलीला पाहूं दे. तूं बाळंतीण झाल्याचें ऐकल्यापासून तिला कधीं पाहीन असें मला होऊन गेलें आहे.

गिरिजा--बाई, ही पहा कशी चांगली आहे आणि बांधा तरि किति सुरेख आहे.

दाक्षायणी--(तिला घेऊन पाहून) मुली, अग ही तर थेट मला महाराजांची प्रतिमा दिसते. आणखी कशी हंसतमुख आहे तरी, मी जवळ घेतले पण मुळीं देखील रडत नाहीं.

गिरिजा--बाई, तिच्या अंगांत बाई साहेबांचे सगळे गुण उतरले आहेत, ही पुढें राणी झाल्यावर खचित यांच्यासारखी-च सर्वांनां प्रिय होईल. देव इला शंभर वर्षें आउक्ष देवो.

दाक्षायणी—मुली, या तान्हुलीला पाहून माझ्या मनांत एक विचार आला आहे. तुझी खुषी असेल तर मी इला घेऊन महाराजाकडे जातें; आणखी त्यानां दोन विचाराच्या गोष्टी सांगून पहाते. मी लहानपणापासून त्यानां वाढविलें असल्यामुळें त्यानां दोन शब्द बोलण्याची माझी सत्ता आहे आणि त्यांचाही माझें ठिकाणीं पूज्यभाव असल्यामुळें माझें भाषण अगदीं वाया जाईल असें मला वाटत नाहीं. आणखी या बाळाच्या गोडगोड लीला पाहून त्यांच्या अंतःकरणाला खचित पाझर फुटल्यावांचून रहाणार नाहीं.

सुदक्षिणा—बाई, माझ्याविषयीं आपल्या मनांत अति प्रेम असल्यामुळें माझी ही कष्टदशा जाण्याकरितां आपण हा जो विचार करता तो मला आवडला आहे, पण बाई मला यासंबंधानें मोठी भीति वाटतें. कारण—

पद—चाल. रुचती कां ही.

मजविषयीं राग भारी जरि आहे तन्मनीं ॥ त्या कथितां कोणि कांहीं नच घेती ऐकुनी ॥ घालविती बोलुनीया कटु वचनें तेथुनी ॥ तरि बघतिल यास कैसें सांगा मजलागुनी ॥ १ ॥

दाक्षायणी—मुली, तुला वाटते तसें मला नाहीं वाटत. कारण, त्यांचा राग तुजवर आहे या मुलावर कांहीं नाहीं. आणखी तसें जरी असले तरी केवळ दैवावर हवाला टाकण्यापेक्षां थोडथोडा प्रयत्न केलेला बरा.

सुदक्षिणा—बाई मजसाठीं प्रयत्न करण्याकरितां निरपेक्षबुद्धीनें तुह्मी आलांअसतां मी तुह्मांला नाहीं कसें ह्मणू ? (दासीस) गिरिजे, दे त्यांच्याजवळ बाळाला.

गिरिजा—(तसें करिते.)

दाक्षायणी—मुली, येते आतां. मी आपल्याकडून होईल तितका प्रयत्न करून तुझ्याविषयीं महाराजांचे मन पुनः चांगलें केल्याशिवाय रहाणार नाहीं. (असें म्हणून जाते.)

सुदक्षिणा—या बाईचें हे मजवर कितितरी उपकार आहेत ! परमेश्वरा—

पद--चाल. वाडचडिला ही.

परोपकारी ही मन्माता ॥ यत्न करी मम सौख्याकरिता ॥ मिळवुनि दे यश तरि तत्हस्ता ॥ अंत नको बघूं आणखि आतां ॥ १ ॥ निज दुहितेला अवलोकुनिया ॥ पाझर फुटुं दे तन्मृदु हृदयां ॥

मिथ्या संशय तो होउनिया ॥ पुनरपि करि मज त्या आवडती ॥ २ ॥

(पडदा पडतो.)

प्रवेश ३ रा. राजवाडा.

———:※:———

(राजा, आणि जयसिंह आसनस्थ प्र. क.)

दिलीप—(सचिंत) अरेरे ! सांप्रत माझी काय विलक्षण स्थिति झाली आहे तरी—

पद—चाल. दृष्टिस पडल्या ही.

शत्रूविषयीं काळजि भारी ॥ लागुनि राहिलि मजला अंतरिं ॥ ध्रु. ॥ त्यायोगे ती निद्रा म्हणुनी ॥ नचं ठावी काशि मजलागोनी ॥ तळमळ करितो बहु दिनरजनीं ॥ उपाय आतां काय करूं तरि ॥१॥

उपाय कसचा. हे माझे शत्रू जिवंत आहेत तोपर्यंत माझी ही स्थिति पालटण्याची आशा नको. एक शत्रु ही जारिणी, दुसरा तो तिचा जार, आणि तिसरा त्यानां सहाय करणारा

तो अधम वसुभूति. सांप्रत ते दोघे माझ्या हाती लागणें अशक्यच आहे. तथापी इचा वध करून कांहीं मनाला समाधान वाटलें तर पहावें. कुलगुरूंचा निदेश आणावयास मधुसूदन आणि जनार्दन यास पाठविलें आहेच. शिवाय तिची न्यायासनासमोर चौकशी करवावी, म्हणजे प्रजाजनानां मला दोष देण्याला मुळीं जागा रहाणार नाहीं. तर आतां त्या उद्योगाला लागावें. (उघड) जयसिंह, रघुबालाची प्रकृति आतां कशी आहे ?

जयसिंह—सरकार काल रात्री त्यानां झोंप लागली होती, तथापी अद्याप त्यांच्या अंगांत ताप आहे, पण त्याची विशेष काळजी करावयाला नको.

राजा—(स्वगत) पोरगा इतका लहान आहेना पण त्याला किती कळतें आहे पहा. तिला मी तूं जारिणी आहेस असें ह्मटल्यापासून—

पद—चाल. भूपती खरे ते ही.

त्या दुःखानें तो मनिं झुरेचि दिनरजनीं, शिशुपणिंचे देई खेळ सर्व सोडोनी, पुष्पासम कोमल तद्वपु आहे ह्मणुनी ॥ दुःखाग्नी हा त्या टाकितसे जा-

ळोनी ॥ निर्दोषी वाटे त्याला अपुली जननी ॥ मी उगाच छळितो तिस कलंक लावोनी ॥ १ ॥

(ऊघड) कांहो, जयसिंह कुलगुरूकडे जनार्दन आणि मधुसूदन गेल्याला किति दिवस झाले बरें.

जयसिंह— आजच महिना झाला; बहुतकरून आतां ते लवकरच परत येतील

दिलीप—कुलगुरूंच्या निदेशाकडे माझे सारखे डोळे लागून राहिले आहेत. त्यांच्यावांचून माझी संशयनिवृत्ती कोणीही करण्यांस समर्थ नाहीं.

(मुलीला घेऊन दाक्षायणी प्र. क.)

दिलीप—(पाहून) अरे, या कोण? दाक्षायणीबाई; बाई, एकाएकीं तुमचें इकडे येणें कोणीकडे? आणि हें जवळ काय?

दाक्षायणी—अलिकडे महाराजांची प्रकृति ताळ्यावर नाहींशी झाली आहे ह्मणून औषध देण्याकरितां आलें.

दिलीप—तुह्मी कसले औषध देणार? आणि मला झालें आहे काय?

दाक्षायणी—कांहीं झालें नाहीं तर मग असें भलभलतें कां करितां? महाराज, मी आपली धात्री आहे. आपणांस लहानाचे मोठें मीच केलें आहे तेव्हां कळकळीनें माझ्या तों-

डांतून आपणास दोन कडू शब्द निघाले तर ते ऐकून घेऊन त्याचा नीट विचार करा. केवळ इतराप्रमाणें मला लेखू-नका.

दिलीप—काय बुवा त्रास तरि ही !

दाक्षायणी—महाराज, यावेळीं आपणांस माझा त्रास वाटतो आहे खरा; पण परिणामीं माझें भाषण हितकर होतें अशी आपली खात्री झाल्यावांचून रहाणार नाहीं.

दिलीप—बाई, आपलें ह्मणणें तरी काय आहे ?

दाक्षायणी—ह्मणणें दुसरें काय असावयाचें ? त्या माउली-चा हल्लीं जो आपण नाहक छळ मांडला आहे तो परिणामीं आ-पल्या कुलास घातक आहे.

दिलीप—कोण माउली ? आणि छळ कसला ?

दाक्षायणी—कोण माउली ह्मणजे ? आमची स्वामिणी ! महाराजांची पत्नी ! राणी सुदक्षिणा ! खरेंच तिला कोण माउली ह्मणणार नाहीं ? गरिब बिचारी ! आणि तिला कारा-गृहांत टाकून नाहीं कां आपण तिचा छल मांडला ?

दिलीप—एकूण तुह्मी तिच्या तर्फे वकीलपत्र घेऊन मजशीं भांडायला आला आहांत. तर मी तुह्मांला अगोदरच सांगतों कीं या तुमच्या वकीलीचा कांहीं उपयोग होणार नाहीं.

दाक्षायणी—होणार कां नाहीं पण ? मी महाराजांची तशीच खात्री करीन. महाराज, जरा शांत व्हा! आणि आपली स्त्री प्रसूत होऊन तिला हें कन्यारत्न झालें आहें याकडे नीट पहा· (त्याच्या समोर मुलीला ठेवते) अगदीं थेट आपली प्रतिमा आहे कीं नाहीं ? जयसिंह तुह्मी पहा आणि करा महाराजांची खात्री, हें नाक, डोळे, कपाळ, तसेच गाल हुबेहुब महाराजासारखीं आहेत कीं नाहीं पहा.

दिलीप--बाई, कशाला हें कारटें मज समोर घेऊनआलांत हे माझें नाहीं त्या जाराचें भद्रसेनाचें आहे. जा याला घेऊन लौकर आणि टाका नेऊन नदींत.

दाक्षायणी—महाराज काय हें आपण बोलतां ? क्रोधानें मन इतकें भडकूं देऊं नका ! कांहीं तरी विचार करा. राणीवर जो हा आपण दोषारोप करीत आहां याबद्दल आपणांस काय बरें पुरावा मिळाला आहे ! केवळ आपला संशय हाच कीं नाहीं.

दिलीप--बाई आतां आपण हें चऱ्हाट किती लांबवणार ! तुम्हांला हात जोडून सांगतो कीं तुम्ही किती जरी माझ्या कानाशीं किटकिट केलींत तरी माझा झालेला ग्रह कांहीं बदलणार नाहीं; यासाठीं तुम्ही आल्या तशा परत जा.

दाक्षायणी—महाराज नका बरें आपलाच हेका धरून बसूं; माझे म्हातारीचे शब्द नीट लक्षांत आणा आणि या गरीब बालकाकडे पहा, जसा रघु तसेंच हें आहे. आपणांस क्रोधानें डोळे फिरून गेल्यांमुळें जरी तसें दिसत नाहीं तरी लोकांची खात्री झाल्यावांचून रहाणार नाहिं; व या आपल्या अविचाराच्या कृत्याबद्दल ते आपणांस दोष लावल्यावांचून रहाणार नाहींत.

दिलीप—बाई, आतां जाण्याची मेहरबानी करतां कां नाहीं. नाहीं तर हे पहा माझें मस्तक यावेळीं इतकें फिरून गेलें आहे कीं आजपर्यंत तुमचा उपमर्द केला नाहीं पण तुम्हांला येथून घालविण्याकरितां मला करणें भाग पडेल.

दाक्षायणी—महाराज, इतकी वेळ कांहीं यावयाला नको; माझा खरोखरीच आपणांस त्रास झाला असेल तर ही मी चालले. (मनांत) आतां यानां अधिक बोलून कांहीं उपयोग नाहीं. मुलाला येथें ठेऊन जावें. कांहीं वेळानें त्याच्या लीला पाहून यांच्या मनांत कांहीं प्रेम आल्यावांचून राहणार नाहीं. (उघड) पण हे मूल मी येथें ठेऊन जाते. हे खरोखर आपलें आहे; आपण जरी याचें रक्षण न केलें तरी ज्यानें याला निर्माण केलें आहे तो संभाळण्यास समर्थ आहे; पण

मिथ्या संशयानें नेत्रानां आलेला हा अंधपणा टाकून द्या. जन काय म्हणेल याचा विचार करा. हें मी वारंवार आपणांस बजाऊन सांगतें.

(असें म्हणून मुलाला तेथेंच ठेऊन निघून जाते.)

दिलीप—(मनांत) गेली एकदांची पीडा. वरें पण हा काय वरें चमत्कार !—

पद. चाल. स्फटिकांचे हे ही.

कोमल बालक हें पाहुनिया ॥ द्रव येई कां या मम हृदयां ॥ धृ० ॥ शत्रुबीज कीं ठाउक असुनी ॥ जवळी घ्यावें वाटे कां मनिं ॥ मोह पडे तह्लीला बघुनी ॥ कोण पिता ह्मणुं मी कां तो या ॥ १ ॥

नाहीं पण हें माझ्या शत्रूचेंच आहे याचें पालन केलें तर जगांत सर्वत्र माझी थट्टा होईल. (उघड) जयसिंह, मी तुम्हांला एक काम सांगतों तें आताच्या आतां करा.

जयसिंह—असें कोणतें काम सरकार ?

दिलीप—दुसरें कांहीं नाहीं. या कार्ट्याला येथून घेऊन जा आणि ठार मारून टाका. आणि घटकेच्या आंत काम

करून मला खूण घेऊन या. उचला याला हें काम तुम्हींच केलें पाहिजे.

जयसिंह--सरकार, सेवकाची चरणापाशीं विनंती आहे कीं, त्यांनीं अशा अघोर कृत्यास प्रवृत्त होऊं नये, इतकी आह्मां सेवकावर मेहेरबानी करावी. खचित यापासून कांहीं तरी अनर्थ ओढवल्यावांचून रहाणार नाहीं.

दिलीप—(मनांत) माझे परिजन असें ह्मणतात आणि माझीही तशीच स्थिती होते हें काय बरें?--पहा--

पद, (चाल आकर्षुनि धनुही.)

एकवार मज वाटे ऐसें कीं याला नच मारावें ॥
परि पुनरपि मनिं येई कीं हें या जगांत नच राहावें॥
दोहिकडे यापरि मन जाउनि निश्चय कांहीं होईना ॥ प्रतिकुल वातें विभिन्नता जशि गगनीं मेघां येईना ॥ १ ॥

(उघड) कां हो जयसिंह तुह्मांला या पोराची फार कींव येतें नाहीं?

जयसिंह---होय सरकार मला इतकी दया येतें कीं याला वांचविण्यासांठीं पाहिजे तर मी आपला प्राण देईन.

दिलीप---तर मग असें करा---

साकी.

देशांतरि हें फार दूर शिशु तुम्हि जावें घेवोनी ॥ जैसे येथें येई तेथें तैसें द्या सोडोनी ॥ ज्यानें जन्म दिला ॥ तो विधि रक्षिल कीं याला ॥ १ ॥

जा. हें काम तुम्हांला केलेंच पाहिजे नाहींतर तुमचा प्राण राहणार नाहीं.

जयसिंह---महाराजांची आज्ञा होतें त्यापेक्षां तसें करितों. पण मृत्यूचीदेखील शिक्षा, याहून बरी होती. देशांतरीं याचें रक्षण कसें होणार ?

दिलीप---होवो अगर न होवो; तुम्ही आपले याला नेऊन सोडून द्या . चला आतां वेळ लाऊंनका.

जयसिंह---शिव शिव देवा ! काय हा मजवर प्रसंग !

(असें म्हणून जातो.)

दिलीप---

दिंडी.

पोर दुसऱ्याचें असोनिया ठावें ॥ काय निज मी

मानुनि वाढवावे ॥ नसे इतका मज साधुपणा आला ॥ दिली शिक्षा ही योग्य असे त्याला ॥१॥

आतां ठरल्याप्रमाणें लौकर पुढील कार्यभाग कण्याच्या उद्योगाला लागावें.

साकी.

न्यायसभेमधिं त्या जारिणीची चौकशी ती करूनी ॥ अपराधी ठरवुनि वधशिक्षा देतो तिज लागोनी ॥ भीती नच साची ॥ मज मग मुळि या पौरांची ॥

असे ह्मणून निघून जातो.

अंक तिसरा.

प्रवेश १ ला. स्थळ. हिमालयपर्वत.

(तदनंतर योगधारणा करीत असलेले श्री परमहंस स्वामी प्र. क.)

स्वामी—

पद. राग मालकंस.

जय जय ईशा श्री जगदीशा ॥ गिरिजारमणा अहिवरभूषा ॥ पिनाकपाणी व्याघ्रांबरधर त्रिपुरांतक हर अघनगनाशा ॥ १ ॥ सुरमुनिवरनुत चरणा शरणांगतभयहरणा विचित्रवेषा ॥ २ ॥ कैलासाचलवासापशुपति संहर संहर या भयपाशा॥

खचित सच्चिदानंद परमेश्वराच्या स्मरणांत जो परमानंद चित्तास प्राप्त होतो तो या जगांतील सुखाच्या मानलेल्या को-

णत्याही पदार्थापासून प्राप्त होणें नाहीं. असें असतां हा केवढा चमत्कार आहे पहा--

पद. चाल. मलिनवस्त्र परिधान हीं.

मूढ सर्व हे लोक कसे या विसरुनि आनंदा ॥ प्रपंचपाशीं गुंतुनि धरिती विषयाच्या छंदा ॥ ॥ धृ० ॥ स्त्रीपुत्रांच्या प्रेमासाठीं शिणती दिन-रजनीं ॥ पापकर्म आचरुनी करिती धनसंचय सदनीं ॥ मरणाचें भय लवही ठावे नच त्यानां स्वमनीं ॥ सुखार्थ झटतां दुःख मात्र त्या मिळते मतिमंदा ॥ १ ॥

माझ्या पूर्वसुकृतानें या प्रपंचांतील तापाविषयीं माझें मन लौकरच शुद्धीवर येऊन सार्वभौम दिलीपराजाचें कुलगुरुचें महत्पद प्राप्त झालें असतांही मी तें सोडलें. आणि--

साकी.

**होण्या मोक्ष ज्ञान सदा या हिमगिरिवर राहोनी॥
साधन योगाचें चालविलें आहे मी दिनरजनीं ॥
आतां हेंच खरें ॥ वाटे मजला सुख सारें ॥ १ ॥**

यामुळें सांप्रत मी सर्वजगाचा जरी संबंध सोडला आहे;

तरी राजा दिलीपाचें प्रिय कसें होईल ही त्याच्या माझ्याठायीं असलेल्या दृढ भक्तीमुळें माझी चिंता गेली नाहीं. आज फार दिवसांत त्यानें मला तिकडील वर्तमान कां बरें कळवलें नाहीं? अंतर्ज्ञानानें पाहूं कां? अथवा कशाला? तेथें सहसा कांहीं अनिष्ट प्रकार घडावयाचा नाहीं. कारण—

दिंडी.

भूप केवळ तो असे धर्ममूर्ती ॥ प्रजा मानी त्या पित्यापरी चित्तीं ॥ धर्मराजासम अजितशत्रु थोर ॥ असे कलियुगीं हा नृप दिलीप शूर ॥ १ ॥

(जनार्दन आणि मधुसूदन प्र. क.)

जनार्दन--मधुसूदना, या हिमालयाची शोभा पाहिलीस कां कशि रमणिय दिसत आहे ती--

पद. चाल. दिसती जों जों ही.

उंच किती तरि दिसती याचीं शिखरें नयनाला ॥
भेदुनि टाकिलि वाटे प्रजला यांनीं घनमाला ॥
त्यापरि येथिल जुनाट तरु हे आच्छादिति रविला ॥
सिंहादिक पशु येथें करिती वास सदा अपुला ।

निर्झररव गिरिकंदरिं बघ हा दुमदुमनी गेला ॥
महाप्रभंजन लागुनि थरथर कांपवि शरिराला॥१॥

मधुसूदन—जनार्दना, यास्थलीं आल्यापासून माझ्या मनाला तर विरक्तताच उत्पन्न झाली. पहा--

पद. चाल. निजरूपीं जगदाकृतिही.

स्थल पवित्र कितितरि हें भासे ॥ वैकुंठाचि जणुं दुसरें विलसे ॥ धृ० ॥ सर्व ताप तो संसाराचा ॥ सोडुनि करुनी निग्रह साचा ॥ अनुभव येथें कीं योगाचा ॥ घ्यावा ऐसें मज वाटतसे ॥ १ ॥

जनार्दन--या पर्वताच्या ठायीं जात्याच इतकी पवित्रता असल्यामुळें येथें तप करणारांस हटकून सिद्धि प्राप्त होते. बरें, मधुसूदना, श्री परमहंसस्वामींची गुहा कोठें आहें? आपल्याला महाराजांचें पत्र देऊन त्यांचा निदेश घेऊन लौकरच परत गेलें पाहिजे.

मधुसूदन—ती येथें जवळच आहे. जनार्दना, राहून राहून महाराजांच्या कृतीविषयीं मला आश्चर्य वाटतें. राणीसाहेबावर त्यांची इतकी प्रीति असतां ती एकाएकीं नाहिशी

होऊन त्यानां असा मिथ्या संशय कसा आला व ते त्यांचा इतका छल करण्यास कसें प्रवृत्त झालें ?

जनार्दन--दैवाची गति विचित्र आहे ! आतां कुलगुरु कडून आमच्या राणीसाहेब निर्दोषी ठरून महाराजांच्या पुनः प्रीतीस पात्र होवोत हीच त्या सर्वेश्वरापाशीं प्रार्थना आहे.

मधुसूदन--जनार्दना, ही पाहिलीस कां गुहा ! आणि त्यांत बसलेली श्री स्वामींची आनंदमूर्ती ! !

जनार्दन—(पाहून) मधुसूदना—

पद. काय मग नवलही.

पर्णकुटिका किती रम्य दिसतोचि ही पाप लवही नसे तींत पाही ॥ काम कोपादि ते प्रबळ षड्-रिपु अशा स्थलिं न घटिकाभरी वसति कांधि-हीं ॥ धन्य मी आज मज वाटतें या जनीं ॥ देखिलें स्थल असें शांत ह्मणुनी ॥ १ ॥

मधुसूदन—जनार्दना, श्री परमहंस स्वामींची मूर्ति नीट डोळेभरून अवलोकन कर—

पद. चाल. मला शांत मुनिही.

लोंबती शिरिं कशा दीर्घ पिंगा जटा तेंवि कंठांत

रुद्राक्षमाला ॥ देह भस्में पहा सर्व तो चर्चिला
तेज किति तपबलें येइ त्याला ॥ धन्य मम जन्म-
हा होय वाटे मला ॥ घेउनी पुण्यजनदर्शनाला १

जनार्दन—मधुसूदना, चल आतां त्यांच्या जवळ जाऊं; आणि त्यांनां महाराजांचें विनंतीपत्र देऊं.

मधुसूदन—ठीक आहे चला.

(दोघे स्वामीजवळ जाऊन त्यानां नमस्कार करितात.)

स्वामी—(आशिर्वाद देऊन) बसा खालीं. आपण कोण व इकडे अशा निर्जन स्थलीं येण्याचें कारण काय?

दोघे—आह्मी स्वामींचे प्रिय शिष्य दिलीप भूपति, यांच्या कार्याकरितां सांप्रत श्रीच्या संनिध आलों आहोंत. आतां महाराजांचें कार्य कोणतें तें त्यांनीं आपणांस विनंतीपत्र दिलें आहे तें स्वामींनीं वाचलें असतां त्यांस कळेल. तें वांचून त्याचें उत्तर स्वामींनीं लौकर देण्याविषयीं महाराजांनीं विनंती केली आहे. (पत्र देतात)

स्वामी—(पत्र वाचतात) श्रीकुलगुरु तपोनिधि परमहंसस्वामी यांचे शेवेसी राजा दिलीप याचा कृतानेक साष्टांग नमस्कार. स्वामींचे कृपें क्षेम आहे. विशेष स्वामीनां पत्रीं विनंती करण्यांत येत आहे कीं, माझा बालमित्र राजा भद्रसेन मला

येथें भेटावयाला आलाअसतां माझी स्त्री सुदक्षिणा इनें त्याच्याशीं व्यभिचार केला व प्रधान वसुभूति यांस अनुकूल करून घेऊन मला ठार मारण्याचा बेत केला व हा सर्व बेत मला कळल्यावर तिनें त्या दोघांस रातोरात पळवून लाविलें अशी माझी अनेक कारणावरून खात्री झाल्यावरून मी तिला सांप्रत कारागृहांत टाकली आहे. पण माझे सर्व प्रजाजन या माझ्या कृत्यानें संतापून जाऊन त्यांनीं अनेक प्रकारें मला दोष लावण्यास आरंभ केला आहे. तर स्वामींनीं अंतर्ज्ञानानें सर्व खरें वर्तमान जाणून राज्ञी दोषी आहे कीं हा माझा संशय खोटा आहे हें ताबडतोब कळवावें. म्हणजे तिला शासन अथवा क्षमा करण्यास ठीक पडेल. कळावे.

स्वामींचा एकनिष्ठ सेवक.
राजा दिलीप.

एकूण सांप्रत असा प्रकार झाल्यामुळें तुम्ही इकडे आलां आहांत काय ? असो. मी याचें ताडपत्रावर उत्तर लिहून देतों तें तुम्हीं न वांचतां राजाच्या स्वाधीन करा. (ताडपत्रावर लिहून देतात)

दोघे—(तें घेऊन) आतां आम्ही श्रीचा निरोप घेतो.

स्वामी—ठीक आहे. (दोघे जातात.) शिव शिव ? पंच

महा पतिव्रतांच्या पंक्तीस बसण्यास योग्य अशी राज्ञी सुद-क्षिणा, तिजविषयीं मिथ्या संशय दिलीप राजास येऊन तिला त्यानें कारागृहांत टाकिली काय ? प्राणहून प्रिय जो बालमित्र भद्रसेन भूपति व एकनिष्ठ प्रधान वसुभूति यांच्याशी वैर जोडलें काय ? तस्मात् मानवी स्वभाव कांहीं विचित्र आहे, असो; या माझ्या पत्रानें तरी त्याचा सर्व संशय निरसन होऊन तो आपल्या स्त्रीवर व मित्रावर पूर्वीप्रमाणें प्रेम करो. (वर पाहून) अरे, अगदीं माध्यान्हस्नानाची वेळ झाली तर आतां मंदाकिनवर जावें.

पद. चाल. प्रिये पहाही.

सदाशिवा ॥ हे दिलीप नृपतीते तूं सदा शिवा ॥ धृ ॥ दीर्घ काल महिला या ॥ न्यायानें पाळु-निया ॥ मिळवो तो या लोकीं सर्वांमुखिं वाहवा ॥ १ ॥ भद्रसेन ताच्चिता ॥ पुनरपि करि आवडता॥ प्रेम जडो स्त्रीवरती सेवो सौख्यार्णवा॥ २ ॥

(असें ह्मणून जातात.)

प्रवेश दुसरा——न्यायसभा.

——:o:——

(न्यायाधीश व कायस्थ आसनावर बसले आहेत)

न्यायाधीश--अहो कायस्थ, आज प्रथम व्यवहार कोणाचा आहे ?

कायस्थ--आज न्यायासनासमोर जो प्रथम व्यवहार चालवयाचा आहे तो फारच दुःखकारक आणि आश्चर्यजनक आहे. व्यवहारांत व्यवहारकर्ते खुद्द आपले दिलीप महाराज असून प्रतिपक्षाकडे त्यांचीच पत्नि आहे.

न्यायाधीश--शिव शिव ! अहो कायस्थ, आजचा दिवस आह्मांस मोठा संकटाचा आहे. कारण—

पद (चाल. जीं जीं कर्में ही.)

प्रतिकुल मिळतां नय भूपा तो जाइल कोपोनी ॥
निज सत्तेनें दूर करिल मज अधिकारावरुनी ॥
अथवा अनुकुल होता मग ती सुदक्षिणाराणी ॥
कष्टी होउनि शाप बहुत ते देइल दिनरजनीं ॥
या सर्वांचे सांप्रत पडलें भय मजलागोनी ॥ असें
भयंकर थोरपणा हा वाटे या भुवनीं ॥ १ ॥

अथवा, साक्षीपुराव्यावरून जो खरा न्याय दिसेल तो देण्यास न्यायाधिशास मुळींच पाप आणि भय नाहीं. परमेश्वरा,

साकी.

इतुकीच असे तव चरणीं ही या कालीं मद्विनती ॥ याव्यवहारीं न्यायापासुनि नकरी मम दूरमती॥न्यायाची कीर्ती॥होइल भूषास्पद मज ती॥१॥

बरें कायस्थ, महाराजानां बोलवा.

कायस्थ—सेवका, न्यायमूर्तींनीं महाराजानां बोलावलें आहे असें सांगून घेऊन ये.

सेवक—(जातो व राजासह पुनःप्र. क.) असें इकडून यावें सरकार.

दिलीप—(तसें करून) अहो न्यायमूर्ती, आपणासमोर आजचा हा व्यवहार चालवितानां मला फार वाईट वाटत आहें. कारण यांत अपराधिनी राजकन्या आणि राजभार्या अशी माझी राज्ञी सुदक्षिणा ही आहे. इजवर माझें पूर्वी फार प्रेम होतें तथापी इनें माझ्या विरुद्ध कांहीं कृत्यें केल्यावरून इला मी बंदित टाकलेअसतां मी तिचा नाहक छल करितों असा लोकांनीं मजवर दोषारोप आणला आहे; तो मिथ्या आहे अशी त्यांची

खात्री होण्यासाठीं हा व्यवहार चालविणें मला भाग पडलें आहे; तर आतां हा व्यवहार चालवून न्यायमूर्तीनीं योग्यतो न्याय द्यावा मग त्यांत राज्ञी सदोष ठरो कीं निर्दोष ठरो तें मला मान्य आहे. आतां राज्ञीला न्यायसभेंत आणण्याविषयीं सांगावें.

कायस्थ--अरे, सेवका, सुदक्षिणा राणीसाहेबांस हें सर्व वर्तमान सांगून त्यानां न्यायसभेंत घेऊन ये.

सेवक--(जातो. व पुनःयेऊन) या पहा त्या आल्या.

(राणी सुदक्षिणा, गिरिजा, व दाक्षायणी प्र. क.)

सुदाक्षिणा--

पद. चाल. व्यर्थ आम्हीहि.

किति छळिशी मजला ॥ दुर्दैवा ॥ धृ. ॥ कारागृहिं मम दुःख पुरें कां झालें नच तुजला ॥१॥ ह्मणुनी कराविशे न्यायसभेमधिं माझ्या चौकशिला ॥२॥ याहुनि होइल फार बरें जरि देशिल फांसाला॥३॥

न्यायाधिश—अहो, कायस्थ आतां व्यवहार पत्र वाचा.

कायस्थ—(वाचतो) राजाधिराज मथुराधिपति दिलीप महाराज यांचा व्यवहार त्यांची पत्नी राज्ञीसुदक्षिणा इजशीं. व्यवहार करण्याचें कारण राज्ञीनें भद्रसेनराजाशीं व्यभिचार

केला व आपल्या पतीचा प्राण हरण करण्याविषयीं प्रधान वसुभूति यांस सहाय केलें आणि हा हेतु बाहेर आलाअसतां राज्ञीनें भद्रसेन व वसुभूति यांचें जीवित रक्षावें म्हणून त्यांना रातोरात येथून पळवून लाविलें याप्रमाणें निरनिराळे तीन आरोप राज्ञीसुदक्षिणा इजवर आहेत.

सुदक्षिणा—हाय हाय !

पद. चाल. पांडुनृपतिही.

असतां मी नृपनंदिनि ॥ तशि दिलीपनृपगृहिणी ॥ वीरपुत्र प्रसवूनी ॥ व्यर्थ जाहले ॥ १ ॥ ऐकतसे हें याहुनि ॥ बधिरा जरि होते जनिं ॥ नच कांहीं मग कळुनी ॥ येतसे मला ॥ २ ॥ कुलवतिला काय दशा ॥ आणिशि ही जगदीशा ॥ वाटे तुज मौज अशा ॥ काय संकटीं ॥ ३ ॥

न्यायाधीश—राणीसाहेब, या न्यायदेवतेपुढें आजपर्यंत सत्याचाच जय झाला आहे. व पुढेंही त्याचाच होईल. हें जाणून शपथपूर्वक खरें सांगा. महाराजांनीं लागू केलेले हे अपराध आपणांस कबूल आहेत काय?

सुदक्षिणा—शिव शिव ! आपण हें काय विचारतां ?

पद. चाल. वद जाऊं कुणालाही.

ही पुरी ॥ खोटि वैखरी ॥ फार अंतरीं ॥ टोंचि मजला ॥ छल उगाच कां मांडियला ॥ अजवरी॥प्रेम पतिवरी ॥ पूर्ण मी करी ॥ साक्ष याला ॥ ते असती यासमयाला ॥ हें कसें ॥ पाप मग असें ॥ मन्मनीं वसें ॥ दोष ऐसा ॥ नच कुलजा साहिल सहसा ॥ ही जरी ॥ नयसभा खरी ॥ असे महीवरी ॥ खचित माझी ॥ तरि सुटका होइल आजीं ॥ १ ॥

दिलीप--आधीं कुकर्म करण्याचें धाडस जिच्या हातून झालें तिच्या हातून तें केलें नाहीं असें खोटें बोलण्याचें धाडस होणार नाहीं असें नाहीं. तेव्हां नुसतें असें ह्मणून तें खरें थोडेंच ठरणार आहे.

सुदक्षिणा--माझें बोलणें असत्य वाटेल तर वाटो पण दुसऱ्या स्त्रियांचा दाखला मला देऊं नये. मीं जें खरें आहे तेंच सांगितलें.

दिलीप--जारिणी--

साकी.

भद्रसेन भूपतिशी करुनी जारकर्म मग होसी ॥

वसुभूतीला सहाय हरण्या या माझ्या प्राणासी ॥
खोटे कां वदसीं ॥ नय भीती कां नच तुजसी ॥१॥

सुदक्षिणा--आपण हें मजवर निवळ कुभांड घेतलें आहे पण खचित मी अगदीं निर्दोषी आहे. अहो, न्यायमूर्ती, तुह्मी सर्व लोकरीति जाणत आहां तेव्हां यांत मी वावगें काय केलें तें सांगा:--

पद. चाल. भूपती खरे तेही.

बालमित्र यांचा यानां बहु दिवसांनीं ॥ भेटाया
आला उत्सुकता मनिं धरुनी ॥ तत्स्वागत केलें अ-
सतां आज्ञेवरुनी ॥ दोष काय यामधिं घडला
तरि मजकडुनी ॥ चाल ॥ शिव शिव हा व्य-
भिचाराचा मजवरी ॥ व्यर्थ आळ आणिला आहे
यापरी ॥ चाल ॥ मी ऐसें केलें नसतें मज
लागोनी ॥ तरि तिकडुनि दूषण दिधलें असतें
यांनीं ॥ १ ॥

आणखी मज अभागिनीवर दुसरा जो आरोप केला आहे त्याचें निराकरण करणें देखील मजसारख्या कुलांगनेला लज्यास्पद आहे. पहा -

पद. चाल. युवराज शिवाजीसही.

जिस कुलजा मानिति कीं लोक अंतरीं ॥ ती पतिला मानितसे दैवतापरी ॥ निजभूषण निजजीवन सौख्यहेतु तो ॥ वाटुनिया तिजला कीं सतत राहतो ॥ त्याविषयीं निंद्य कर्म मगचि हें असें ॥ या स्त्रीच्या करिं सांगा केवि होतसें ॥ १ ॥

आणि या अशा भयंकर कृत्यांत आजपर्यंत महाराजाशीं एकनिष्ठपणानें वागलेला वसुभूति मला सहाय करील काय? त्या वसुभूतीस व भद्रसेनास मीच पळवून लावलें असा मजवर तिसरा आरोप आणिला आहे. पण मी परमेश्वराचीच शपथ घेऊन सांगतें कीं ते येथून केव्हां गेले हे मला मुळींच माहीत नाहीं.

दिलीप—काय ह्मणतेंस? ते केव्हां गेले हे तुला ठाऊक नाहीं? तूं नाहीं त्यानां पळवून लावलेंस? भद्रसेनाशीं जें तूं पापाचरण केलेंस ते देखील तुला ठाऊक नाहीं? आणि त्याप्रमाणें माझा प्राण हरण करण्याचा हेतु देखील तुझ्या आठवणींतून गेला असेंचनां? एकूण स्त्रियाविषयीं जें कोणी असें ह्मटलें आहे तें अगदीं खरें आहे.—

पद. चाल. मुनिच्या तपाही.

स्त्रीजाती ही या भुवनीं ॥ लोभ कपट साहस

आहे या त्रिगुणांची खाणी ॥ १ ॥ अविनय तेची कीं नगरी ॥ संशयवापी तशि दोषांची बनली नादिच खरी ॥ २ ॥ सुरासुराही नचें ईचा ॥ अंत मिळे हा करंडक असे विधिच्या मायेचा ॥३॥ आशी विषरूपी अमृताची ॥ जाती मकळे कुणि निर्मिलि करि हानी धर्माची ॥ ४ ॥

सुदक्षिणा—महाराज, मी न्यायासनासमोर जें सांगितलें आहे तें खरें आहे; तसें आपणांस वाटत नसेल तर माझी काय वाट लावणें असेल ती लावावी. पण काळजाला घरें पाडणारे असे शब्द उच्चारूं नये.

दिलीप—मी ह्मणतों तें खोटें आहे कीं काय ? तूं अपराधी आहेस अशी माझी पूर्ण खात्री झालेली आहे—

पद. चाल. नाहि सुभद्राही.

भद्रसेन भूपतिशी तूं जें जारकर्म केलें ॥ तत्फल तुजपासुनि पोरचि तें जाण असे झालें ॥ लज्जा सोडुनि मजकडेस तूं त्याला पाठविलें ॥ पण रिपुचें तें ह्मणुनी विपिनीं मी टाकूनि दिधलें ॥ तत्हत्येचे पातक तव शिरिं आहे तरि बसलें ॥ तें भोगाया लौकरि तुजला समज भाग पडलें ॥१॥

आतां, त्या कार्याप्रमाणेंच तुलाही शासन होणार आहे. आणखी पहा. ही न्यायदेवता मोठी उग्र आहे इच्या समोर असत्य कधीं पचलें जाणार नाहीं यासाठीं आपले अपराध कबूल कर आणि मरणाला तयार हो.

सुदक्षिणा--महाराज इतकी मला मरणाची भीती ती काय दाखवितां मी मरणाला तयार आहे. आणि तशांत मी या जगांत आतां राहण्याची इच्छा तरी कां करावी? पहा--

पद. चाल. अजि शेवटचाही.

जीवित केवळ जें माझें प्रेमचि अपुलें ॥ तें तर कीं विलया गेलें ॥ या प्राणाहुनि ही आवडते मज झालें ॥ रघुबालक दूरचि नेलें ॥ जें दों दिवसांचें तें माझें तान्हेलें ॥ जन्माचें मज अंतरलें ॥ चाल ॥ वरचेवर जारिणी वदुनी ॥ ताडियलें दुःशब्दांनीं ॥चाल ॥ मी प्रसूतिका अशि असतां येथें आणिलें ॥ किति विटंबनेतें केलें ॥ १ ॥

या सर्व गोष्टींचा विचार करून आपणच पहा कीं सांप्रत मी मरणास किती प्रिय मानतें आहेती! तथापि--

अंजनीगीत.

थोरकुलीं मी झाले ह्मणुनी ॥ लौकिक वाटे प्रियप्राणाहुनि ॥ लावियला जो तुह्मि मज लागुनें ॥ कलंक जारिणिचा ॥ १ ॥ जावा तो मरणाच्या आधीं ॥ होइल माझें प्रिय जें त्यामधिं ॥ मिळेल नच तें स्वर्गीही कांय ॥ कथिते प्रियनाथा ॥ २ ॥

तर जिवाच्या आशेनें मी आपणाजवळ विनंती करीत नाहीं, पण उभयकुलांच्या कीर्तीसाठीं इतकें मागणें मागते कीं आपण मजवर हा मिथ्या दोषारोप करीत आहां यास आपल्या संशयाशिवाय दुसरा काय बरें पुरावा आहे ? अशानें मी या सभेत कधीं दोषी ठरणार नाहीं; त्यास यापेक्षां अधिक बलवत्तर प्रमाणें पाहिजेत. तर आपण कुलगुरूंचा निदेश आणण्याकरितां जनार्दन आणि मधुसूदन यांना पाठविलें आहे ते श्रींचा निदेश आणींपर्यंत तरी माझा प्राण घेण्याविषयीं उतावळेपणा करूं नये.

(एकसेवक प्र. क.)

सेवक—सरकार, बाहेर स्वामींचा निदेश घेऊन जनार्दन आणि मधुसूदन आले आहेत.

दिलीप—ते याच वेळीं आले हें फार चांगलें झालें. न्यायमूर्तींनीं त्यानां आंत बोलवावें.

न्यायाधीश—(सेवकास) अरे, जा त्यानां आंत घेऊन ये.

सेवक—(जातो. व मधुसूदन जनार्दनासह प्र. क.)

न्यायाधीश—मधुसूदन आणि जनार्दन, आपण अगदीं न्यायाच्या वेळेवर आला आहां तर खरें वर्तमान सांगावें.

सुदक्षिणा--(मनांत) परमेश्वरा, आज एका गोष्टीविषयीं मी तुझी फार आभारी आहे—

पद. चाल. दारिद्र्यानेंही.

ममताताचि तशि जननी नाहीं ॥ जिवंत राहिलि कीं या समयीं ॥ धृ. ॥ नातारे दुःखाचि मजाविषयीं तें ॥ स्थिात्ते ही बघुनी बहु त्या होतें ॥ क्रोधावेशें मग प्रियतातें ॥ केलें असतें भलतें कांहीं ॥ १ ॥

परमेश्वरा, यावेळीं माझी लाज राख; मग मी कशाही प्रसंगास भीत नाहीं.

जनार्दन--ऐकावें. महाराजांज्या आज्ञेनें आह्मीं हिमालयपर्वतावर गेलों आणि तेथें गुरुजींचे दर्शन घेतलें. नंतर म-

हाराजांचें विनंती पत्र त्यास दिलें असतां त्यांनीं तें वाचून हें आज्ञापत्र त्याचें उत्तर देऊन महाराजाजवळ देण्यास सांगितलें आहे. तें हें घ्यावें.

(असें ह्मणून राजाजवळ पत्र देतात.)

दिलीप--हें पत्र न्यायमूर्तींनींच फोडून गुरुजींचा जो निदेश असेल तो वाचावा.

न्यायाधीश--मधुसूदना, हें सर्व वृत्त खरें आहेना ?

मधुसूदन--होय यांत तिळमात्रदेखील खोटें नाहीं.

न्यायाधीश--महाराजांनीं ऐकावें. (वाचतो) स्वस्ति ! मधुसूदन आणि जनार्दन यांच्या हस्तें आपलें विनंती पत्र पावलें, मजकूर कळला; त्यावर आमच्या ज्ञानचक्षूस जें खरें दिसलें ते येणें प्रमाणें आहे—

पद. चाल. सुदक्षिणापतिही.

खरोखरी तव राज्ञी आहे पतिव्रता जो तिज विषयीं ॥ सांप्रत तव मनिं संशय आला सारा मिथ्या तो पाहीं ॥ भद्रसेन निर्दोषी पूर्णाच त्यानें केलें नच कांहीं ॥ एकनिष्ठ सेवक वसुभूती व्यर्थ मग तव त्यावरही ॥ कथा जो टाकिशी राना-

मधि तो तुजपासुनि सत्य असे ॥ शोधिशि तरि ती मिळेल दुसरी तिजाविण संतति तुला नसे ॥

कायस्थ--गुरुजींनीं खरें तें सांगितलें पण या शेवटल्या ओळीचा अर्थ काय समजावा?

सुदक्षिणा--राखिली बरें कुलगुरूंनीं माझी लाज! आज माझा माथा उजळ झाला! आतां मी आनंदानें जी शिक्षा द्याल ती भोगण्यास तयार आहे.

दिलीप--काय हो न्यायमूर्ति, आपण जसें वाचलें तसेंच पत्रांत लिहिलें आहे काय?

न्यायाधीश--होय. हें आपण प्रत्यक्ष पहावें.

दिलीप--बरें 'तिजविण संतति तुला नसे' याचा अर्थ काय? कांहीं नाहीं. गुरुजींनीं अगदीं खोटें लिहिलें. आपण व्यवहार पुढें चालवावा.

न्यायाधीश--महाराज, शांतपणानें न्यायदेवतेच्या नजरेस काय येतें तें ऐका. हा व्यवहार पुढें चालविल्यापासून विशेष कांहीं होईलसें वाटत नाहीं. महापतिव्रता जी आपली राज्ञी तिला आम्ही निर्दोषी ठरविण्याचा प्रसंग यावा हा मोठी दुःखाची गोष्ट आहे. तिच्या कोपानलांत हें सारे

बगर दखील क्षणांत भस्म होईल! पण ती पुऱ्या शांत स्वभावाची. तिनें आपला स्त्रीधर्म स्मरून सर्व दुःख निमूटपणें सोसले. महाराज, आपण तिच्यावर जे तीन आरोप आणले आहेत त्यास परावा तुमच्या कल्पनेशिवाय न्यायदेवतेस कांहीं दिसला नाहीं. खचित ती पूर्ण निर्दोषी आहे. तिच्या अथवा तुमच्या दुर्दैवानें तुह्मांस तिजविषयीं मिथ्या संशय येऊन, आपण तिचा अनेक प्रकारें नाहक छळ केला; भद्रसेनाविषयीं व्यर्थ मनांत वाईट आणले, व सर्व राज्यभार शहाणपणानें आकळणारा असा प्रधान वसुभूति आपणांस अंतरून घेतला. असो. आपले त्रिकालज्ञ गुरु श्रीपरमहंसस्वामी यांनीं जो खरा वृतांत कळविला आहे त्याप्रमाणेंच आमचें मत आहे तर जें झालें तें झालें यापुढें तरी महाराजांनीं असें करावें—

दिंडी.

पुनः दयितेचा अंगिकार करुनी ॥ पूर्ण द्यावें कीं सौख्य तिला स्वजनीं ॥ भद्रसेना निजमित्र तो करावा ॥ सचिव सन्मानें परत आणावा ॥ १ ॥

सुदक्षिण:—अहाहा! परमेश्वरा, आज तूं मजवर ही के-

बढी कृपा केलीस. माझें खरें होतें त्याचाच शेवटीं जय झा-ल्यानां ! अगबाई ! पण हा माझा उजवा डोळा एकाएकीं का लवूं लागला ?

दिलीप—अहो न्यायमूर्ति, आपण न्यायाचा अभिमान बाळगतां आणि जी खरोखरी अपराधी तिला तिच्या विला-पाला व स्त्रीजातीच्या अनुकंपेला मोहून निर्दोषी ठरवितां काय ?

न्यायाधीश—तसा मुळींच कांहीं प्रकार नाहीं. न्याया-सनासमोर आलेल्या पुराव्यावरून जें खरें दिसलें तेंच सां-गितलें आहे; याउपर जशी महाराजांची मर्जी असेल त्या-प्रमाणें ते करण्यास समर्थ आहेत.

(न्यायाधीश, कायस्थ वगैरे जातात.)

(तदनंतर दुःखित झालेला सेवक प्र. क.)

दिलीप—अरे, असा रडतोस काय ?

सेवक—महाराज, आपणांस ती दुर्वार्ता कोणत्या मुखा-नें सांगूं ? आईसाहेबानां न्यायसभेंत नेले हें वर्तमान बाळासाहे-बानां कळलें असतां, त्यांनीं 'आई आतां तुझी कशी गती होईल' असें ह्मणून प्राण सोडला.

दिलीप—शिव शिव !

दिंडी.

लोभ मजवरि हा होय ईश्वराचा ॥ कसा अवचित रघुबाल जाय साचा ॥ पुण्यपुरुषा बोललों खोटे वाचा ॥ असे अपराधी किती तरी त्याचा ॥ १ ॥

सुदक्षिणा—हायरे बाळा—

पद. चाल. गेली ही विलासिनी ही.

एकटि येथें मज टाकुनिया ॥ कैसा जासी मत्प्रियतनया ॥ धृ. ॥ मदनासम तव रूपचि होतें ॥ सद्गुण अंगीं किति वसले ते ॥ सुख देसी बहु मच्चित्ताते ॥ गोड बोल निशिदिनिं बोलुनियां ॥ १ ॥

हाय हाय ! आतां काय करूं ! !

पद. चाल. नृपालकोपही.

भेट भेट एकवार बालका मला ॥ उत्कंठित तुज बघण्या प्राण जाहला ॥ बालपणीं तव होई अंत हा कसा ॥ अरे यमा किती तरी अदय तूं असा ॥ नेसि पाडसा ॥ १ ॥

(दुःखाच्या झटक्यानें) बाळा, मी तुज घेण्याला आलें अं—

(असें म्हणून धाडकन जमीनीवर अंग टाकते.)

दिलीप--अरे, हा काय आणखी अनर्थ !

गिरिजा—अहो, दाक्षायणीबाई, बाईसाहेबांकडे पहा त्यांनी अगदीं हालचाल बंद केली !

दाक्षायणी—देवा ! काय हा प्रसंग! आतांही आमची राज्ञी आम्हांला सोडून जाते कीं काय ?

दिलीप--मुलाची बातमी ऐकून तिला प्रबल मूर्च्छा आली आहे ! जा तिला घरांत नेऊन एखादी मात्रा द्या. (दाक्षायणी व दासी राणीला नेतात.)

दिलीप--शिव शिव ! देवा ! मी केवढा अन्यायी ! मला क्षमा कर ! मी त्या सत्पुरुषाला विनाकारण खोटें म्हटलें ! आणखी त्याप्रमाणेंच—

पद. चाल. मजवरि हें आलें ही.

मिथ्या घेउनिया ॥ मी संशय हा ॥ गांजिलि प्रिय जाया ॥ पतिव्रता ती असे खरोखर सांप्रत आलें मज कळुनीया ॥ धृ. ॥ निर्दोषी असतां ॥ मित्राच माझा ॥ रिपु गमला चित्ता ॥ निष्कारण मी विष कीं दिधलें तत्प्राणाचें हरण कराया ॥१॥

इचित तो प्रधान वसुभूति महात्मा ! त्याला मी इतकी

धमकी दिली तरी त्यानें हें नृशंसकर्म न करितां आनंदानें देशत्याग केला. अरेरे ! काय हा माझा भयंकर मोह ! यानेंच माझ्या प्रियपुत्राचा मजशीं वियोग केला ! असो. झालें तें झालें. आज मी शुद्धीवर आलों. आतां—

साकी.

पुनरपि करितो राज्ञीची मी मनधरणी ती रात्रीं ॥
क्षमाचि मागुनि मम्मित्राशीं जोडीतो कीं मैत्री ॥
त्याघरिं साचजाते ॥ अणितों सन्मानें येथें ॥१॥

(दुःखित झालेली दाक्षायणी प्र. क.)

दाक्षायणी—देवारे देवा ! काय हा अनर्थ ! अति झालें ! !

दिलीप—दाक्षायणिबाई, आणखी काय झालें ?

दाक्षायणी—महाराज, काय हा आपला मोह आणि भ्रम ! यापासून घडलेले अनर्थ पाहून माझें काळीजच फुटून निघालें. आपण या निराधार संशयानें किती तरी भयंकर कृत्यांचें पाप आपल्या माथीं मारून घेतलें. आपला बालमित्र मद्रसेन त्यावर नसतें कुभांड घेतलें; वसुभूतीसारख्या राजनिष्ठास आपल्या कुटुंबांतून बाहेर काढलें. ज्याच्या मुग्ध लीला पाहून एखाद्या राक्षसाच्याही हृदयाला द्रव आला असता तें

आपलें तान्हेलें घोर अरण्यांत नेऊन टाकलें. स्त्रियेचा नाना-प्रकारें छळ केला व त्यामुळेंच बालक रघु झुरणीस लागून मृत्युमुखीं पडला. हाय हाय ! आणखी काय सांगूं ? देवा ! हीं सर्व दुःखें आम्हांला कां थोडी झाली होती म्हणून वरतीं आणखी आमच्या सुदाक्षिणा राज्ञीसही घेऊन गेलांस ?

दिलीप—शिवशिव ! केवढा मी पापकर्मा ! त्या पुण्यपुरुषाच्या 'दुसरी तिजविण संतति तुला नसे' या वचनाचा प्रत्यय मला आला ! हे महा पतिव्रते, तूं मला सोडून गेलीस ना ?

पद. चाल. कांते फार तुलाही.

केला व्यर्थ तुझा छल भारी म्यां दुर्भाग्यानें ॥ मिथ्या संशय तुजविषयीं तो घेउनि त्याउले निष्ठुरतेनें ॥ पारि तूं केवळ साध्वी सचे ॥ मूर्ती असशी गे धैर्याची ॥ स्त्रीविनयाते नच सोडु नया दुःख सोसिलें शांतपणानें ॥ १ ॥

हाय हाय ! जन्मोजन्मीं पुण्य केलें तरि न मिळणारी अशी रूपवती व गुणवति स्त्री मला मिळाली असतां मी तिला व्यर्थ गांजिलें. मजसारखा पापी या जगांत कोण असेल !

दाक्षायणी—महाराज, आतां पश्चातापानें काय होणार !

मागें माझें बोलणें आपणांस कडू वाटलें होतें ना ? घ्या आतां त्याचा प्रत्यय !

दिलीप—बाई, आतां तुह्मांला जितकें बोलावयाचें असेल तितकें बोला. मला ऐकून घेणें भाग आहे.

दाक्षायणी—महाराज, मी कशाला आपणांस बोलूं ? मी अगदीं वेडी, भावडी आहे मलाकीं नाहीं राणीचा वर्तनक्रम फार आवडे. ती निर्दोषी आहे असें वाटे ह्मणून त्यावेळीं तुह्मांला कळकळीनें दोन वाईट शब्द बोललें पण आतां तिचें नांवच काढणार नाहीं; रघुबालाचें नाहीं व त्या अर्भकाचेंही नाहीं.

दिलीप—शिव शिव! एका घटकेंत दोन चांगले प्राणी काळाच्या घशांत पडावेंत अं ? दाक्षायणी बाई, तुह्मी माझें शांतवन केलें असतें त्यापेक्षां हे कडु शब्द मला अधिक प्रिय आहेत. बरें आतां अगोदर मला त्याठिकाणीं घेऊन चला—

पद. चाल इसनन धनही.

द्यावा लोकारे तुह्मी मजला ॥ मम रघुबालक
ताशी प्रियकांता शेवटिं बघु द्या मन्नयनाला ॥ धृ ॥
क्षणभंगुर हा प्रपंच आहें ॥ सांप्रत आलें कळुनी
मज हें ॥ या जिवांत जोंवरि जिव आहे ॥ कांहिं
विसरेन न त्या दोघांला ॥ १ ॥

दाक्षायणी—महाराजांनीं वाच्यांत चलावें.

दिलीप—जयसिंहाला त्या मुलाला नेऊन अरण्यांत टाकायला सांगितलें होतें तर तो अजून कां बरें आला नाहीं ? ती कन्या तरी मला लाभेल कां ? कसली लाभते ? छे, पण—

साकी.

सत्पुरुषाची मिथ्यावाणी नच होइल कधीं ही तो ॥ आश्वासन मज आहे त्याचें मिळेल जरि शोधिशिती ॥ आशा दृढ धरुनी ॥ शोधिन यावरी तिस विपिनीं ॥ १ ॥

(सर्व जातात.)

प्रवेश ३ रा. सुवर्णपुराजवळचें अरण्य.

:o:

(हातांत तान्हें मूल घेऊन जयसिंह प्र. क.)

जयसिंह—आमच्या महाराजांच्या आज्ञेवरून या बालास मी अरण्यांत टाकण्याकरितां निघालों असतां दाक्षायणी बाई मजकडे आल्या. व त्यांनी ही रत्नांनीं भरलेली पेटी व सर्व हकीगतीचा कागद मजजवळ आणून देऊन मला सांगितलें कीं, ज्याठिकाणीं तुम्ही या मुलीला टाकाल तेथें ही पेटी व

तिच्यांत हा कागद घालून ठेवा; ह्मणजे तिच्या सुदैवानें जर ती कोणाला सांपडली तर या रत्नांच्या लोभानें तो तिचें संरक्षण करील. दाक्षायणीबाईंच्या सांगण्याप्रमाणें मी ही पेटी घेऊन आमच्या शहरापासून अति दूर अशा या अरण्यांत आलों. आतां येथें दुर्दैवानें माझ्या वाट्यास आलेलें हें तान्हें बाळ टाकण्याचें काम तें मला केलें पाहिजे. पण हें करतांना जरी मी निरुपायास्तव हें काम करीत आहे तरी काल पडलेल्या स्वप्नाचें वारंवार भय वाटतें. काल स्वप्नांत रागवलेल्या अशा बाईसाहेब मजकडे आल्या आणि ह्मणाल्या ‘ जयसिंह’ तुह्मी माझ्या बाळाची तोडातोड करीत आहां पण तुमचीही अशीच होईल’ आज पर्यंत मी स्वप्नावर विश्वास ठेवीत नव्हतों, पण हें स्वप्न पाहिल्यापासून माझ्या छातींत धडकीच भरली आहे. असो; आतां आपण आपलें काम करावें. या मुलीप्रमाणेंच कोमल अशी ही मालतीची लता आहे इच्या जवळ मी इला शालजोडींत गुंडाळून ठेवतो (तसें करून) परमेश्वरा, शकुंतरक्षकाकडून तूं जसें शकुंतलेचें रक्षण करवलेंस तसेंच आतां इचें करीव. (घाबरून) हाय हाय! हा काळरूपी वाघ माझ्याच अंगावर येत आहे! मजजवळ यावेळीं शस्त्र देखील नाहीं. आतां मी याच्या हातांतून कसचा वांच-

वो. बाईसाहेबांचा शाप खरा होणार ! मी आपल्या बायका-मुलास आज मुकणार ! देवा, माझ्या पापाची क्षमा कर. (वाघ अंगावर चालून येतो आहे असा निजून जातो.)

(तदनंतर एक वृद्ध गोपाळ प्र. क.)

गोपाल—(चहूंकडे पाहून) अरे, इकडे ही पण कोठें दिसत नाहींत. तेव्हां गाई गेल्या तरी कोठें ? वाघाची आरोळी तर जवळच ऐकूं येत आहे म्हणून त्यांची मला फार काळजी लागली आहे. असो. आज चंपाषष्ठी आहे तेव्हां खंडोबाच्या पुजेला थोडीशी फुलें न्यावीत. (फुलें तोडतो) अरे येथें हे लाल काय दिसतें आहे. (पाहून) अरे हें तर शालजोडींत गुंडाळलेलें तान्हें मूल आहे. फारच गोजिरवाणें अं ! कोण्या दुष्टानें हे येथें आणून टाकलें असावें ? कां आईबापाच्या मुळावर आलें म्हणून त्यानींच टाकलें. कांहीं असो. याला पाहून माझ्या मनात प्रेम उत्पन्न झालें; तर आपण याला घरीं नेणार; पण अगोदर गोठ्याला दाखवून तो काय म्हणतो तें पहावें. अरे गोठ्या, गोठ्या कोठें आहेस ?

गोठ्या—(येऊन) ओ ! बाबा ! हा पहा मी आलों.

गोपाल—आलांस कां ? पण तूं असा घाबरल्यासारखा कां दिसतोस ? तुला काय झालें ?

गोट्या—बाबा, काय सांगू ? तें पाहून मी भीतीनें जागच्याजागींच बसलों. अरे बापरे ! केवढा तरी तो वाघ ! आणखी त्यानें तो कोणी बिचारा सरदार होता त्याला मारुन खाल्लें !

गोपाल—अरे, कोठें खाल्लें ! !

गोट्या—याच टेकडीच्या पायथ्याजवळ बादा ! तो वाघ त्याला अजून खात असेल. बाबा, तुम्हांला काय सांगूं तो सरदाराचा दीन शब्द; वाघाचा भयंकर शब्द; आणखीं या वाऱ्याचा सोसाट्याचा शब्द यांनी माझ्या कानठळ्याच बसल्या !

गोपाल—अरेरे ! गरीब बिचारा ! त्यानें काय पाप केलें कोण जाणें म्हणून त्याला असें मरण आलें.

गोट्या—पण बाबा आपल्या गाई सापडल्या कां ?

गोपाल—अरे, गाई नांहीं सांपडल्या पण हें पाहिलेंस कां काय सांपडलें तें ? देवानें तुला बहीण दिली; पहा कशी चांगली आहे ! खचित ही कोणा थोरामोठ्याची असावी. बरें हिच्यांजवळ ही पेटी कसली ? गोट्या ती उघडून पहारे.

गोट्या—(उघडून) बाबा आपलें नशीब फळफळलें ! या पहा यांत मोहरा, पुतळ्या, रत्नें आहेत आणखी यावर कांहीं लिहून हा कागद ठेवला आहे.

गोपाल—आज खंडोबा आपल्याला पावला. ही मुलगी कोणाची असो आपण तर हिला संभाळणार. गोट्या, तो कागद पेटींत नीट घालून वर मोहरा वगैरे ठेऊन दे. आणखी ही गोष्ट अगदीं कोणाजवळ बोलूं नकोस बरं कां?

गोट्या--पण बाबा, या मुलीला कोणत्या नावानें हाका मारावयाची. या मालतीच्या वेलीजवळ सांपडली म्हणून आपणतर हिला मालती हाक मारणार.

गोपाल—बरें तुझ्या मर्जीसाठीं तिचें नांव मालतीच ठेऊं. हीं फुलें घेऊन चल आतां घरीं, आज खंडोबाची पुजा करावयाची ना? तूं करणार कां मी करूं?

गोट्या—बाबा, तुह्मी व्हा पुढें आणि पुजा करा; तोंपर्यंत मी गाईनां बघून घेऊन येतो.

गोपाल--बरं तर जा.

(दोघे जातात)

अंक चवथा.

———:०:———

(गोपाल प्र. क.)

गोपाल—दैवाची करणी विलक्षण ह्मणतात तें खरेंच; ती मालती मला सापडल्यापासून आज चवदा वर्षे झाली सारखी माझी भरभराटच होत चालली आहे. या सर्व गोपाल वाड्यांतील लोक आज मला प्रमुख मानतात व माझ्या संमतीशिवाय कांहा करीत नाहींत. खचित हा माझ्या पूर्व पुण्याचाच प्रभाव आहे. नाहींतर त्या दिवशीं इतके लोक येथें असतां ती मलाच कां सांपडावी ? आतां तिजविषयीं मी वारंवार पुष्कळ विचार करितो पण माझा कांहींच तर्क चालत नाहीं. बाकी ही कोणा थोरामोठ्याची मुलगी आहे खचीत ! तिचे तें सुंदररूप, उपजत मोठेंपणाचे अंगचे गुण हे आमच्या आडाणी लोकांत देखील किंचित झाकले जात नाहींत. पण अशी ही देवाच्या

कृपेनें कन्या झाली असतां तिच्या बापास तिला टाकून देण्या-
इतकें काय बरें संकट पडलें असेल ? कांहीं असो. त्याचा
विचार आपण करूंच नये व त्यापासून कांहीं कळणेंहीं नाहीं.
मालती सांपडल्यापासून माझा भाग्योदयच झाल्यानें व तिच्या
उपजत चांगुलपणानें ती मला तर प्राणापेक्षांही प्रिय झा-
ली आहे. आतां एखाद्या चांगल्या वराशीं तिचा विवाह
झालेला पाहिला ह्मणजे माझ्या डोळ्यांचें सार्थक झालें. पण
तिला तसा वर कोठून मिळावा ? आलिकडे आमच्या येथें
तो कोणी मुकुंदा ह्मणून येतो तो फार शाहाणा व
तिच्या रूपाला योग्य असा मला दिसतो व मालतीचेंही त्या-
वर बरेंच प्रेम जडलेलें दिसतें; तर त्याच्याशींच तिचें लग्न
लावावें ह्मणजे जोडा कसा नामी दिसेल. करावें तर तसेंच.
आणखी आज आमच्या घरीं खंडोबाचा उत्साह आहे व त्या
साठीं चार मंडळी येणार आहेत तेव्हां आपला हेत त्यांनां
कळवून ते काय ह्मणतात तेंही पहावें. माझ्या या ह्मातारपणीं
तिच्या लग्नाशिवाय दुसरी कोणतीही इच्छा राहिली नाहीं.
(वर पाहून) अरे दिवस बराच वर आला. गाव्या तर अ-
जून घोरतच पडला आहे. असो. त्याला हाका मारून पुजचे

काय सामान वगैरे आणावयाचें तें आणावयाला शहरांत पाठवावें.

(असें ह्मणून जातो.)

हा विष्कंभक झाला.

प्रवेश १ ला. रस्ता.

---:o:---

(एक ठग प्र. क.)

ठग—वाहवारे वाहवा ! काय मौज आहे तरी----

पद. चाल. नको हरि निशीही.

विचित्र कितितरि जग हें आहे जगदीशानें निर्मियलें ॥ तद्रचनेचा विचार करितां अक्कल कांहीं नच चाले ॥ भोळ्या लुच्चा लोकांनीं कीं आहे सारें भरलेलें ॥ क्षणांत याची स्थिति पालटते पसरुनि इतकें जरि गेलें ॥ निर्वाहास्तव नानाविध कृति लोकांकडुनी तें करवी ॥ कोणा नृपपद देउनि कोणा भिक्षा मागाया लावी ॥ १ ॥

याचा प्रत्यक्ष अनुभव मीच पहा ? पूर्वी जेव्हां राजपुत्र माधव याचा नौकर होतो त्यावेळीं मी केवढा सुखी होतो; गोड गोड खाऊन उंची पोषाक करून अहोरात्र मी सारखा मौज करीत असे. पण आतां तें सर्व वारे फिरलें. आमच्या दुर्दैवानें ती आमची नौकरी जाऊन उदरनिर्वाहाची पंचाईत पडली. पण पडली ह्मणून ही स्वारी थोडाच त्याचा खेद करणारी आहे! तो मार्ग सुटला तर सर्व लोकांवर उपकार करण्याचा हा ठगाचा धंदा मी स्वीकारला. माझे भाऊबंद जे दुसरे ठग आहेत ते घातपात करितात; पण त्याची मला फार भीति वाटते. चालत आहे तों पर्यंत बरें, आणि जर का कोणाच्या तांवडीत सांपडले तर प्राणांशींच गांठ पडावयाची. मी आपला अगदीं साधा मार्ग स्वीकारला आहे.

पद. चाल. फुलें वेलींचीं ही.

जन भोळे ते ॥ मी फसवीतो हसते ॥ ध्रु. ॥ कोठें कोणाचीं विसरूनी ॥ वस्तू राहिलि पाहिलि नयनीं ॥ घेतो तत्क्षणिं ती उचलूनी ॥ पाप न कांहीं आणितो स्वमनीं ॥ चाल ॥ निर्वाहातें ॥ करितों करुनी या कृतितें ॥ १ ॥

यामुळें सांप्रत मला आपपर असें मुळींच राहिलें नाहीं; लो-

कांजवळ कांहीं असलें तर तें मी माझेंच समजतों. बरें; यांत कधीं सांपडला गेलोंच तर महिनापंधरा दिवसांच्या खोड्याशिवाय अधिक कांहीं होण्याची भीतीही पण नाहीं. असो; जगांत जोपर्यंत भोळे लोक आहेत तोपर्यंत आपणांस उदरनिर्वाहाची मुळींच काळजी नको. मात्र युक्तीनें त्यांच्याजवळ असेल तें हरण केलें पाहिजे; व लागलींच दुसरें सोंग घेतले पाहिजे म्हणजे कोणी ओळखण्याची शंका नको. आतां यांत पाप होतें कीं पुण्य होतें याचा आपणासारख्यांनीं मुळीं विचारच करूं नये हें चांगलें. (समोर पाहून) अरे, ह्या झोंपडींतून कोण बरें बाहेर पडला ?

(गोट्या येतो.)

गोट्या—अग ए कारभारणी ! अगोदर इकडे ये पाहूं ?

(त्याची बायको रंगू येते.)

रंगू—काय म्हणतां कारभारी !

गोट्या—अग शहरांत जाऊन कोणकोणत्या जिनसा आणावयाच्या !

रंगू—कोणत्या आणावयाच्या त्या मघांशीं मामंजींनीं नाहीं का सांगितल्या.

गोट्या—अग, तेव्हां मी झोपेंतच होतो म्हणून त्यांची मला आतां अठवण नाहीं. तूं सांग वरं ?

रंगू—आतां चांगलं नीट ऐकून घ्या. गूळ, हरभऱ्याची डाळ, तांदूळ, गहूं आणखी खंडोबाच्या पुजेकरितां फुलें.

गोट्या—बरं याला काय पडेल. हे पहा माझ्याजवळ हे नऊ रुपये दोन अधेल्या चार पावल्या आणखी आठ चवल्या आहेत इतके पुरतील कां ?

रंगू—होय इतकें न पुरायला काय झालं. यांतून देखील पुष्कळ पैसे शिल्लक रहातील.

गोट्या--बरें आजची सगळी व्यवस्था ताई करणार आहे म्हणून बाबांनीं सांगितलें. तर ती कोठें आहे ?

रंगू—आतांशीं आपल्याकडे तो मुकुंदा येतो त्याच्याशीं बर्से कसल्याशा गोष्टी सांगत बसल्या आहेत.

गोट्या--बरं तर तूं जा; आणखी तिला काय काय आणावयाचे तें विचारून ये.

रंगू—(जाते)

गोट्या—माझी कारभारीण म्हणते पुष्कळ पैसे शिल्लक

व्हातील. तर मग आपल्यासाठीं तंबाखूही पुष्कळशी आणली पाहिजे. (दायकोस) कायगं ? ताईन काय सांगितलें!

रंगू—(पुनःयेऊन) त्या ह्मणाल्या कीं. रांगोळी, गुलाल, केळीची पानं आणखी मंडळीनां देण्याकरितां चांगलीं चांगलीं वासाचीं फुलें घेऊन या.

गोप्या—बरं तर जा तूं; हा मी शहरांत चाललों.

रंगू—(जाते)

ठग—(मनांत) या स्वारीजवळ एकंदर बारारुपये आहेत व मूर्तीही देख्यापैकींच दिसत आहे तेव्हां हा लाग साधला तर आपली बरीच चंगळ होईल. पण याचा खिसा कातरायला युक्ति काय बरं करावी ? (विचार करून) हं अ- सेंच करावं (जमीनीवर पडून) अरे देवा ! कोणी मला हात द्या कीं हो !

गोप्या—(पाहून) अरे, कोण आहे कोण ?

ठग—अरे बाबा, जरा मला हात दे; मला पहा त्यानें मा- र मार मारलें; माझे पैसे छिनाऊन नेलें.

गोप्या—अरे, तुला मारलें कोणी ? चोर होता कीं भामट्या?

ठग—काय सांगूं ? चोर होता आणखी भामट्याही होता !

गोट्या—बरें माझा हात धरून ऊठ. (त्याचा हात धरितो)

ठग--अग आई! बाबा, हळूच उठीव. माझा हात लचकला आहे.

गोट्या—अरे, तुला त्यानें फारच मारलें. बरें तो कोण आहे हे तुला माहीत आहे कां?

ठग—होय. मी त्याला चांगला ओळखतो! तो पूर्वी राजपुत्राच्या तैनातींत होता; तेथें त्यानें आपलें कांहीं गुण पाघळले ह्मणून त्याला हाकून दिलें; मग तो कांहीं दिवस गारुडी बनला होता मग पुढें बहुरूपी झाला आणि आतां तर शुद्ध लोकांचे खिसे कातरणारा ठग बनला आहे. (शितार्फीनें त्याचा खिसा कातरून उठून) बाबा, देव तुझें कल्याण करो.

गोट्या—अरे, त्याला तूं इतका भ्यालास? तो मलाही ऐकून माहीत आहे, देवळांत, यात्रेंत तो जातो, आणखी कोठें कांहीं हाताला लागलें तर उचलून पळतो; पण तो अगदीं भेकड आहे. तूं जरा त्याला आपलें अवसान दाखविलें असतेंस तर तो पळून गेला असता.

ठग—पण तो भेकड आहे हें मला कोठें माहीत होतें? उलट मीच आपला भेकड आहे हें त्याला माहीत होतें वाटतें.

गोष्या—असो. बरें आतां मला सामान आणावयाला शहरांत जावयाचें आहे तुला घरीं जातां येईल कां ?

ठग—जा तूं आतां. मी हळुहळूं जाईन.

गोष्या—तुला कांहीं पैसे देऊं कां ?

ठग—नकोरे बाबा मला तुझे पैसे. पैसे असले ह्मणजेच दुसरे लुबाडायाला येतात. एरवीं कोणी कोणाच्या वाटेस जात नाहीं.

गोष्या—बरें आतां तुला कोणी कांहीं करणार नाहीं. जा तूं आपल्या घरीं. (जातो)

ठग—शहरांत सामान आणावयास जातोस पण जवळ काय आहे ? असो. याच्या येथें आज खंडोबाचा उत्साह आहे व त्यासाठीं चार मंडळीही येणार आहेत तर आपण तेथे कोमटी होऊन जावें ह्मणजे आपलें सामान खपेल व कांहीं लागही साधला तर साधेल. लोकांनीं आपल्या हातांनीं उचलून दिलेलें घेणें हें मठाचें काम; तें आह्मांसारख्यांस कशाला पाहिजे--

साकी.

भोळ्या लोकांपाशीं दाउनि अपुली कर्तबगारी ॥

धन त्यांचे तें हरणचि करणें आवडतें मज भारी ॥
त्यामधिं हातोटी ॥ साधलि आहे मज मोठी ॥ १ ॥

(जातो)

प्रवेश. २ रा. गोपाळाचें घर.

—:*:—

(माधव आणि मालती प्र. क.)

माधव—सुंदरी, हा भरजरी शालू तुला आवडला नां?

मालती—हें काय बाई मला विचारावयाचें? आपणाला आवडला ह्मणजे झालें; खरंच विचाराल तर यानें मला फार लाज आणली आहे. पहा.

पद. चाल. दवडु नका फुकट ही.

जन्म असे गरिबाच्या कुलिं मदीय हा ॥ कुळिनत्व कीं शोभतसे शालु त्या पहा ॥ धृ. ॥ त्यापरि ही जरिकाठी चोळि चांगली ॥ गोपाच्या मुलिला

नच दिसतसे भली ॥ हट्ट फार आपण तो घेतला तरी ॥ अंगामधिं घातले हो मी खरोखरी ॥ १ ॥

माधव—प्रिये, तुला कांहीं वाटो पण आज हीं आभरणें तूं धारण केल्यामुळें—

पद. चाल सदर.

येसी तूं किति रमणिय तरि दिसोनिया ॥ स्त्रिया सर्व लाजतील तुज बघावया ॥ ध्रु. ॥ वाटे तव कमलासम वदन पाहुनी ॥ विधु आला भूवरतीं गगन सोडुनी ॥ कोणीही यापरि तव थाट देखुनी ॥ नच शकेल गोपसुता तुज लगावया ॥ १ ॥

हे चारुगात्री, तुझें हें सुंदर रूप पाहून मला वारंवार असें वाटतें कीं—

साकी.

हरिजानें त्यादिवशीं या स्थलिं नच आणियलें मजला ॥ मत्सुकृतानें सौख्यमार्ग हा येउनि तरि दाखविला ॥ तुजसम दारेचें ॥ दर्शन घडवीलें साचें ॥ १ ॥

अहाहा ! सुंदरी, आणखी काय सांगूं ?—

दिंडी.

बघुनि नयनीं मनिं तोष होय ज्यानां ॥ असति महिवरि गे जरि पदार्थ नाना ॥ तरी पाहिलि तुज सखे जया कालीं ॥ पुण्यघटिका मज समज तीच झाली ॥ १ ॥

मालती--हें असलें तोंडदेखलें बोलणें बोलूं नका गडे. मी अशी कोण आहे रंभा की अप्सरा !

माधव—खरोखरच तूं अप्सरा आहेस ? आणखी आज खंडोबाच्या दर्शनाकरितां जे गोप आले आहेत ते गोप गाईंत तर—

पद. चाल. सुखोपभोगा ही.

स्वर्गामधिंही सुरयुवतींनां दुर्लभ जें झालें ॥
सुरूप ऐसें तुजला विधिनें बघ सखये दिधलें ॥
जाणुनियां तें पहावया अपुल्या नयनांनीं ॥
वाटे मजला आले असती सुर हे या स्थानीं ॥१॥

मालती—अगबाई ! आतां तर शिकस्तच झाली. बरें; मला हा आपण शालू दिला व तो मी नेसलेही. पण आपण याच कां भिकार वेषानें आज मंडळींत बसणार ? छे; मी

नाहीं ऐकायची. आपणही आज राजपुत्रासारखा पोषाख करून या. मग मला किती आनंद होईल पण ! हा मेला मळका पोषाख मला नाहीं आवडत.

माधव—प्रिये, हा पोषाख तुला आवडत नाहीं तर मीही कांहीं हा नेहमींचा केला नाहीं याचें काम झालें कीं हा टाकलाच—

पद. चाल. तुजसम सत्प्रेम ही.

तुझ्या पित्याकडोनि मी तुज वरावया ॥ वचन घेतलेंचि तोंचि करिन दूर या ॥ १ ॥ राजपुत्र मी बनेन त्यापरी पहा ॥ हासिल मग तूंही गे राजपुत्र अहा ॥ २ ॥ वेषांतर बहु करि तो खि खिळावया ॥ अर्जुनास लागलेंचि यातबावया ॥ ३ ॥

मालती—पण हें वेषांतर करून आपण जो विचार मनांत आणला आहे तो घडून येईल असें मला वाटत नाहीं. कारण, जरी माझ्या पित्यानें आपल्या ह्मणण्यास संमती दिली तरी—

पद. चाल. सदर.

तुम्ही अहा प्रिया पहा कुलिन भूपती ॥ दीन मी

कशी जमेल लग्नसंगती ॥ १ ॥ तात न संमति देतिल हें करावया ॥ राज सुता बहु इच्छिति वरि वरावया ॥२॥ प्रार्थी ! कर जोडुनि मी म्हणोनिया ॥ सोडुनि हा छंद करा मजवरी दया ॥३॥

माधव—छे, प्रिये, असें भलतेंच काय म्हणतेंस ? तुझ्या पित्याचें वचन मिळालें कीं मी लागलीच तुजबरोबर विवाह करणार ? मग कांहीं होवो—

साकी.

मिळोचि अथवा न मिळो याला संमति कीं ताताची ॥ विघ्नें येवो याबाध बहु जातें प्रतिकुल होउनि विश्वाचा ॥ प्रेमाचि तुजवरिचें ॥ होइल कधि नच सम साचें ॥ १ ॥

मालती—आपण असें म्हणतां खरें; पण मला बाई राहूनराहून याची फार भीती वाटते ! आपण जसें इकडे आलां तसेंच कधीं अवचित महाराज आले आणि त्यांनीं हा आपला प्रेमसंबंध पाहिला म्हणजे —

पद. चाल. साजु मी किती ही.

त्यानां नच हें मुळिं आवडुनी ॥ जातिल बहु ते रागावूनी ॥ धृ ॥ फिरावत.ल मग वळेंचि अपुलें मानस

या सत्प्रेमासमधुनी ॥ १ ॥ अथवा मजला दूरचि करितिल अनुपणासाठीं जगतातूनी ॥ २ ॥ व्यर्थ मनोरथ होतिल सारे करा तरी तुम्हि विचार अजुनी ॥ ६ ॥

आणखी, खरेंच पहा; जर कधीं महाराज येथें आले आणि ते आपणाला बोललें तर हा भरगच्ची शालु व ही जरिकाठी चोळी घालून त्यांच्याकडे वर मान करून मला बघवणार देखील नाहीं. यासाठीं प्रिया, आपणांस मी मोठ्या दुःखानें सांगते, कीं आपण हा माझा नाद सोडून द्या.

माधव—प्रिये, अशा मनांत भलभलत्याच शंका आणून आजचा आनंदाचा दिवस दुःखाचा करूं नकोस; तुला माझ्या तातांची भीति वाटते पण तूं मजसंबंधानें कांहीं विचार केला अहेस कां ?—

पद. चाल. स्वमनीं वा नयनींही.

अंगिकार तव करितां नच येई जरि मजशीं ॥ काय असे कार्य मला तरि सांगे ताताशीं ॥ स्वाधिन जोंवरि आहे मन्मन हें माझ्या गे ॥ तोंवरि मी कां न वघूं त्वद्गुणांस अनुरागें ॥ १ ॥

प्रिये, कोणत्याही गोष्टीविषयीं मनांत वाईट आणलें तर सर्वच वाईट दिसूं लागतें व चांगलें आणलें म्हणजे चांगलें दिसूं लागतें यासाठीं चांगलेंच मनांत आण. तूं असेंच कां समजत नाहींस?--

पद. चाल. रम्य विमानीं ही.

इच्छिसि तूं अंतरीं ॥ सुंदरी ॥ धन्य दिवस तो कंकणमंडित कर देण्या ममकरीं ॥ १ ॥ ब्राह्मण त्या अवसरीं ॥ तवशिरीं ॥ टाकुनि मंत्राक्षता सखे तुज तोषविती बहुपरी ॥ २ ॥ भाग्याचा तो पहा ॥ सुदिन हा ॥ आज असे होउनि मम वधु तूं पावशील सुख महा ॥ १ ॥

मालती—प्रिया, आपण इतकें खात्रीनें सांगत आहां तर मी तरी कशाला उगीच भलतें मनांत आणूं?—

पद. चाल. वैशाखमास ही.

जगदीश करो पूर्ण कृपा आपुणावरी ॥ वदतां ती होवो कीं सत्य वैखरी ॥ धृ. ॥ मनिं त्याच्या आलें जरि हें घडावया ॥ एक नको घटिकाही मगाचि त्या प्रिया ॥ तोचि करिल पूर्ण हेतु मनिं धरोनिया ॥ राहतसे निष्काळजि मी निजांतरीं ॥ १ ॥

माधव--(समोर पाहून) प्रिये, हे पाहिलेंस कां आपल्या-

घरीं बोलावलेले लोक यायाला लागले तर त्यांचा आदर सत्कार करूं चल. आज जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला पाहिजे.

(गोपाल प्र. क.)

गोपाल—मालती, हें कायगे असें आपल्याकडे पाहुणे आले त्यांची व्यवस्था नाहीं कां ठेवायची! खरेच अलिकडच्या पोरींनां कामें अगदीं नकोंत. एखाद्या राणीप्रमाणें नटूनथटून बसून गप्पा मारायाला पाहिजेत. चल घरांत. ते दोघे अनोळखी गृहस्थ आले आहेत त्यांची नीट तरतूद ठेव. तो गोंद्या कोठें गेला? (गोंद्या येतो) कायरे तूंही आपला जिकडे जातोस तिकडेंच; खंडोबाची पुजा करावयाची; लोकानां प्रसाद द्यायाचा तो टाकून काय करीत होतास? माझें झातारपण झालें; आतां हें काम तूं पहावें नाहीं तर कोणी? (माधवास) जावईबुवा–तुह्माला आतां जावईबुवा ह्मणायला कांहीं हरकत नाहीं–तुह्मी आज आह्माला मदत करा आणि लोक जमले आहेत त्यांनां त्यांच्या योग्यतेप्रमाणें बसवा. चला.

(सर्व जातात)

प्रवेश ३ रा. गोपालाच्या वाड्याबाहेर.

---:o:---

(वेषांतर केलेले राजा भद्रसेन आणि वसुभूति प्र. क.)

भद्रसेन--प्रधानजी, कोणी असें ह्मटलें आहे तें खरें आहे

पद. चाल. देवस्त्री मेनका ही.

या भुवनीं जो असे निपुत्रिक दुःख तया होतें ॥
अथवा झाला मृत होउनिया पुत्रचि कीं ज्याते ॥
पण या दुःखाहुनिही असते विशेष कीं त्याते ॥
यत्सुत अवमानुनि जनकासी धरि दुर्मार्गाते ॥ १ ॥

ह्मणून दूतमुखानें माझा माधव त्या गोपकन्येच्या प्रेमपाशांत सांपडून आपलें नित्यकर्म विसरला हें ऐकून त्याविषयीं फार काळजी वाटत आहे.

वसुभूति—माहाराजांनीं अतां घटकाभर सर्व काळजी एकीकडे ठेवावी; आपण सांप्रत जें वेषांतर केले आहे तें इतकें बेमालुम आहे कीं धाकटे सरकार आपणांस मुळींच ओळखूं शकणार नाहींत; तर आतां या गोपालांत मिसळून युवराजाविषयींचा खरा काय प्रकार आहे तो बारीक रीतीनें पहावा. व मग योग्य वाटेल तसा बंदोबस्त करावा. आणखी मी असें

ऐकलें आहे कीं हा गवळी पूर्वी अगदीं निर्धन असून आलीकडेच मोठा सधन झाला आहे व त्याची कन्या ही अप्रतिम सुंदर व अनेक गुणसंपन्न आहे; गोपकुलांत असें स्त्रीरत्न विधात्यानें निर्माण केलें असेल असें मला वाटत नाहीं, तर त्या संबंधाचा सर्व खुलासा महाराजांनीं त्या गोपालापासून काढून घ्यावा. हे लोक जात्या फार भोळे असतात तेव्हां ते समजून घेण्यास आपणांस फारशी पंचाईत पडेल असें नाहीं.

भद्रसेन—ठीक आहे; तुम्ही म्हणता तसेंच करूं ? बरें चला आतां त्या गोपाळ मंडळींत.

(गोपालांच्या मंडळींत येऊन बसतात.)

गोपाल—या. बसा. आपणांस जरी मी कधीं पाहिलेलें नाहीं तरी आपण कोणी थोर गृहस्थ आहां असें आपल्या मुद्रे-वरून मला वाटतें. व आज आपण माझ्या घरीं आला हा मी अलभ्य लाभ समजतो. (मुलास) गोट्या, त्यांना पानसुपारी, खंडोबाचा प्रसाद देशील कीं नाहीं ?

गोटपा—(तसें करितो व मालतीस) ताई, या पाहुण्यानां फुलें देतींसना ?

(माधव आणि मालती येतात.)

वसुभूति—(त्रिजकडे पाहून मनांत) अरे, ही गोपकन्या

फारच सुंदर आहे. उगीच नाहीं तरी आमच्या युवराजांचें प्रेम इच्याठायीं जडलें. मला तर ही प्रति राधिकाच आहे असें वाटतें.

सुधन्वा--(तिला पाहून वसुभूतीच्या कानांत) प्रधान-जी, आपण ह्मटल्याप्रमाणेंच ही गोपकन्या मला दिसते; व माधवाचीही तिजवर पूर्ण प्रीति जडलीशी वाटते; तर या-वरून तो नुसत्या उपदेशानें इचा नाद सोडण्याची आशा दिसत नाहीं. त्यास कांहीं तरी धाकच घातला पाहिजे.

वसुभूति--ही जशी रूपानें चांगली आहे तशी गुणांनींही चांगलीच असेल. हिला पाहतांच साहजिक इच्याविषयीं प्रेम-भाव उत्पन्न होतो.

भद्रसेन--तें कांहीं असले तरी तिच्या प्रेमपाशांतून मा-धवाला ओढून काढलाच पाहिजे. असो आतां पुढें पाहूं काय होतें तें.

मालती--(त्यानां पाहून माधवास) प्रिया, काय असेल तें असो या दोघांना पाहून माझ्या उरांत धडकीच भरलीसे वाटतें. हे कोणवेर असावेत.

माधव--ते कोणीतरी सुवर्णपुरांतले असतील. पण त्यां-चीं एवढी तुला भीती वाटण्याचें काय कारण? जा. त्यानां

फुलें दे; मीही त्यांच्याजवळ बसतों मग तर कांहीं हरकत नाहींनां ?

मालती--(राजास) आपण हीं पारिजातकाचीं फुलें घ्यावीं. हीं फार सुकुमार आहेत. लौकर कोमेजतात. (फुलें देते)

भद्रसेन--मुली, तूं आमच्या वयाला अनुरूप अशींच फुलें दिलींस; यांचें सौंदर्य जसें क्षणैक तसेंच आतां आमचें आयुष्य आहे.

मालती--आपणांस रंगाचीं फुलें आवडणार नाहींत ह्मणून हीं पांढरीं दिलीं. आणखी खरेंच पुसाल तर तसलीं रंगीबेरंगी फुलें मलाही पण आवडत नाहींत.

भद्रसेन--मुली, तुला रंगांची फुलें कां बरें आवडत नाहींत?

मालती--त्या फुलांचा काय तो वर रंगच पाहून घ्यावा, बाकी त्याना सुवास मुळींच नसतो.

भद्रसेन--(मनांत) एकूण केवळ वरच्या गुणांस ही मोहित होत नाहीं; अंतर्गुणांची ही परिक्षा करिते. गोपकन्येच्या अंगीं इतकें शहाणपण असावें हा मोठा चमत्कार आहे.

माधव--(मालतीस) आम्हांला फुलें वगैरे द्यावयाचीं नाहींत वाटतें ?

मालती—आपणांला योग्य अशीं सुमनें देण्याला मजजवळ नाहींत. वसंतऋतु असतां तर दिलीं असतीं.

माधव—मला पुष्कळ सुमनें नकोंत एकच दे म्हणजे पुरे.

मालती—ते कोणतें ?

माधव--तें बागेंत वृक्षानां येत नाहीं. तुझ्या हृदयांत विकासित होतें.

मालती--समजलें. पण तें सुमन आतां मजपाशीं राहिलेलें नाहीं; कधींच ते नेलें.

माधव—नेलें कां दिलें ?

मालती—कांहीं कां म्हणानां ? पण सांप्रत मजजवळ नाहीं खरें.

माधव—तर मग तोपर्यंत हा तूं गुंफलेला बकुलपुष्पांचा हारच मीं गळयांत घालतों.

मालती—तोंपर्यंत म्हणजे ?--

माधव--पहा--

साकी.

विवाह झाल्यावरि तूं करितां गोष्टी मशि एकांतीं ॥ घेशिल घालुनि बाहुहार हा मत्कंठीं वि-

श्रांती ॥ त्यासमयीं याते ॥ टाकुनि देइन प्रिय दयिते ॥ १ ॥

मालती--तो समय येईल कां नाहीं याची शंकाच आहे. आपण असें म्हणून आनंद मानीत आहां पण माझ्या मनाची स्थिति कशीशीच झाली आहे.

माधव--त्याची तशी स्थिति होणें साहजिक आहे. पहा--

पद. चाल. भाषण किति मधुर ही.

कोकिलेस लाजविती गोड बोल कीं जिचे ॥ हंसीची गति त्यापरि चित्ताला बहु रुचे ॥ राजमंदिरास योग्य रूप तुझें जरि असें ॥ या गोकुलिं तव मनास सुख होइल तरि कसें ॥ १ ॥

मालती--नका गडे मला वारंवार असें बोलून हिणवीत जाऊं. अथवा आपणांस असें म्हणणें ही माझी चूक आहे; कारण कामीजनांस आपल्या प्रिय वस्तुचे ठिकाणीं दोष कधींही दिसत नाहींत.

माधव--सुंदरी, हें तूं अगदीं खोटें म्हणतेस ! अगे, कामीजनाप्रमाणे तीव्र दृष्टी तर दुसऱ्या कोणाचीही नसते. पहा--

अंजनीगीत.

ज्या रूपाची पारख कधि ही ॥ इतरानां नच क

रितां येई ॥ कामीजन तो करि लवलाही ॥ कथितो सत्य तुला ॥ १ ॥

मालती—(मनांत) आतां काय बोलावें बाई !

भद्रसेन—(स्वगत) काय चमत्कार आहे पहा—

दिंडी.

राजकन्येमधिं जे न मिळायाचे ॥ रूप सद्गुण ते मिळति इला साचे ॥ नीच वंशामधिं जन्म घेउनी-या ॥ धन्य त्यासी ही खचित करि जगीं या ॥ १ ॥

असें जरी आहें तरी इचा संबंध राजकुलाशीं होणें कोणी-ही पसंत करणार नाहीं. बरें आतां अगोदर माधवाविषयीं तिच्या बापाचें मत काय आहे तें पहावें. (एकीकडे गोपा-लास) कांहो बुवा, तुमच्या मुलीशीं बोलतो आहे त्या तरुण मुलाचें नांव काय व तो कोण आहे ?

गोपाल—त्याचें नांव मुकुंदा आहे व त्याचें माझ्या मु-लीच्या ठिकाणीं फार प्रेम आहे; तो घरचा चांगला सुखी आहे असें त्यानें मला सांगितले आहे. मी त्याविषयीं कांहीं विशेष चौकशी केली नाही पण तो खोटें बोलणार नाहीं अशी माझी खात्री आहे. त्याच्या प्रमाणेंच माझ्या मुलीचेंही त्याच्यावर

अत्यंत प्रेम आहे. मला वाटते हा दोघांचा जोडा कसा चांगला जमेल; यासाठीं आज आपणा सर्वांचे मत घेऊन त्यांच्या लग्नाचें ठरवावें. आपल्या विचारास कसें काय येते ?

भद्रसेन—थांबा जरा विचार करून सांगतों.

(विचार करितोसे दाखवितो. व कोमट्याच्या वेषानें ठग प्र. क.)

ठग—

पद. चाल जगिं आशेचाही.

घ्या घ्या कोणी नानापरिचीं सुंदर भांडी मज-
पासोनी ॥ देतों तुह्मां किंमत थोडी अथवा लुगडीं
जुनि घेवोनी ॥ देवपुजेचें तबक सुबक हें घंटा
अडणी तशि शंखाची ॥ उदबत्तीचें घर नीरांजन
त्यापरिवाटी नैवेद्याची ॥ कापुर ओवाळाया
केली हलकार्ती ही किति गमतीची ॥ अनमान
नका करु घेण्याला आवड जरि हो देवपुजेची॥१॥

गोव्या—अरे, हा कोण कोमटी आला वाटते मी ताईला पुष्कळ दिवस एक पितळेचा डबा व बिलवर देण्याचे कबूल केले आहे ते हा अनायासे आला आहे तर घेऊन देतो. (हाक मारतो) अरे, ए कोमटी इकडे ये. (इतक्यांत घरातून

रंगू येते तिला पाहून) कांग तूं का घरातलें काम सोडून इकडे आलींस ?

रंगू—मला कोमट्याजवळून कांहीं जिनसा घ्यायाच्या आहेत त्या आपण आज मला घेऊन द्या.

गोव्या—छे, तुला आज कांहीं मिळणार नाहीं. मी फक्त ताईसाठीं एक डबा घेणार आहे.

रंगू—जेव्हां तेव्हां आपलीं वन्संचीच भर करायाची. माझी पाळी कधींच यायाची नाहीं.

गोव्या—मग तिला दिलें ह्मणून तुला कां वाईट वाटतें. आणखी तूं इतकी कां वेडी आहेंस आज आपल्या घरीं हे चार पाहुणें जमले असतां त्यांच्या देखत तूं असा हट्ट घेतेस. काल त्या लुच्यानें माझा खिसा कातरला; नाहीतर आज तुल ही कांहीं घेऊन दिलें असतें.

रंगू—तें कांहीं मी ऐकायची नाहीं. मी मागते तें आज मला घेऊन दिलें पाहिजे.

गोव्या—चल शहाणी आहेंस. ताई तुला डबा पाहिजे ना ?

मालती—भाऊ आज मला कांहीं नको; वहिनी मागते तें तिला आज घेऊन दे. मी घेईन एखादे वेळेस पुढें.

गोप्या—आमच्या ताईसारखी शहाणी खचित कोणी न-सेल (वायकोस) नाहीं तर तूं. (ठगास) बरें, अरे, तुज-जवळ काय काय आहे तें दाखिव पाहूं ?

ठग—(दाखवतो) या पहा—ही हस्तीदंती चांगली फणी आहे इचे दांत कसे नामी कातलेले आहेत.

रंगू—ही फणी मला पाहिजे. मेले त्या लाकडाच्या फ-णीनें मुलींच केंस विंचरतां येत नाहींत. ही द्या.

ठग—आणखी ही पेटी–इच्यात आरसा आहे, कुंकु, काजळ ठेवायाला निरनिराळीं पुडें आहेत. आणखी नेहमीचें डागडागिने ठेवायालाही खालीं जागा आहे.

रंगू—ही पेटी तर घेतलीच पाहिजे. माझे नेहमी वेणी घालायाचे सामान अस्ताव्यस्त पडतें ते ही पेटी घेतली ह्मणजे पडणार नाहीं.

गोप्या—(ठगास) तुला दाखवायाला काय होतं आणि इला पण मागायाला काय होतें. पण आह्माला पाहिलं पाहि-जेनां ? बरें पण तुला चांगली चांगली कांहीं गाणी येतात कां ?

ठग—होय येतात.

गोप्या—तर मग ह्मण पाहूं एखादें.

ठग--ऐका-या गाण्यांत कृष्ण सत्यभामेची समजूत करितां आहे—

पद. चाल. नीरक्षीरालींगनही.

पारिजात सुम सवतिस दिधलें ह्मणुनी पतिवरि रुसुनीया ॥ रागें भूवरि भामा निजली केंस मोकळे सोडुनिया ॥ मग येउनि हरि तिजला अपुल्या अंकावरती घेउनिया ॥ पुसें काय कारण झाले अशि कृति गे तुजला करावया ॥ ती बोले त्या बोलु नको मशि तूं अससी कीं बहु कपटी ॥ सवतिस देशी देवतरूसुम प्रीती दाउनि मज खोटी ॥ हरि समजुत करि याकरितां हा कोप करी नच तूं इतका ॥ तिस सुम नुसतें दिलें परी तुज देइन मी पारिजातका ॥ १ ॥

गोपाल--अरे, गोख्या, येथें ही गडबड नको; तुला गाणी ऐकायची असतील तर त्याला एकीकडे घेऊन जा.

गोख्या--बरं आहे (ठगास) अरे, तूं चल एकीकडे मला तुझी गाणी ऐकायला फार आवडतात तर आणखी कांहीं ह्मणून दाखीव. (रंगूस) आणखी तूं चल तिकडे ह्मणजे तुला काय पाहिजे तें घेऊन देतो.

ठग—चला हा मी आलो—

पद. चाल. अंजनपर्वा ही.

या बायानो सामानाची खरेदि लौकर करण्याला ॥ पैसे आणा पतिपासुनि मी तयार आहे देण्याला ॥ त्यानी नाहीं दिधले तरि तुह्मि त्यावरि रुसुनी हट्ट धरा ॥ पण मौजेचे जिन्नस घेउनि हेतू अपुला पूर्ण करा ॥ १ ॥

(रंगू, गोप्या, व ठग जातात.)

गोपाल—गेली एकदांची कटकट. (भद्रसेनांस) बरें, कांहो, मी विचारिलें त्यांचें आपण कांहीं सांगितलें नांहीं?

भद्रसेन—त्याला विचारून काय तें सांगतों? (माधवास) कसें काय? तुह्मी तर आपल्याच सुखांत बिमग्न आहांत. तुमच्या प्रियेवांचून तुह्मांस कांहीं सुचत नांहीं. पण मला मोठे नवल वाटतें की तुह्मी आपल्या प्रियेचा हट्ट कांहींच पुरवलेला दिसत नाहीं. तिला कांहीं दागिने दिलें नाहींत. एखादें मौल्यवान् वस्त्र दिलें नाहीं. मघाशीं तो कोमटी आला तेव्हां कांहीं तिला घेऊन द्याल असें आह्मांला वाटलें पण त्यालाही तुह्मी तसेंच परत जाऊं दिलें.

माधव—अहो, तुह्मी ह्मणतां ती गोष्ट दुसऱ्या स्त्रियानां

लागूं असेल; माझी प्रिया असल्या क्षुल्लक गोष्टीकरितां कधींच हट्ट घेऊन बसणार नाहीं. पहा—

दिंडी.

तिला आवडता जो पदार्थ आहे॥ सतत तो मत्हृ-
दयांतरींच राहे॥ तोचि यासमयीं तिला अर्पि-
ण्याते॥ असें केलें मी पूर्ण निश्चयाते॥ १॥

(मालतीस) प्रिये, आपणाकडे आलेले हे वृद्धबोवा मोठे थोर गृहस्थ दिसतात यांच्या समक्ष तुला मी सांगतों कीं—

पद. चाल. सुखोपभोगा ही.

गौरवर्ण हा भूषणमंडित कर जो तव दयिते॥ नि-
श्चयपूर्वक निजकरिं धारण करिनचि मी त्याते॥१॥

भद्रसेन—पण हा आपला निश्चय सतत कायम राहिल याला प्रमाण काय?

माधव—माझें वचन हेंच याला प्रमाण पुरें आहे. तथापि (मालतीस) प्रिये, तुला प्रमाणच पाहिजे असेल तर--

साक्षी याला हे दोघेजण जाणे महि तैसी॥
अंतर नच कधि पडेल सखये या मद्वचनासी॥ २॥

अहाहा! फार काय सांगूं? मला इतका आनंद वाटतो कीं--

पृथ्वी सारी मिळतां देतां कुबेर निज धनही ॥ गी-ष्पति विद्या तोष न त्यांचा याहुनि मजकांहीं ॥१॥

भद्रसेन---आतां कसलाही संशय राहिला नाहीं !

वसुभूति--याचेंच नांव खरी प्रीति !

गोपाल—जावईबुवांचे मनोगत कळलें. बरें. पण मुली या-वर तुझें काय म्हणणें आहे.

मालती—बाबा मला काय पुसतां ? पुरुषाप्रमाणें बायकां-नां आपल्या मनांतलें कांहीं बोलून दाखवता येत नाहीं.

गोपाल—तर मग आले माझ्या लक्षांत सारे. आता या दो-घांसमक्ष मी या मुकुंदाच्या हातांत आपल्या लाडकीचा हात देणार. व त्याला योग्य आंदणही देणार. मजपाशीं कांहीं कमीनाहीं.

माधव—अहो, सद्गुण धनाला मुळी मोलच नाहीं. (स्व-गत) याला मी राजपुत्र आहे असें माहीत नसल्यामुळें हा असें म्हणतो. असो. (उघड) बरें हा आपला निश्चय कायम झाला?

गोपाल—होय. बरें, मुली, अशी या! मुकुंदाजवळ बैस पाहूं. मला तुमचा जोडा कसा शोभतो ते पाहूं दे. (ते तसें करितात.) जावईबुवा, वचनाप्रमाणें माझ्या मुलीचा सांभाळ करा. माझी म्हणून वाखाणावी असें नाही तिच्या अंगीं पुष्कळ सद्गुण अहेत. आतां उपाध्यायाला बोलावूं कां ?

भद्रसेन—जराथांबा, वृद्धबुवा. (माधवास) कायरे बाबा, तुझा पिता जिवंत आहे कां?

माधव—होय आहे.

भद्रसेन—आणि त्याला हा तुझा प्रेम संबंध माहीत आहे कां?

माधव—नाहीं. आणि तो त्याला कळूंही द्यायाचा नाहीं.

भद्रसेन—कांबरे ?

पद. चाल. नाहींसुभद्रा ही.

जनकाचें मत घेती जे कुणि निजविवाह करितां ॥
ती जनरीती नच आवडते कां तुझिया चित्ता ॥
काय असे तो अंध, मूर्ख वा बहिराकीं झाला ॥
वेडा होउनि व्यवहारांतिल नकळेमुळि त्याला ॥
कीं दुखणें त्या येउनि सांप्रत अंथरुणा खिळला ॥
यास्तव तुजला भागाचि पडते नच पुसणें ताता ॥

माधव—तसें कांहीं नाहीं.

भद्रसेन—मग तूंच आपण होऊन बायको पसंत करितोस हें जरी एकपक्षी चांगले आहे तरी ज्याची केवळ तुझ्या कल्याणावर सर्वदा दृष्टी असते त्या पित्याचा रुकार न घेणे हें त्याचा अपमान करणें नाहीं कां ?

माधव--आपण म्हणतां तें खरें पण कांहीं अशीं कारणें

आहेत कीं त्यामुळें ही गोष्ट मला माझ्या पित्याला कळवतां येत नाहीं.

गोपाळ--पण असें कां बरें जांवईबुवा ? मला वाटलें नाहीं कीं ही गोष्ट तुम्ही आपल्या पित्याला अगदीं कळवणार नाहीं असे. आतां हा दुराग्रह सोडा; आणि अजून त्यांना कळवा. आपली निवड त्यांना नापसंत होईल असें मला वाटत नाहीं

माधव--छे, मी कांहीं त्यानां कळवणार नाहीं. मग तुम्ही हा संबंध करणार ना

भद्रसेन--पाहूं ? बरें हा संबंध कोण कसा करतो तें ? आह्मी तर हा संबंध तोडणार (एकदम वेष टाकून) दुष्टा,

पद. झंपा.

॥ नीच असली किती वाटते लाज मज पुत्र तुजला ह्मणायास आतां ॥ योग्यता आपुली सारि विसरुनि कशी गोपकन्येवरी करिशि ममता ॥ राजदंडचि करीं घ्यावयाचा सुता ॥ तयामाजिं कां धरिसि गोपायुधा या ॥ १ ॥

अरे म्हाताऱ्या, म्हातारपणीं तुला हे ढंग सुचले अं ? आपली योग्यता किती; कोणाशीं संबंध करितो याचा कांहीं विचार केलांस ? तुला सुळी दिले असते पण तूं थोडे दिवसां-

चा सोबती आहेस म्हणून तसें करीत नाहीं. (मालतीस) हे मूर्खे, कुटिले, गोपकन्ये, लोकानां मोहिनी घालणारे हें तुझें रूप विरूप करून टाकतो म्हणजे पुनः असलें कवटाळ करणार नाहींस. पहा–

साकी.

राजपुत्र हा ठाउक असतां कां तूं त्या मोहविशी
'सुंदर मी परि गोपसुता तरि होईन राज्ञी कैशी'
विचार हा तुजला ॥ कैसा नच्च तरि आवडला ॥

असो. तुझींही या वेळीं गय करितो; तुझें सौंदर्य राजकुलाला शोभणारे आहे तरी ते गोपकुलांत निर्माण झालें आहे; तर तूं कोण्या गोपाला मोह घाल. याला पुनः आपणाकडे येऊं देशील किंवा त्याचें मन मोहूं पाहशील तर तूं स्त्री आहेस याचा विचार न करितां एकदम तुझा शिरच्छेद करीन. (माधवास) काट्यां, चल मजबरोबर. यावेळीं तुला क्षमा करीन पण जर पुनः असला भलता छंद धरशील तर मला आणि राज्याला तुला मुकावें लागेल. (प्रधानास) प्रधानजी, तुह्मी आपल्या बरोबर या सर्वांनां घेऊन या.

(असें ह्मणून निघून जातो.)

गोपाल—हायरे कर्मा! विनाकारण महाराजांच्या कोपास मी पात्र झालो नां?

मालती--हायहाय! शेवटीं दुर्दैवानें आपलें तेंच खरें केलें–

अंजनीगीत.

सौख्याशा जी स्वमनीं धरिली ॥ आज सर्व ती विलया गेली ॥ अभागिनी ही कारण झाली ॥ दुःखा जनकाच्या ॥ १ ॥

(माधवास) महाराज, शेवटीं असें होणार हें पूर्वींच नाहीं म्हटलें कां मी? असो—

पद. चाल. बलसागरही

जा आतां तुम्हि परतुनि सखया अपल्या सदनाला ॥ मजसाठीं नच मुका तरी हो राज्या स्वजनाला ॥ सुन न यावरि मी नृपतीची कथितें अपुणाला ॥ अक्षय माझ्या पहिल्या गाईं मिळोत त्या मजला ॥ १

वसुभूती—कां ज्ञातारेबुवा; मालतीसंबंधानें आपलें काय म्हणणें आहे तें सांगा. नाहीं तर फुकट पेंचांत याल.

गोपाल—यावेळीं मला कांहीं विचारू नका; (माधवास) महाराज, ज्ञातारपणीं आपण माझ्या तोंडाला काळोखी लाव-

लीत; माझ्या कुळांत कोणाचा अंत नाहीं झाला पण माझा आतां होणार (मालतीस) कार्टे, राजपुत्र ठाऊकअसून तूं त्यावर प्रेम ठेवलेंस अं ! असो; तुझ्याकडे काय बोल. माझेंच प्रालब्ध फुटलें. (जातो)

मालती—महाराज, मी आपणांस ह्मणत नव्हतें कां कीं मी राजाची सून कोठपर्यंत ? कोणाला कळलें नाहीं तोंपर्यंत.

माधव--पण इतक्यांतच तूं अशी निराश होऊन आपणांस वाईट कां वाटूं देतेस ? अजून तूं राजाची सून कां नाहीं होणार ? पहा—

पद. चाल. अबलास्त्री ही.

नभमंडल हे कधि भवरती पडेल कोसळुनी ॥ वचन तुला मी दिधलें मीथ्या होइल नच तरुणी ॥ राज्य सर्व तें मिळुनी मजला जरि तूं अंतरसी ॥ नको नको तें त्याहुनि शतपट तूं मज आवडसी ॥ १ ॥

(**वसुभतीस**) कांहो प्रधान वसुभूवतीना आपण ?

वसुभती—होय तोच मी युवराज, पण आपण हें काय ह्मणतां; अशा अविचारानें निःसंशय आपण विडिलांच्या प्रेमास व वैभवास मुकून मोठ्या विपत्तींत पडाल. याचा नीट विचार करा.

माधव—प्रधानजी, विचार तो कसला करावयाचा ? तुम्हांला इतकें खचित सांगतों कीं—

साकी.

सारी वसुधा नभिचीं तैसी उदधीतिल रत्नें ती ॥ मिळलीं मजला तरि नच होइल हर्ष असा कीं चित्तीं ॥ देई जरि हस्ता ॥ मत्करिं ही मत्प्रिय दयिता ॥ १ ॥

वसुभूति—युवराज, हे आपलें बोलणें अति झालें.

माधव—अति म्हणा कीं काहीं म्हणा; मी आपलें वचन कधीं खोटें करून इला फसवणार नाहीं. आतां तुम्ही माझें एक काम करावें—

पद. चाल. नको हरि निशीं ही.

निरोप सांगा ताता तुम्ही कीं गोपसुता स्त्री तनयाला ॥ करुनी दिधली नच म्हणुनी तो निघुनी देशांतरिं गेला॥मग यायोगें तत्कोपाग्नी प्रदीप्त होतां तत्शांती ॥ होण्या तुम्हि त्या बोध करा तो आणा मानिं ही मम विनती ॥ १ ॥

वसुभूति—पण युवराज, आपण आतां कोठें जाणार ?

माधव—कोठें जाणार हें कसें सांगावें ? आतां आम्ही दैववादी बनलों आहों तेव्हां--

दिंडी.

दैव दाविल तो मार्ग धरूं आतां ॥ सूज्ञ संकटिं त्या मानितात त्राता॥ चित्रतद्वाति किति पहा विघ्न येई ॥ तत्प्रभावें आणखी लया जाई ॥ १ ॥

वसुभूति--(मनांत) याचा तर पळून जाण्याचा दृढ निश्चय झाल्यासारखा दिसतो तर हा भलतीकडे न जाण्याला काय बरें करावें. (विचार करून) हं असें करावें. भद्रसेनमहाराजाबरोबर मी इकडे आल्यावर आमचे पूर्वीचे दिलीप महाराज यांच्या नाहक छळानें सुदक्षिणा राणीसाहेब व युवराज रघु यांचा अंत झालाअसतां आमच्या महाराजांस पश्चाताप होऊन त्यांनीं मला परतयेण्याविषयीं पुष्कळ पत्रें पाठवली; व भद्रसेनमहाराजांची माफी मागितली. नंतर मी स्वदेशीं जाण्याविषयीं भद्रसेनमहाराजापाशीं पुष्कळदां निरोप मागितला पण ते कांहीं केल्याने देत नाहींत. आणि माझ्या मनांस तर जन्मभूमीचे दर्शन घेण्याविषयीं फार उत्कंठा लागली आहे. तेव्हां या उभयतांस मथुरेस जाण्यास सांगावें ह्मणजे माझ्या मनांतील हेतु सहज सिद्धीस जाईल. (उघड) युवराज, माझी आपल्या

तातावर मोठी भक्ति आहे व प्रसंगीं त्यांना मी मोठें सहायही केलें आहे हें आपणांस माहित असेलच.

माधव---होय आहे.

वसुभूति—तीच भक्ती त्यांचे पुत्र जें आपण त्यावरही आहे. ह्मणून ज्याअर्थी आपण आपला झालेला निश्चय फिरवित नाहीं त्याअर्थी आपल्या कल्याणाचा मार्ग जर या सेवकावर विश्वास असेल तर दाखवतो.

माधव--प्रधानजी, हीं आपलीं वाक्यें अजून दैवाचा आह्मांवर अनुग्रह होईल अशी आशा लावतात. तर सांगा बरें आह्मी कोठें जावें.

वसुभूति-आतां आपण आणि या आमच्या बाईसाहेब; -आपल्या पत्नी तेव्हां आमच्या बाईसाहेब झाल्याच--उभयतां मथुरा नगरीस जा. तेथें आपल्या वडिलांचे मित्र दिलीप महाराज, ह्मानां पूर्वी आपल्या मित्राशी केलेल्या आचरणाचा हल्लीं फार पश्चाताप झालेला आहे, अशांत त्याचा पुत्र आपण आलेले पाहून फार आनंद होईल व ते आपला चांगला सन्मान करतील व आपला उत्तम परामर्ष घेऊन वडिलाविषयीं कृतज्ञता दाखवतील.

माधव--प्रधानजी, आपण सांगतां त्याप्रमाणें आह्मी करूं

पण दिलीपमहाराजांनीं तुह्मि आपलें इकडे येणें कां केलें असें विचारलें तर आह्मी काय सांगावें ?

वसुभूति—ही शंका आपली बरोबर आहे. आपण जरा एकीकडे घटकाभर बसा तोपर्यंत मी याचा विचारकरून आपणास सांगतों.

माधव—प्रिये, प्रधानजी म्हणतात तसें करूं ?—प्रधानजी,—काय सांगूं ?—

साकी.

स्त्रीरत्न असें मिळलें म्हणुनी वाटे दैवचि मोठें ॥
पण हा येई प्रसंग यास्तव काय असें ते खोटें ॥
याची कुटिल गती ॥ तरंग निपजवि बहु चित्तीं ॥१॥

(सर्व जातात.)

याच प्रवेशाची पुरणिका—स्थळ. तेंच.

(वेष बदलून ठग येतो.)

ठग—अहाहा! या जगांत भोळे लोक आहेत ह्मणून आमच्यासारख्यांची मौज आहे बरं ! नाहीतर मोठी पंचाईत पडली असती. पहा त्या गोव्याबरोबर मी मघां त्याच्या घराबाहेर गेलों तो तेथें सारे गोपाल वाड्यांतले बायकापुरुष जमले आणि जो तो माझें सामान बघूं लागला— नंतर—

साकी.

कोणी चित्रें, कोणी आर्से कुणि घेतलि कातेणी ॥
कोणी सारी खरेदि केली देवपुजाउपकरणीं ॥
घटकेमधि सगळा ॥ माल संपुनी मम गेला ॥ १ ॥

किती वेडे लोक ते; माझें आपलें गाणेंच ऐकत बसलें; पण ही स्वारी थोडीच त्यांच्या सारखी वेडी होती. त्या त्यांच्या गर्दीत मी आपली कर्तबगारी चांगलीच बजावली—

पद. चाल. पंचतुंडनर ही.

सर्वांवरती सारखि दृष्टी त्यावेळीं मी ठेवोनी ॥
कोणा जवळीं काय असे तें घेतलेंचि झट समजूनी॥
घेतालि गांठलि पोरांचीं तीं पाटलि कवण्या नारीची ॥ खिशातुनी लांबविली थैली तशि कवणाची पैशाची ॥ १ ॥

माझें हें काम चालले होते तरी ते सारेजण माझ्या गाण्याचीच वाहवा करीत होते. कोणी गाणें चांगलें ह्मणत होते कोणी आवाजाची तारीफ करीत होते. सारांश त्यानां त्यावेळीं कसली शुद्ध ह्मणून नव्हती. तो गोठ्या तर आपला पक्का वेडाच. थोड्याच वेळांत मी सर्वांना नागवले असते; पण तित-

क्यांत तो ह्मातारडा ' पोरीनें गळा कापला ' ह्मणून ऊर बडवीत आला त्यामुळें माझ्या जाळ्यांतील सारे पक्षी उडून गेले.

(माधव, मालती व वसुभूती प्र. क.)

वसुभूती—युवराज, मी सांगितले त्याप्रमाणें आपण दिलीपमहाराजांस सांगितलेंअसतां आपली सर्व मसलत गुप्त राहील व आपल्या बरोबर परिजन नसल्यामुळे त्यांना त्याकरितां भलताच संशयही येणार नाहीं ? शिवाय मी आपणास अनुकूल असें त्याना पत्र पाठवतों तें आपण जातां तोंच त्यानां मिळेल.

माधव—प्रधानजी, पूर्वी तुम्ही माझ्या ताताचें सहाय केले व आतां मला करीत आहां; यावरून तुम्ही आमच्या कुलाचेंच उपकारकर्ते आहांत.

ठग—(त्यानां पाहून) अरे हे आमचे धनीसाहेब; यांनीं जर ओळखले तर आमची शंभर वर्षे आज भरलींच म्हणावयाची.

वसूभुती—आतां एक राहिलें; आमच्या बाईसाहेबांचा पोषाख राजकन्येला अनुरूप आहे पण आपला पोषाख जरी बराच मौल्यावान आहे तरी राजपुत्राला शोभण्यासारखा नाहीं.

माधव—प्रधानजी, त्याची नको आपणास काळजी,

माझा खरा पोषाख मी आंतून केलेला आहे इच्या बापाचें वचन घेण्या करितांच हा वरून असा केला होता.

वसूभुति—तर मग याचा आतां मुळीच त्याग करावा हें चांगले? (ठगास पाहून) अरे, ए इकडे ये. तू असा भितोंस कां?

ठग—महाराज, मी गरीब आहे.

वसुभूति—खुशाल अस. तुसी गरीबी नको आहे कोणाला पण तिचीं चिन्हें मात्र तुझी आम्ही दूर करितो. हे पोषाख देतात हा घे. राजपुत्राचा जुना पोषाख तुझ्या जन्मजन्मांतरीही तुला मिळणें नाहीं.

ठग—(पोषाक घेताना महाराज, मी गरीब खरा, पण हा घेतानां मला कसेंसेंच वाटतें.

वसुभूति—अरे, लौकर घे भल्या माणसा.

ठग—(घेऊन मनांत) मीं आपणांस चांगलें ओळखतो.

वसुभूति—युवराज, आतां आपण नीट संभाळून जावें. (मालतीस) बाईसाहेब, आपणांसही इतकेच सांगणें आहे कीं कशाही विपत्प्रसंगीं युवराजाविषयींच्या आपल्या प्रेमांत यत्किंचितही अंतर पडू नये.

मालती—हे पण मला, आपण सांगायला नको. चंद्रोदय

राजवाड्यावरच होतो व झोपड्यावर होत नाहीं असें नाहीं. तसेंच पातिव्रत्यराजस्त्रियांतच असते व गोपकन्येंत नसतें असें नाहीं.

वसुभूति—अहाहा, केवढें हें शहाणपण! गोपकुलांत असलें रत्न खचित दुर्लभ होय!

माधव—आपणांस काय सांगूं प्रधानजी; आम्ही जरी मोठ्या कुलांत जन्मलों व आम्हाला शिक्षणही मिळालें तरी इच्यामोठेपणाच्या भाषणानीं आम्हाला खाली पहायला लागतें.

वसूभुति—ज्याना अंगच्चेंच वळण आहे त्यास शिक्षण कशांस पाहिजे.

मालती—पण असें बोलून आपण मला लाजवूं नये.

वसूभुति—असो; आतां आपण जावें. मीही परत जातो व महाराजांस अनेक यत्न करून त्यांचे प्रेम पुनः आपल्या उभयतांचे ठिकाणीं बसेल असें करितो.

माधव—प्रधानजी, असें होणे मला तर फारच कठिण दिसतें. व तसें जर आपण केलें तर खचित आपण कोणी लोकोत्तर पुरुष आहां असें ह्मटलें पाहिजे. बरें आतां घेतों आह्मी आपला निरोप.

वसुभूति—ठीक आहे. ईश्वर आपलें कल्याण करो.

माधव--प्रिये, मालती—

दिंडी.

दैव दुःखामागुनी सौख्य देतें ॥ तसें सौख्यामागुनी दुःख गे तें ॥ जरि आपण भोगितों दुःख आतां ॥ खचित पावूं तरि सौख्य पुढें जातां ॥१॥

(मालती माधव जातात)

वसुभूति--राजपुत्र तर मथुरेस आतां खास जाणार. तर मी असें करितों कीं तो पळून गेला असें भद्रसेनमहाराजांस सांगून ते त्याला पकडण्याला तिकडे जातील असें करितो. मग त्यांच्याबरोबर मी आहेच. यांत राजपुत्राचें मुळींच नुकसान नसून माझा मनोदय जो माझी जन्मभूमी पाहण्याचा तो अनायासे सफळ होईल. कारण तिचे दर्शन घेण्याविषयीं माझ्या मनांत जितकी उत्सुकता आहे तितकी आपल्या स्त्रीविषयीं विरहीपुरुषांच्या मनांतदेखील नसेल.

(असें ह्मणून निघून जातो)

ठग—हं; आतां हे प्रकरण सारे मला कळून चुकलें. आह्मी ठग म्हणजे मोठे धूर्त कोठे काय चालले याचा नाकानें सुगावा लावतो. आमचे कानही तसेंच मोठे तिखट. डोळे तर घारीसारखेच. कसबांत तर कोणी हात धरणारा नाहीं; तेव्हां हें

कसें कळणार नाहीं ? आमचे धनीसाहेब एका स्त्रीच्या नादीं लागून पळून गेले. तेव्हां हें वर्तमान त्यांच्या वडलास कळवलें तर त्यांत कपट केलेंसें होईल आणि ते तर आमचे जीवन, तर तसें करावें. पण नाहीं. हें वर्तमान न कळविण्यांतच अधिक कपट होणार आहे. असो, आज आपली बरीच चंगळ झाली सर्व सामान खपलें. दुसराही फायदा झाला; वाटेंत पोषाख मिळाला तेव्हां आतां मला अकरावा गुरु आला आहे वाटतें.

(समोर पाहून) अरे ही पहा आणखी शिकार ! काय चमत्कार तरी ! या कसबांत जो प्रवीण आहे त्याला देवळांत जा. रानांत जा; वाटेत जा सदा आपलें काम मिळतेंच. आतां यांनीं न ओळखावें म्हणून या मोठ्या मिशा लावतो.

(तसें करितो व गोपाल आणि गोव्या प्र. क.)

गोव्या—बाबा, माझें ऐकतां कां ?

गोपाल—काय तुझें ह्मणणे आहे ?

गोव्या—हे पहा, तुम्ही महाराजानां म्हणा कीं ही मुलगी कांहीं माझ्या पोटची नाहीं सापडली ती वाढवली आहे. झालें, ज्यापेक्षां ही तुमच्या पोटची नाहीं त्यापेक्षां तिने केलेला अपराध तुम्ही केला नाहीं. महाराजही मग तुम्हाला सुळीं देणार

नाहींत. आणखी ही पेटी व कागद त्याना दाखवा म्हणजे त्यांची खात्री होईल.

गोपाल—होय, तूं म्हणतोंस तसेंच सांगेन आणि त्यांच्या पुत्रानें जे जें केलें तेंही सांगेन ? काय वेडा राजपुत्र ? बापाला फसवून मला फसवून मला महाराजांचा व्याही करणार होता.

गोट्या—बाबा, तुम्ही व्याही झालां नाहीं हें फार चांगलें झालें नाहीं तर मग मुलींच सुटायाची आशा नको होती.

गोपाल—बरें चल लौकर नाहींतर मग महाराज भेटणार नाहींत.

ठग—(मनांत) आतां ही वेळ आपला लाट करून घेण्याची आहे. (पुढें होऊन) कांरे गांवढळ तुम्ही कुठें चाललां ? या पेटींत काय आहे ?

गोट्या—कांहीं नाहीं—आम्ही वाड्यांत चाललों.

ठग—वाड्यांत कोणाकडे जातां ? काय काम आहे ! तुह्मी कोण? रहातां कोठें ? तुमचं वय काय ? उद्योग काय ? लौकर सांगा.

गोट्या—तुम्ही कोण जमादार आहां वाटतें.

ठग—आमची खुषी असो कीं नसो आमच्या कपाळीं आलें खरें जमादार व्हायाचें. आणि तुम्हांला नाहीं कां मी जमादार

आहेसा दिसत ? बोलण्याचालण्याची जमादाराची ऐट नाहीं कां माझ्यापाशीं ? जमादाराप्रमाणें तुम्हाला नाहीं कां मी घाबरवीत ? सारांश; जरी तुम्हाला वाटले नाहीं तरी मी नखशिखान्त जमादार आहें समजलां ?

गोट्या--आम्ही गरीब आहोंत.

ठग—तुम्ही गरीब कसले गलीम आहांत ! हे पहा आमच्या पुढें वाण्याची देखील लबाडी चालावयाची नाहीं मग तुमची कोठून ? सांगा वाज्यांत कोणाकडे चाललांत ते.

गोपाल—आम्ही महाराजाकडे चाललों आहों.

ठग--बरं, तुमचे वकील कोठे आहेत ?

गोपाल—वकील तें काय ?

गोट्या—बाबा, सरकारी लोक इनामाला वकील म्हणत असतील. सांगा आम्हांजवळ इनामबिनाम कांहीं नाहीं !

गोपाल—जमादार आमच्या जवळ इनाम कांहीं नाहीं.

ठग—(मनांत) अरेरे ! किति भोळे लोक हे ! आमचे भाग्य मोठे कीं आम्ही यांच्यासारखे भोळे झालों नाहीं; नाहीं तर आम्हांलाही पण लोकांनीं असेंच फसवलें असतें. बरें, यांची आणखी मौज करूं; (उघड) अरे, तुम्ही महाराजाकडे

चालला पण ते हल्लीं वाड्यांत नाहींत. त्यांचें रागानें डोकें फिरलें म्हणून ते शांत करण्याकरितां कोठें निवांतस्थळीं बसले आहेत. त्यांचें डोकें कां फिरलें हे तुम्ही ऐकलें असेलच.

गोपाल—होय त्यांचा पुत्र एका गौळयाच्या मुलीशीं लग्न करणार होता ह्मणून.

ठग—तो गवळी जर शहाणा असला तर त्यानें आतां पळून जावें नाहींतर जर कां तो सांपडला तर त्याची बरी गत नाहीं.

गोट्या—खरें कां? त्याचें काय करतील?

ठग—कोणी ह्मणतात त्याला सुळावर चढवणार व कोणी ह्मणतात त्याला हत्तीच्या पायाशीं देणार. मला वाटते त्याला दोन्ही शिक्षा द्याव्या. गुलाम मादरचोद गवळी महाराजांचा व्याही होऊं पहातो.

गोट्या—आणखी कांहीं जमादार; त्याच्या मुलाला काय करणार?

ठग—त्याला उभा चिरणार? किंवा जिवंत जाळणार. पण त्या दगलबाजांची गोष्ट आपणांस कशाला पाहिजे? तुह्मी भले मनुष्य दिसतां तर सांगा महाराजाशी काय काम आहे तें? मी

वाड्यांतला मोठा वजनदार अम्मलदार आहे तर तुमच्या तर्फे मी महाराजाशी बोलेन. वघा विचारकरा. नाहीतर तुमचें नशीब.

गोट्या—हं बाबा, आतां करा थैली मोकळी आणि जुळवा याच्याशी संधान. नाहींतर पहा हत्तीच्या पायाशीं जावें लागेल.

गोपाल—दे बटव्यातल्या त्याला कांहीं मोहेरा.

गोट्या—(तसें करून) जमादार ह्या घ्या. आतां नाहींनां मला उभा चिरणार किंवा जिवंत जाळणार ?

ठग—(घेऊन) तुलां गाहीं त्या गवळ्याच्या पोराला. गुलामाला हीच शिक्षा पाहिजे. बरें बोला आतां तुमचें काय काम तें ?

गोट्या—हे पहा जमादार तो गवळी आणि त्याचा मुलगा हे आह्मीच आहोंत तर आह्मी सांगतों ते तुम्ही आमच्या तर्फे महाराजाजवळ बोलून आम्हाला सोडवा, म्हणजे आणखी इतकेंच इनाम मी तुम्हाला देइन. मी कोठें पळून जाणार नाहीं पाहिजे तर तोपर्यंत तुम्ही मला सोडूं नका ?

ठग—असें काय ! बरें कांहीं चिंता नाहीं. माझा तुमच्यावर भरंवसा आहे, बरें आतां तुम्ही पुढें व्हां मी तुमच्या पाठोपाठ आलोंच मग मला सगळी हकीगत सांगा.

गोपाल—अरे चल. ते सांगतात तसेंच आपण करूं ? देवानेंच आज त्यानां आपल्या साह्याला पाठविलें. (दोघे जातात)

ठग—माझ्या मनांत सचोटीनें वागावें असें आलें तरी दैव कोठें मला तसें करूं देतें. माझी शिकार आपली नेहमी पुढें ठेवलेलीच असतें. बरें आतां यांची व्यवस्था काय करावी? यानां जावें मथुरेस राजपुत्राकडे घेऊन. म्हणजे कदाचित् राजपुत्राच्या प्रकरणांत यांचा संबंध निघाला तर त्यांत आणखी आपलें दैव उघडण्याचा संभव आहे. बरें. तसें नाहीं झालें आणि राजपुत्रानें तुला यानां इकडे आणण्यास कोणी सांगितलें? 'लुच्या नाहींतर' असें म्हटलें तरी त्याची मला थोडीच लाज आहे! मी आजकालचा लुच्या नाहीं तर जन्माचा आहे.-

पद. चाल. हां हां ह्मणतां हीं.

कोणी वंदा कोणी निंदा माझा स्वहिताचा धंदा॥
तें साधाया असें पुरा मी बनलों लुच्चा कीं सोदा
॥ धृ० ॥ चाल ॥ लौकिकावरी पाणि सोडुनी ॥
कृति करीतसे अशिनिशीदिनीं ॥ धनकमावितों
लोक फसवुनी पाप भय दया मुळिं न मन्मनीं ॥
जोंवरि मी या छंदा ॥ मिळविन तोंवरि आनंदा १

(असें म्हणून जातो)

अंक पांचवा.

———:o:———

प्रवेश पहिला. मथुरेंतिल राजवाडा.

———:*:———

(आसनस्थ राजा दिलीप व जवळ उभे असलेले जनार्दन आणि मधुसूदन व दाक्षायणी प्र. क.)

दिलीप— (दुःखानें)

पद. चाल. धाडुनि दिधलें पत्र तिला ही.

कैशी दुर्दैव्यानें मी ती पतिव्रता गुणवंता ॥ अशि निज वनिता वधिली धरुनी तिजविषयीं निर्दयता ॥ वृथा दोष तिस लावियला कीं जारकर्म केल्याचा ॥ तन्मरणाच्या नंतर झाला अनुताप मला त्याचा ॥ बारा वर्षें झाली हृदयीं राहियला तरि साचा ॥ विरहदुःख अनिवार तिचें मज होय काय करु आतां ॥ १ ॥

जनार्दन—राजाधिराज एखाद्या मुनिप्रमाणें आपण आज एक तप पर्यंत राणीसाहेबाविषयीं अनुतापदुःख आचरण केलें; आतां कांहीं तरी त्याचा विसर पाडावा.

मधुसूदन—महाराजांनीं आम्हां दीन प्रजाजनाकडे लक्ष देऊन एवढें ऐकावेंच.

दिलीप—तुम्ही म्हणतां तसें कसें होईल ? पहा---

साकी

विनयवती बहु मधुरालापा उदार चित्ता कांता ॥ हृदयीं आहे तोंवरि नच मज येइल वि-सरुनि जाता ॥ तिशि जी निर्दयता ॥ केली छळिते बहु आतां ॥ १ ॥

अरेरे !

दिंडी

कुठें स्त्रीची त्या थोर अशी शांती ॥ कुठें निर्द-यता आचरिली मी ती ॥ स्वयें पुत्रासह अंत तिचा केला ॥ शल्य टोंचितसें हेंचि मन्मनाला ॥ १ ॥

दाक्षायणी—महाराज, आपण अगदीं खरें म्हणतां. आमच्या सुदाक्षिणा राणी सारखी माउली पुनः कधीं व्हाव-याची नाहीं. सर्व स्त्रियांचे सद्गुण एक करून त्यांची मूर्ती कशी दिसेल हें पहाण्याकरितांच ब्रम्हदेवानें तिला निर्माण केलें होतें

कीं काय असें मला वाटतें. महाराज आतां आपण दुसरी बायको जरी केली तरी जिचा वध आपण केला तशी मिळणार नाहीं.

दिलीप—होय खरोखरच मिळणार नाहीं. आणि म्हणूनच मला दुसरा संबंध करणें नाहीं. पण तुम्ही काय म्हटलें! तिचा मी वध केला काय? होय केला; खराच केला. पण असें कोणी म्हटलें कीं माझें हृदय फाटून जातें.

जनार्दन—दाक्षायणी बाई, महाराजांच्या हृदयाला लागणारे शब्द वरचेवर बोलून त्यानां तुम्ही कष्टी कां करता! तुम्हाला बोलावयाला दुसरें कांहीं नाहीं कां? अशा प्रसंगी तुम्ही जर महाराजांना हिताच्या दोन गोष्टी सांगितल्या तर त्यांत त्यांचें तुमचें व आम्हा सर्वांचें कल्याण आहे.

दाक्षायणी—मी तुमच्या बोलण्याचें धोरण समजलें. आतां महाराजांनीं पुनः लग्न करावें अशी तुमची इच्छा आहे.

मधुसूदन—होय; पण तशी तुमचीही कां नसावी? आमच्या राणीसाहेब पुण्यशील त्या तर गेल्या पण आतां असा शोक केला असतां अथवा महाराजांनीं द्वितीय विवाह न केला असतां त्या कांहीं परत येतात असें नाहीं. सध्याच्या प्रसंगीं काय प्रकार झाला आहे पहा—

पद. चाल. मलिनवस्त्र परिधान ही.

अपत्य कोणी मुळिं नाहीं तें उरलें भूपतिला ॥ तत्वंशतरू वाढायाचा खुंटुनिया गेला ॥ या राज्याचा वारस कोणी नच तो राहियला ॥ प्रजाजनांवर बहु दुःखाचा प्रसंग हा आला ॥ १ ॥

हें सर्व टळण्याचा मार्ग महाराजांनीं द्वितीय संबंध केला तरच आहे; हें आपण जाणत असून या गोष्टीच्या आड येतां हें केवढें आश्चर्य आहे ?

दाक्षायणी—आपण म्हणतां तें सर्व मला कळतें. पण सुदक्षिणेसारखी दुसरी स्त्री महाराजानां पुनः मिळेल कां ? बरें, आणखी पहा; ती अरण्यांत टाकलेली कन्या तिच्याशिवाय महाराजांच्या दैवीं दुसरें अपत्य नाहीं असें जर श्रींनीं सांगितलें आहे; तर तें दुसरी बायको करून खोटें होईल कां ? मग उगीच विषाची परिक्षा ती कां पहायची.

मधुसूदन—ती टाकलेली कन्या पुनः सापडण्याची आशा नको; जयसिंहाचा आणि तिचा एकेच वेळीं अंत झाला यांत संशय नाहीं; नाहीं तर तो कधींच परत आला असता; अथवा त्याच्या शोधार्थ जे इतके लोक पाठवले त्यांपैकीं कोणाला तरी भेटला असता.

दाक्षायणी—मला नाहीं तसें वाटत. गुरुजींच्या वचनावर माझा पक्का विश्वास आहे. त्यांनीं आश्वासन दिल्याप्रमाणें खचित महाराजांची कन्या अजून त्यानां भेटेल. (राजास) महाराज, मी म्हणतें याचा नीट विचार करा. आणखी यांच्या नादीं लागूं नका. मी खचित सांगतें कीं हे आपणांस दुसरें लग्न करावयाला लावून आणखी आपल्या दु:खाची भरती करणार ?

दिलीप--दाक्षायणीबाई, आपण म्हणतां तें खरें आहे. त्या वेळेसच जर मी तुमचें ऐकलें असतें तर आज हा प्रसंग कशाला येता, ती साध्वीही जिवंत असती; पुत्रही मोठा होऊन मला सहाय करीत असता व कन्याही मजपाशीं राहून मला आनंद देत असती. पण आतां त्याचें काय?—

पद. चाल देवस्त्री मेनका ही.

मिथ्या संशय घेउनि तिजला नाना परि छळुनी ॥
सुतकन्येसह तद्विरहामाधिं पडलों दिनरजनीं ॥
आतां दुसरी स्त्री केल्यावरी ती नसतां तैशी ॥
वागलोंचि मी जरि प्रेमानें निष्कपटें तिजशीं ॥
तरि मन माझें टोंचिल मजला चुकि ही दाखवुनी
तिशिं वर्तन तें आणखि इजशी हें तरि कां ह्मणुनी ॥ १ ॥

दाक्षायणीबाई, खचित तशि साध्वी पुनः होणें नाहीं; आणि यासाठींच दुसरी स्त्री करणें नाहीं.

दाक्षायणी—यांत काय संशय. सुदक्षिणाराणीसारखी स्त्री या जगांत कोठें मिळणार नाहीं. आणखी, आपण दुसरें लग्न केलें तर आपलें मन तर आपणांस खाईलच, पण मीही ती साध्वी असतां तिचा छळ केला आणि इच्याबरोबर प्रेमानें कां वागतां असें ह्मटल्यावांचून रहाणार नाहीं?

दिलीप--तुम्ही असें म्हटलें तर तुम्हांला कोणी दोष देणार नाहीं; कारण तुमचे तिजवर तसेंच प्रेम होते; बरें पण तुम्ही भिऊं नका. मी मुळींच दुसरे लग्न करीत नाहीं.

दाक्षयणी—आणखी जर लग्न करणें भागपडलेंच--कारण हे सर्वजण तुह्मांला तसें करावयाला लावणारच--तर बायको बघण्याचें काम मला सांगा. ह्मणजे मी अशी बायको पाहिन कीं तुह्मां सर्वांना ही आपली पहिली राणी सुदक्षिणाच आहे असें वाटेल.

दिलीप—छे, मला मुळींच दुसरें लग्न करणें नाहीं.

दाक्षायणी—असा जर आपला दृढ निश्चय असला तर परमेश्वरास देखील आपली दया येऊन तो पुनः आमच्या परलोकीं गेलेल्या राणीला येथें पाठवील.

जनार्दन—दाक्षायणी बाई, आम्हां सर्वांवर दया करा, आणि महाराजांना दुःख देणारे असे शद्ब पुनः बोलूं नका

दाक्षायणी—मी त्यांना हिणवतें असें समजूं नका. खरो-खरच परमेश्वर अशी गोष्ट करील; माझा त्यावर पुरा भाव आहे.

(द्वारपाल प्र. क.)

द्वारपाल—(मुजरा करून) महाराजांचा विजय असो. महाराज, बाहेर भद्रसेन महाराजांचे चिरंजीव आपल्या पत्नीसह आले आहेत व ते आपल्या भेटीची इच्छा करीत आहेत.

दिलीप—कोण भद्रसेन राजाचे चिरंजीव आणि पत्नीसह आले ह्मणतोस ?

द्वारपाल—होय सरकार. तुह्माला काय सांगूं त्यांच्य स्त्रीसारखी सुंदर स्त्री सगळया जगांत सापडणार नाहीं.

दाक्षायणी—जगांत सांपडणार नाहीं ह्मणजे ? आमची राणी सुदाक्षिणा गेली आणि ही आली कीं काय ?

द्वारपाल—मी खरे कां खोटें म्हणतो याची आपण डो-ळ्यांनीं पहाल तेव्हां खात्री होईल.

दिलीप—जनार्दन, आणि मधुसूदन, तुम्ही त्यानां सामोरे जाऊन सन्मानानें घेऊन या.

दोघे—जशी महाराजांची आज्ञा (जातात)

दाक्षायणी—आजवाल रघु जिवंत असता तर तो याच्या वरोबरीचा असता. पण तो आहे कोठे; असो; देवाची मर्जी!

दिलीप--दाक्षायणीबाई, असें बोलून त्याची आठवण नका मला करून देऊं. पहा—

साकी.

मम हृदयांतरिं शोकाग्नी जो पेटे सुत निधनाचा ॥
कसा तरी तो गिळुनी आहे टाकियला मी सांचा ॥
आतां वच तव तें ॥ वायूसम त्या धूपवितें ॥ १ ॥

बरें, पण, हा माधव या ठिकाणीं अवचित आला हा चमत्कार नाहीं कां ? माझा मित्र अगोदर सूचना पाठविल्याशिवाय कधीं येत नाहीं ? मग काय असेल तें असो.

(माधव मालती, जनार्दन व मधुसूदन येतात.)

माधव—महाराजांचा विजय असो.

दिलीप—ये वत्सा, मला कडकडून भेट. अहाहा ! तूं केवळ माझ्या मित्राची प्रतिकृतिच मला दिसतोस. स्वरूप आणि स्वभावही तसाच. ही तुझी पत्नी ! वाहवा ! जोडा

विधिनें मोठा नामी योजला. माझी दोन्ही मुलें असतीं तर ती थेट तुह्मांसारखीच असती ! पण त्याचें काय आतां. बरें वत्सानो, बसा खालीं.

माधव—मालती—(तसें करितात.)

दिलीप—वत्सा, माधवा, तुला काय सांगू ?—

पद. चाल. मजवरि हे आलें ही.

तुझिया ताताची ॥ आणखि माझी ॥ मैत्री शिशुपणिची ॥ असतां त्याचें अप्रिय चिंतुनि मी अंतरुनि घेतलि साची ॥ १ ॥ त्या योगें जाया ॥ मज एकाकी ॥ गेली सोडुनिया ॥ त्यावरि मुकलों प्राणाहुनिही प्रिय मम ऐशा दोन्ही तनया ॥१॥ भद्रसेन नृपती ॥ कधिं यावरती ॥ प्रेम पूर्ण चित्तीं ॥ धरूनी देइल भेट पुनः मज उत्कंठा अशि लागलि बहु ती ॥ १ ॥

तो योग कधीं येईल तो येवो; सांप्रत तुह्मांला पाहून मला फार आनंद झाला आहे. बरे; वत्सा, पत्नीसह तुझें इकडे अवचित येणें कसें झालें ?

माधव—(मनांत) आतां कसें करावें ? प्रधान वसुभूतींनीं सांगितल्याप्रमाणेंच सांगावें ह्मणजे झालें. (उघड) महा-

राज, ताताविषयीं आपलें मन निर्मळ झाल्यावर त्यानां भेटण्याविषयीं आपलीं अनेक पत्रे आलीं; पण आलीकडे म्हातारपणामुळें त्यांना वाटेचे श्रम सहन होतील कां न होतील याची खात्री नसल्यामुळें प्रधान वसूभूतीच्या विचारानें पत्नीसह मला कांहीं दिवस आपल्या समागमाविषयीं जाण्यास आज्ञा केल्यावरून मी विशेष परिवार वगैरे न घेतां थोड्याच लोकांसह येथें आलों.

दिलीप—फार चांगलें केलेंस. या तुझ्या येण्याबद्दल मी तुझ्या पुण्यशील ताताचा व प्रधान वसुभूतीचा अत्यंत आभारी आहें. वत्सानों, तुम्हीं आतां येथें खुशाल आनंदानें रहा माझें सर्व राज्य तुमचेंच आहे.

(इतक्यांत द्वारपाळ प्र. क.)

द्वारपाळ—महाराजांचा विजय असो; महाराज, बाहेर भद्रसेन महाराजांकडून एक दूत आला आहे व तो आपल्या दर्शनाची इच्छा करीत आहे.

दिलीप—काय ? भद्रसेन महाराजांकडून दूत आला आहे ? जा जा त्याला लौकर घेऊन ये.

(द्वारपाळ जातो व दूतासह प्र. क.)

दूत—राजाधिराजांचा विजय असो. भद्रसेन महाराजांनीं

आपणांस असें सांगण्यास मला आज्ञा केली आहे कीं, मी आपल्या भेटीस अवचित आलों आहे याचें कारण पुत्र माधव हा आपली सर्व योग्यता विसरून पित्याची आज्ञा उल्लंघून एका गोपकन्येला घेऊन पळून आपणाकडे आला आहे. तर त्यास धरून ठेवावें.

मालती—(दुःखानें) हाय हाय! आतां आमची काय दशा होणार ?

माधव—शिवशिव ;

साकी.

दुर्दैवाची कमाल झाली देश त्यागचि केला॥
तरि ते धांवत पाठीमागें येउनि गांठी मजला ॥
धीर सर्व सुटुनी ॥ काय करूं ये नच कळुनीं ॥ १॥

दिलीप—(दूतास) कायरे, भद्रसेन महाराज कोठें आहेत ?

दूत—ते आपल्या पुत्राला धरण्याकरितां त्यांच्या पाठोपाठ मथुरेंत आले. वाटेंत त्या मुलीचा बाप व भाऊ भेटला त्यासही त्यांनीं धरून आणलें आहे.

मालती—हायरे कर्मा ! माझ्या ताताच्या आणखीं भा-

वाच्या कां पाठीस लागलास ! आतां मजसाठीं त्यानां काय काय दुःख भोगावें लागेल कोणास ठाऊक !—

पद. चाल. दारिद्र्यें जनकाची ही.

वेडी मी या नादां व्यर्थ लागलें ॥ दुर्मिळ सुख वांछुनियां दुःख पावलें ॥ धृ ॥ हें पूर्वी पासोनी॥ मन्मन कथि मज लागुनी ॥ घडुनी नच येइल तें सत्य जाहलें ॥ १ ॥

माधव—अरे, अधमा वसुभूते—

पद चाल. लक्ष्मीसम चंचलही.

प्रामाणिक असतां मी मानिलें तुला ॥ योग्य काय तुज वाटे फसविणें मला ॥धृ ॥ सत्यवचन मानुनि यां ॥ मथुरेमधिं आलों या ॥ पण फसविशि कळु-नीयां ॥ मज येई या समया ॥ त्वत्कीर्तिस हा मोठा डाग लागला ॥ १ ॥

दूत—महाराज, ते त्यांच्या बरोबर येथेंच आले आहेत.

दीलीप—कोण प्रधान वसुभूती काय ?

दूत—होय.

दिलिप-कांहो तुमचें लग्न झालें आहे कीं नाहीं ?

माधव—नाहीं. मीच अपराधी आहें पण मजकरितां त्या बिचाऱ्यांचा छळ होत आहे.

दिलिप—आणखीं ही राजकन्या नव्हे ना?

माधव—राजवधू कांहीं राजकन्येपेक्षां कमी नाहीं. आणि इचें माझें लग्न झालें ह्मणजे ही राजवधूच आहे.

दाक्षायणी—(मनांत) पण ही कितीतरी सुंदर आहे? हिला राजकन्या कोण म्हणणार नाहीं? मला देखील ही गोपाची मुलगी असेल असें वाटत नाहीं.

दिलीप—माधवा, तूं म्हणतोस तसें होणें अशक्य आहें. पहा—

साकी.

अनेक सद्गुणसुरूपमंडित आहे ही गोपसुता॥तरि जाणे ती योग्य न होण्या कधिंही नृपसुतदयिता ॥ आणुनि मनियाते ॥ पाळी निज ताताज्ञेते ॥ १ ॥

मालती—झाला माझा सर्व मनोरथ निष्फळ झाला ! !

माधव—प्रिये, धीरधर. इतक्यांतच निराश होऊं नकोस पहा—

पद. झंपा.

तात आणखि विधी आज दोघे जरी होति प्रतिकुलचि या माधवाला ॥ तरि न तुजशीं कधीं करिल वचभंग हा ठेवि दृढ मजवरी भरंवशाला ॥ काय होणेंचि तें दुःख हो याहुनी ॥ उभयतां सोसु बहु धैर्य धरुनी ॥ १ ॥

दिलीप—बाळा, हें काय अविचाराचें बोलणें बोलतोस?

माधव—यांत कशाचा अविचार? महाराज, आपण माझ्या वयाचे असाल ती वेळ मनांत आणा आणि प्रीतीचा भंग करणें किती कठीण आहे हें जाणून माझ्या संबंधानें दोन शब्द तातांनां आपणांस बोलावेसें वाटलें तर बोला. माझी खात्री आहे कीं ते आपल्या विरुद्ध जाणार नाहींत.

दिलीप— (मनांत) काय असेल तें असो. जों जों मी या मुलीकडे पाहतों तों तों माझें अधिकच प्रेम जडतें. वाटतें ही आपली कन्या असावी. पण ती कशी मिळणार? अथवा, न मिळावयाला काय झालें? ही इच्या पित्यापासून मागून घेऊन या दोघांचें लग्न करावें ह्मणजे झालें. (उघड) तुझें ह्मणणें खरें आहे. व त्याप्रमाणें मी त्यांच्या पाशीं बोलेन.

दाक्षायणी—महाराज, या कन्येकडे फारसे टक लावून पाहतां ?

दिलीप—दाक्षायणीबाई, तुह्माला काय सांगू ? ही कन्या थेट माझ्या प्रियेसारखी मला दिसते तुह्माला तसें नाहीं कां वाटत ?

दाक्षायणी—होय, मग ही आपण टाकलेली आपली कन्या तर नसेलना ?

दिलीप—तसें कोठून आमचें दैव घडवून आणणार ? पण कांहीं असो. इला मी भद्रसेन महाराजांपासून मागून घेऊन मी आपल्या जवळ ठेवीन. वत्सा, माधवा, तुझें इजवर प्रेम बसलें तें योग्यच आहे आणि मीही तुझ्या सौख्याकरितां ती तुझी स्त्री होण्याविषयीं खटपट करीन.

मालती—(मनांत) देवा; पुनः पुनः आशि अशा लावून मला निराश करू नकोस. आणि तसेच करावयाचे असले तरी–

अंजनीगीत.

जननी जनका नच मजकारितां ॥ लोटी दुःखामधिं भगवंता ॥ इतुकी तुजपाशीं ही दुहिता ॥ विनंती कीं करिते ॥ १ ॥

दिलीप---बरें चला, भद्रसेन महाराजानां भेटावयाला जाऊं.

(सर्व जातात)

प्रवेश दुसरा. मथुरेतील एक रम्योद्यान.

---: ※ :---

(परिजनासह आसनस्थ भद्रसेन राजा व वसुभूति प्र० क०)

भद्रसेन---प्रधानजी, आतां कसें करावें---

पद.-- आकर्षुनि धनुही-

कुलहीन अशा स्त्रीच्या पाशीं प्रियसुत माझा सापडुनी ॥ बहकुनि गेला उपदेशानें नच येई तन्मन वळुनि ॥ राज्य नको अधिकार नको ही हावी त्याला ती तरुणी ॥ आज्ञा उल्लंघुनि मज देई दुःख कसें हा वृद्धपणीं ॥ १ ॥

आणखीं पहा, आतां मी याला असाच मोकळा सोडून देऊन त्या विषयीं कांहीं काळजी केली नाहीं तर---

साकी.

सुत नच्च दुसरा ह्मणुनी कोणी वारस नच्च राज्याला ॥ नेम नसे या आयुष्याचा आतां मम राहियला ॥ मजमागें त्याची ॥ वाट काय होइल साची ॥ १ ॥

आतां, दिलीप राजानें त्याला धरून ठेवलें असेल तर त्याला बंदिंत ठेऊन व तिची अक्षय ताडातोड करून तो शुद्धीवर येईल असें आपणास वाटतें कां ?

वसुभूती—महाराजांनीं, इतक्यांतच असा कडक उपाय योजू नये. कारण तरूण पुरुषांचें मन अविचारी असल्यामुळें त्यांच्यावर अशा उपायापासून चांगला परिणाम न होतां कांहीं भलताच परिणाम होतो; यासाठीं आणखीं एकवार आपण दिलीप महाराजांकडून युवराजांना चांगला उपदेश करून पहावा. त्यांनीं ऐकला तर बरेंच नांहीं तर हा बेत ठरलाच आहे.

दूत—(प्रवेश करून) राजाधिराजांचा विजय असो. आपल्या भेटी करितां सर्व परिजनासह युवराजाना बरोबर घेऊन दिलीप महाराज आले आहेत.

भद्रसेन--असें काय.

(दोघे उठून उभे राहतात. परिजनासह राजा दिलीप, माधव मालती दाक्षायणी वगैरे प्रवेश करितात. दिलीप व भद्रसेन भेटतात, माधव मालती दूर उभी राहतात.)

दिलीप—भाऊ--

पद. चाल. गंगानदितीही.

अपराधी मी आहे मोठा व्यर्थ दोष अपुणाला ॥ लावुनि तुमचा वध करण्याचा होता निश्चय केला ॥ तरि आतां तें विसरुनि तुह्मी क्षमा पूर्ण मज करुनी ॥ पूर्वीपरि निर्मल ठेवा कीं मज विषयीं प्रेम मनीं ॥ १ ॥

भद्रसेन—दादा, आपलें मन शुद्ध झालें हे परमेश्वराचें मजवर मोठें उपकार आहेत. आतां झाल्या गोष्टी बद्दल आपण मुळींच खेद करूं नयें. माझ्या मनांतलि आपणा विषयींचें प्रेम कमी कधीं झालें नाहीं व पुढें होणें नाहीं.

दिलीप—(वसुभूतीस) प्रधानजी, आपण नुसते मुत्सद्दी आहात असें नाहीं तर साधु पुरुष आहांत, द्रव्याच्या किंवा अधिकाराच्या लोभानें मी सांगितलेलें पाप न करितां आपण सत्पक्षाचा स्वीकार करून देशत्याग केला याबद्दल आपली थोरवी किती वर्णावी. खरेंच आपणासारख्या पुण्यशील पुरु-

षांची म्यां दुर्दैवानें अवहेलना केली; आतां मला क्षमा करा असें आपणास मी कोणत्या तोंडानें ह्मणूं ?

वसुभूति—राजाधिराज, क्षमा मागण्याचें काय कारण? मी आपला एक सेवक आहे. त्या वेळेस आपणांस मिथ्या संशयानें—अथवा भावितव्यतेनें कां ह्मणानां,—पुरें घेरलेले होते व आपणांस दोन शद्ब बोलण्याचा उपाय नव्हतां, ह्मणून मला असें करणें भाग पडले. नाहीं तर स्वामीचें चरण सोडून या सेवकाची दूर जाण्याची मुळींच इच्छा नव्हती. आतां महाराजांनीं हा माझा एक इमानी सेवक आहे असें मानले ह्मणजे त्यासारखे दुसरें मला भूषण नाहीं.

दिलीप—प्रधानजी, आपणासारखे थोर पुरुष या जगांत फारच थोडे असतील.

वसुभूति--आमच्या राणीसाहेब जर जिवंतपणीच अशा निर्दोषी ठरल्या तर किति चांगलें झालें असतें.

भद्रसेन--चांगलें झालें असते पण दुर्दैवाच्या मनांत तसें नव्हतें त्याला काय उपाय? बरें, दादा आतां या माधवास ताळ्यावर येण्याकारितां काय करूं? (माधवास) अरे, असा मज समोर ये पाहू.

माधव--(तसें करितो)

भद्रसेन—अरे, तुझा विचार तरी काय आहे ? पहा—

पद. चाल परम सुवासिकही-

सांप्रत तव वय शिरि घेण्याचें कारभार तो राज्याचा असुनी वायां दवडिसि वाटे खेद कां न मुळिं तुज याचा ॥ थोरपणा तो अपुला विसरुनि घेउनि संगें गोपसुता ॥ फिरसी देशीं वृद्धपणी कां दुःखवि मूढा ममचित्ता ॥ १ ॥

बोल तुला या गोपकन्येचा त्याग करणें रास्त वाटतें कां आम्हां सर्वांना सोडून असें भटकणें गोड वाटतें ?

माधव—आपणास जर अधिक बोललों तर आपला उपमर्द केला असें होईल तथापि मला असें सांगणें भाग आहें कीं—

पद. चाल. हिमधवलांगी ही.

वचन असें मी दिधलें कीं या गोपसुतेला तिस वरण्याचें ॥ तें मजकडुनी प्राणांतींही मिथ्या कधिंनच्च होइल साचें ॥ राज्य मिळो वा न मिळो मजला ॥ परि अंतर नच देइन तिजला ॥ १ ॥

भद्रसेन—नीचा, काय बोलतोस हें ?—

साकी.

स्वतंत्र समजसि कां अपुणां तूं हावें तें करण्यासी ॥ बंदीमधिं तुज ठेवुनियां मी बघेन कायाचि करसी ॥ ना तरि तव आतां ॥ करितों अधमा देहांता ॥ १ ॥

चांडाला, पित्याचें न ऐकणारा तुजसारखा पुत्र असण्यापेक्षां नसलेला बरा (असें ह्मणून त्याला मारण्यास तलवार उपसतो)

दिलीप—(त्याचा हातधरून) भाऊ जरा शांत व्हा; माझ्या मनांत एक विचार झाला आहे तो आपणांस रुचला तर माधवाचेही हेतू पूर्ण होतील व आपल्याही मनाप्रमाणें होईल.

चंद्रसेन--दादा, काय ह्मणतां आपण ?

दिलीप—(मालतीस) मुली. अशी पुढें ये. (ती तसें करिते) दादा पहा—

पद. चाल. वसंतीं बघुनि ही.

जरि ही गोपसुता आहे ॥ नृपकन्येहुनि थोर गुणतसें रूप इचें पाहें ॥ ह्मणुनी बहु मम इजवरती ॥ कन्येसम कीं प्रेमचि जडलें आहे या चित्तीं ॥ आ-

तां त्यापरि मी करुनी ॥ माधवास ही अर्पण करितों निजकन्या ह्मणुनी ॥ १ ॥

मग तर आपली कांहीं हरकत नाहीं नां?

दाक्षायणी--हें असें अवश्य करावें. मलादेखील यांचा जोडा कसा नामीं दिसतो आहे. आतां तिला जो गवळ्यांच्या कुलांत जन्म घेतल्याचा डाग आहे तो असें झालें ह्मणजे नाहींसा होईलच.

भद्रसेन--दादा, आपणच असें म्हणालां मग त्याला मी कसें नाकबूल करूं?

वसुभूती—तसें करितां येईल; पण अगोदर ही खरोखर गवळ्याची मुलगी आहे कीं नांहीं याचेंचि मला शंका आहे; कारण इच्या बापाला जेव्हां आम्ही वाटेंत धरलें तेव्हां तो या मुलीसंबंधानें मला कांहीं विलक्षण प्रकार महाराजांना सांगावयाचा आहे असें ह्मणाला पण तेंव्हां आम्ही त्वरेनें इकडे येत असल्यामुळें त्याच्या बोलण्याकडे लक्ष दिलें नाहीं. तर त्याला आतां महाराजांनीं आपल्यासमोर बोलाऊन सर्व प्रकार समजून घ्यावा.

भद्रसेन--ठीक आहे. (सेवकास) जा आणि त्या गवळ्यास इकडे घेऊन ये.

मालती—(मनांत) माझा बाप मजसंबंधानें काय बरें विलक्षण प्रकार यानां सांगणार आहे ? अथवा—

पद. चाल. नवनितसमही.

दैवाची चित्र गती काय ती असे ॥ अंत तिचा कधिं कोणा मुळि न कळतसें॥सौख्यतंतु लागलाचि मम तुटावया ॥ अंकुर कीं नृपवचनें ये पुनः तया ॥ राहियले काय पुढें तरि घडावया ॥ सुख कीं मज दुःख अधिक यावरी तसें ॥ १ ॥

(सेवक गोपाळ व गोव्या यास घेऊन येतो व ते दोघे मुजरा करतात)

वसुभूति—अरे मघा तूं महाराजांस या मुलीसंबंधानें कांहीं सांगणें आहे ह्मणालांस पण त्या वेळेस आह्मी तें ऐकलें नाहीं. तर आतां सांग पाहूं.

गोपाळ—महाराजांच्या या पायापाशीं मी कधीं खोटें सांगणार नाहीं ही मुलगी माझी स्वताहाची नव्हे.

भद्रसेन—तुझी नव्हे तर मग कोणाची ?

गोपाळ—ऐकावें. आज चौदा वर्षें झाली. मी रानांत गाई ना पाहायाला गेलों असतां एका झाडाखालीं शालजोडींत

गुंडाळलेले एक तान्हें मूल पाहिलें. त्याच्यापाशीं एक पेटी होती व तींत मोहरा आणि रत्नें भरलीं असून आंत एक कागद होता व त्यावर कांहीं लिहिलें होतें पण तें मला किंवा माझ्या मुलाला वांचतां येत नसल्यामुळें मला कळलें नाहीं व तें आज पर्यंत कोणाला दाखवलें नाहीं. ती ही पेटी आणि हा कागद आपण पहावा. (पेटी व कागद पुढें ठेवतो.) तें मूल मी घरीं आणून वाढवले तीच ही आमची मालती.

दाक्षायणी--ही पेटी तर माझ्या घरांतलीच आहे व हा कागदही मीच लिहिलेला आहे. महाराजांनीं आपले तान्हें मूल अरण्यांत नेऊन टाकण्याविषयीं जेव्हां जयसिंहाजवळ दिले आणि तो जाऊं लागला त्यावेळीं ही रत्नांनीं व पुतळ्यानीं भरलेली पेटी व हा कागद त्याजवळ देऊन सांगितलें होते कीं जेथें तूं या मुलीला ठेवशील तेथें ही पेटी ठेव ह्मणजे तिच्या दैवानें ती कोणाच्या दृष्टीस पडल्यास तो द्रव्याच्या लोभानें तरी तिचें रक्षण करील. आणि या कागदांतही जो या मुलीचें पालन करील त्यास ही पेटी बक्षीस आहे असें लिहिलें होतें; तें हें पहा. बरें पण त्या जयसिंहाची वाट काय झाली म्हणावी?

गोट्या—त्याला वाघानें खाल्ला हें मी प्रत्यक्ष पाहून

बाबांनां सांगितलें. तो अमुकच असेल असें मला माहीत नव्हतें पण त्याच्या त्या सरदाराच्या ऐटी वरून आता तोच असेल असें मला वाटतें.

गोपाल—मी परत आलो तो वाघानें त्याला सगळा खाल्ला होता, मग त्याला जाळावयाकरितां नेले असतां त्याच्या बोटांत अंगठी सांपडली ती ही पहा! (अंगठी देतो)

दिलीप—अरे हिच्यावर तर जयसिंहाचें नांव आहे.

दाक्षायणी—झालें आतां संशय कसला राहिला आहे? त्या जयसिंहाच्या पापाचें फळ त्याला मिळालें आणि ही आमच्या महाराजांचीच टाकलेली कन्या! गुरुजीनीं ती सांपडेल म्हणून आश्वासन दिलें होतें त्याचा प्रत्यय आला.

दिलीप—अहाहा! आला खरा!

पद. चाल. या विरहा कां भीसी

ये ये ये मजपाशीं ॥ बाळे ॥ प्रेमालींगन देउनि
तोषित करि या तव जनकासी ॥ धृ ॥ धन्य आज
हा दिवस उगवला पार न मम हर्षासी ॥ १ ॥
पूर्व पुण्य मम फळलें केलें विधिनें पूर्ण कृपेसी । २

(असें ह्मणून तिला जवळ घेतो)

मालती—बाबा—

पद. चाल सदर.

काय असें तुह्मि केले ॥ ताता ॥ अभागिनीला मज रानांमधी नेउनिया सोडियले ॥ध्रु॥ या चरणांच्या सत्संगातिला मजला कां मुकविले ॥ १ ॥ पुनः असें तरी नको करूं कधिं दैवे मज वांचविलें ॥ २ ॥

दिलीप—उगी बाळे, रडूं नकोस माझ्यां जिवांत जीव आहे तोपर्यंत आतां तुला कधीं मी अंतर देणार नाहीं.

भद्रसेन—आज दादावर परमेश्वरांनीं केवढी कृपा केली! आणि योगायोग कसा विलक्षण पहा दादा, हिला आपली कन्या मानतो ह्मणायला आणि ती खरोखरी व्हावयाला एकच गाठपडलीं.

वसुभूती—पण हा योगायोग घडवून आणण्याचे सर्व श्रेय या ह्यातान्या गवळीबुवाचें आहे त्यानें राजकन्येचे रक्षण केलें ह्मणूनच आज हा सुदिन पाहिला.

दिलीप—खरेंच गवळीबुवा, हे सर्व तुमचे माझ्यावर उपकार आहेत हे आतां मी कसें फेडूं?

गोपाळ—मीं आपला दास आहें. मीं गरीब असल्यामुळें

महाराजांच्या कन्येला माझ्या घरीं भलभलतीं कामें करावीं लागलीं याबद्दल महाराजांनीं क्षमा करावी,

दिलीप—वत्सा, माधवा, ये असा मजजवळ, अशा आनंदाच्या वेळीं मला ही इच्छा पूर्ण करून घेऊंदे—

साकी.

त्वत्हस्तामाधिं मत्कन्येचा कर हा मी घालीतो ॥
परस्परांचा ऋणानुबंधचि दैवें घडवीला तो ॥
ह्मणुनी इजवरती ॥ जडली पूर्ण तुझी प्रीती ॥ १ ॥

माधव—अहाहा—

दिंडी.

हेतु अंतरि जो धृढचि धरीयेला ॥ सुदैवाने तो आज सफल केला ॥ कोप तातानां राहिला न आतां ॥ सर्व माझी नाहिशी होय चिंता ॥ १ ॥

गोट्या—ताई, तूं आज राजपुत्राची बायको झालीस तर मग मी नाहीं कां राजपुत्राचा मेहुणा झालों.

माधव–अरे, यांत काय संशय? तूं खरोखर माझा मेहुणा आहेस.

भद्रसेन--गुवळीबुवा, तुमचें नशीब थोर! आज तुह्मी आमचे व्याही झाला.

गोपाल--छेछे, मला गरीबाला हा मान कशाला पाहिजे मी आपला दास आहे.

दाक्षायणी--मुली, अशी मजजवळ ये. तुझ्या आईवर माझें अत्यंत प्रेम होते तसेंच आतां तुजवर आहें. बाळे, काय सांगूं आज तुझी आई असती तर तिला किती आनंद झाला असतां. पण देवाला तें आवडले नाहीं.

मालती--बाई, कोठे आहे माझी आई!

दिलीप--मुली, त्याना काय विचारतेस माझें क्रूर कर्म मीच तुला सांगतो--

अंजनीगीत.

पतिव्रता ती तुझि गे माता ॥ तत्छल बहु मी केला असतां ॥ त्याःदुखामधिं पावलि अंता ॥ प्रिय पुत्रासह कीं ॥ १ ॥

मालती--हाय हाय!

अंजनीगीत.

लालन पालन माझे टाकुनि ॥ परलोकीं कशि गेलिस जननी ॥ तुजवाचुनि मी येथें राहुनि ॥ काय करूं तरि गे ॥ १ ॥

(असें ह्मणून भूईवर अगटाकते)

दाक्षायणी—मुली सावध हो सावध हो.

मालती—(उठून) बाई, एकवार माझी आई मला दाखवा.

दाक्षायणी—ती गेली ती परत कां येणार आहे म्हणून दाखवूं. तथापि ती कशी होती हें बघावयाचें असल्यास तिची एका कुशल कारागिरानें बनविलेली पुतळी माझ्या घरीं आहे. ती इतकी हुबेहुब आहे कीं तींत त्याला प्राण घालतां आला असता तर राणी सुदक्षिणाच जिवंत झाली कीं काय असें लोकांनीं म्हटलें असते.

दिलीप—दाक्षायणीबाई, खरेंच कां आपल्या येथें माझ्या प्रियेची पुतळी आहे.

दाक्षायणी—होय. तिजवर माझी फार प्रीती होती; म्हणून मी मुद्दाम करवून ठेवली आहे.

मालती—बाई, तर मग ती मला दाखवा.

दिलीप—आणखी आम्हां सर्वांनाही दाखवा.

दाक्षाणी—तुमची सर्वांची इच्छा असेल तर चला मझ्यघरी (मनांत) आजच्या दिवसाच्या सर्व आनंदांत आणखी याही आनंदाची भर पडूं्या.

सर्व--चला.

(सर्व जातात.)

प्रवेश ३ रा. दाक्षायणीचा वाडा.

दाक्षायणी--महाराज, मज गरिबाच्या घरी आपण आपले व्याही जामात, कन्या यांसह येऊन पायधूळ झाडलीत हे माझें मी मोठें भाग्य समजतें.

दिलीप--दाक्षायणी बाई, असें कां ह्मणतां? हा उलट आह्मी तुह्मांला त्रास देत आहों. बरें, पण आह्मी तुमच्या वाड्यांत आलो चहूंकडे फिरलो; पुष्कळ तजविरी बघितल्या; पण तिची सर कशाला दिसली नाहीं; तर लौकर तीची पुतळी दाखवा. ती बघण्याविषयीं आमची मालती फार उत्कंठित झाली आहे.

दाक्षायणी---आमची राणी जिवंत असतांना तिची कोणाला सर येत होती कां मग मेल्यावर तिच्या पुतळीची तरी सर दुसऱ्या तजबिरांस कशी येईल. ती पुतळी अगदीं हुबेहुब आहे म्हणूनच मी एकीकडे ठेविली आहे. आतां नीट लक्ष्य लावा; आणि म्हणते तें खरें कां खोटें पहा.

(एका खोलीच्या दारावर टांगलेला पडदा एकीकडे सारते व आंत चौरंगावर उभी अशी एक पुतळी दिसते.)

महाराज, सजीव प्राणी गाढ निद्रेत असतां मेल्यासारखा

दिसतो; याच्या उलट कारागिराचे कसब असते कीं तो निर्जीव वस्तू सजिवासारखी भासवतो. तर त्याप्रमाणें ही आहे का नाहीं हें मला सांगा. बोला. ही थेट आमच्या राणीसारखी उतरली अहे कीं नाहीं हें आपण सांगितलें पाहिजे.

दिलीप—अहाहा ! दाक्षायणीबाई तुम्हाला काय सांगूं ?—

पद. चाल. अर्जुन तर सन्यासी ही.

हुबेहुब ही प्राणसखीची पुतळी कीं आहे ॥ मज वाटे उभि चौरंगावरि मत्प्रियाच राहे ॥ उदासी-नता तन्मुखिची तशि इजवरि दिसताहे ॥ काय उठविली मत्स्त्री सिंचुनि अमृतासी पाहें ॥

आणखी ही पुतळीं अगदी तिचेंच अनुकरण करीत आहे पहा, त्या वेळीं—

चाल॥मी आवमानिलि तरि कोपित नच जाहली॥ नच कटु वच वदली शांत सदा राहिली ॥ चास ॥ पतिमन सतिने कसें करावे प्रसन्न पथ याचा ॥ दावाया तिस जनु निर्मियला विधिनें मत्सखिचा ॥ १ ॥

वसुभूति—महाराज, खचित ही पुतळी इतकी हुबेहुब आहे कीं मला ही पुतळी आहे असें वाटत नाहीं.

दिलीप---(नीट पाहून) पण, कांहो दाक्षायणी बाई या पुतळीवर मला जरेची छाया दिसते तशी त्यावेळी माझ्या प्राणसखीवर नव्हती.

भद्रसेन---हो. नव्हती खरीच.

दाक्षायणी----यांतच चतुर कारागिराचे कसब आहे. आज आमची राणी जिवंत असती तर कशी दिसली असती हे मनांत आणून त्यानें ही पुतळी बनविली आहे.

दिलीप---होय. खचित आज माझी प्रिया अशीच असती. बाई तह्माला काय सांगू ?

पद. चाल. पूर्वी अधरोष्ठावरिही.

प्रतिकृति बघुनी ही प्रिय सखिची विदीर्ण शतधा मन होते ॥ केविलवाणी स्थिति नयनां तानि मम दुःखाश्रू ढाळविते ॥ पाषाणमयी असतां ही मम निंदा वाटतसे करिते ॥ 'कठोर मजहुनि तूं द्रव मजही येई नच तव चित्ताते' ॥ १॥

खचित मी इचा इतका अपराध केला आहे तर इच्या समोर येण्याला मला फार लाज वाटली पाहिजे. अथवा ! ही पाषाणमय मूर्ती कसली ? ही प्रत्यक्ष माझी प्रियाच आहे. पहा—

दिंडी.

शरिररहितां हृदयांतरी वसे जी ॥ प्रिया मम ते सोडुनी स्थान आजी ॥ कशी नव्यनांच्या मज समोर दिसते ॥ वदे नचतरि तरुछलचि भासवीतें ॥ १ ॥

मालती----आई, मी तुला नमस्कार करिते----

पद. चाल. जाई परतोनीं.

आहे तवतनया ॥ जननी ॥ किति दुर्दैवी सुख नच काहीं दिधले तुजला मी जन्मुनिया ॥ जन्मतांचि मी गेलिस तूंगे ॥ परलोकीं मज टाकुनि मागे ॥ थोरपणी ह्मणुनी अंतरलें तव वदनाचें दर्शन घ्याया ॥ १ ॥

असो. तूंच माझी आई आहेस ही मी तुझ्या जवळ आले मला मांडीवर घेऊन आशिर्वाद दे. (जवळ जाऊं लागते)

दाक्षायणी----छे छे, मुली जवळ जाऊंनकोस. पुतळीला नुकताच रंग दिला आहे तो पुसेल.

दिलीप----अखेर ही पुतळीच आहेंना ? हाय हाय (मूर्च्छित पडता)

वसुभूति महाराज, सावध व्हा ! एक तप झालें तरी अजून किती शोक करावयाचा !

भद्रसेन--दादा, खरोखर या शोकाला मी कारण आहे तर याचा थोडासा वांटा मला देऊन समाधान माना.

दाक्षायणी--महाराज, ही पुतळी पाहून आपणाला असें होईल हे मला पूर्वीच कळते तर ही मी आपणांस मुळींच दाखविली नसती. असो. चला आतां. (पडदाटाकूं लागते)

दिलीप--दाक्षायणी बाई, वर पडदा टाकूंनका.

दाक्षायणी---नाहीं. आतां आपण पाहूंनका; कारण प्रथम ती हुबेहुब सुदक्षिणा उभी आहे असें ह्मणाला आतां ह्मणाल ती हालतेशीं.

दिलीप---दाक्षायणी बाई, मजवर कृपाकरा, आणि पडदा टाकुं नका. ही पुतळी कोणत्या कारागिरानें घडली बरें ? पण पहा ही पुतळी हालल्या सारखी वाटतें. नाहीं कां भाऊ ?

भद्रसेन---कारागिराचे कौशल्य अजब खरें. मला तर या आतां बोलतीलशा वाटतात.

दिलीप--आणखी हे पहा ! ही पापणी लवली ! आणि बुब्बुळ देखिल फिरवलें ! !

दाक्षायणी--महाराज, आतां मला टाकूंनद्या पडदा. कार-

ण राणीची पुतळी बघुन आपणाला वेड लागले आतां कांहीं वेळानें असें देखील ह्मणाल कीं हीं जिवंत आहे.

दिलीप---नकानका. दाक्षायणी बाई पडदा टाकूनका----

साकी.

जोंवरि आहे या देहामधि आत्मा तोंवरि राहो ॥
वेड असें मम शुद्धीवरती कधिहीं मी नच येवो॥
यामधि सुख जें तें ॥ कळतां खरें न होइल तें ॥१।

दाक्षायणी---- माहाराज, अशी जर आपली इच्छा आहे तर याहीपेक्षां अधिक मोहांत मला आपणांस टाकतां येईल.

दिलीप---- दाक्षायणीबाई; तर मग तसें करांच. कारण आतां या मोहांत मला जो आनंद होईल तो दुसऱ्या कशांत ही होणें नाहीं. पण हें पहा-- इनें श्वास टाकलासा वाटतो. कारागीर कुशल कितीही असला तरी त्याला आपल्या कृतींत प्राणवायु कधीं घालतां येणार नाहीं. यावरून मी खात्रीनें सांगतों कीं ही माझी प्रिया जियंत आहे. तुम्हीं मला वेडा म्हणा कीं कांहीं म्हणा; मी आतां इला हात लाऊन पाहणार.

दाक्षायणी----महाराज, एवढें मात्र करूं नका. पुतळीला नुकताच रंग दिला आहे तो हात लावल्याने खराब होईल.

दिलीप----तर मग मी रात्रंदिवस हिला पहात असाच येथें राहीन.

मालती----आणखी मीही पण राहीन.

दाक्षायणी----महाराज, आतां आपण येथून लौकर बाहेर-ज नाहींतर मी आतां आपणांस एक मोठाच चमत्कार दाखवते तो शांतपणानें पहा. आपली इच्छा असेल तर ही पुतळी मी चालवून दाखवितें; ती चौरंगावरून खालीं येऊन आपल्या कन्येला पोटाशीं धरील.

दिलीप—काय तुह्मीं दाखवाल ते मीं आनंदानें पाहतो कारण—

दिंडी.

इच्या चेष्टा नयनांस तोषवीती॥ वाणि मधुरा श्रवणास प्रिय असे ती॥ जरी तुह्मां ये इला च-लन देता॥खचित येइल तरी मगचि बोलवीता॥

दाक्षायिणी----तर मग चमत्कार पहायाला तयार. ज्हा ज्या आतां मी कांहीं मंत्र विद्या अथवा भूतचेष्टा करीन असे वाटत असेल त्यांनीं खुशाल बाहेर जावें.

दिलीप----तसें कोणाला वाटत नाहीं दाखवा लौकर.

दाक्षायणी----अशी गडबड करूं नका. सावकास पहा.

आतां मंगल वाद्याचा गजर होऊन आमची राणी जागृत होईल. (गजर होतो) हे महा पतिव्रते; आज सर्वांना चमत्कार दाखविण्याचा समय आला आहे तर आतां पाषाणमय राहूं नकोस. चौरंगावरून खालीं ये. (राणी खालीं येते) (सर्व आश्चर्य चकित होतात) महाराज! आतां आश्चर्य वाढूं देऊ नका. ही भूतचेष्टा नाहीं तर सत्य सांगते ही आपली पत्नी सुदक्षिणाच आहे. तिचा पुन्हां स्वीकार करा. तसें न कराल तर तिला मरणप्राय दुःख होईल. महाराज, तरूण पणांत आपण तिची विनवण केली असेल पण आतां ती आपली करीत आहे.

दिलीप---(राणीस स्पर्श करून) खचित ही माझी प्रिया! भूतचेष्टा नाहीं. कारण इचे अंग थंड लागत नाहीं.

भद्रसेन---खरोखरच या जिवंत आहेत!

वसूभूति---मग या बोलत कां नाहींत? त्यांच्या तोंडचे दोन शब्द ऐकण्यास आह्मी फार उतावीळ झालों आहों.

दाक्षायणी---जशी चालत आली तशीच बोलेल ही बाई, ही अरण्यांत टाकलेली तुझी कन्या गुरुजांच्या वचनाप्रमाणें सांपडली बरं. (मालतीस) मुली तूं आपल्या आईला नमस्कार कर. ह्मणजे ती तुला आशिर्वाद देईल.

मालती---- (तसें करिते)

सुदक्षिणा----मुली जन्मसावित्री हो; व सर्व देवता तुझें निरंतर कल्याण करोत. बाळे---

पद. चाल जाई परतोनी ही.

भेट मला बाई ॥ तनये ॥ आनंदाश्रू आले नयनीं अवचित बघुनी तूज या ठायीं॥ धृ॥ कोठें होतिस आजवरी तूं कुणि लालन तव केलें॥ आलिस येथें कशि सर्व मला वर्तमान कथिं जें झालें ॥ केवळ तुज मीं बघण्यासाठीं जिव धरुनी राहियलें देही ॥ १ ॥

दाक्षायणी—बाई, ती हकीगत फारच मोठी आहे ती तुझी कन्या तुला मग सावकास सांगेल. आतां तूं आम्हां सर्वांसमक्ष आपल्या पतीला भेट; त्यांचे मन तुजविषयीं आतां अगदीं निर्मल झालें आहे. याची साक्ष मी देतें.

सुदक्षिणा—(राजास) प्राणनाथ,

पद. चाल. आर्या तीच असे ही.

हतभागिनिला या अजवरि ही अंतरली सुखसंगती ॥ तरि आतां द्या पदरीं अंतरिं कोप न ठेवा

भूपती ॥ दैववान मी मोठी म्हणुनी निर्मल हें मन
जाहलें ॥ कलंक गेला मम याहुनि प्रिय होणें नच
मज राहिलें ॥ १ ॥

दिलीप—प्रिये,

साकी.

पतिव्रता तूं असतां मी तव छल उगाच केला ग ॥
पण आता तें मनिं नच आणी पाहे मज अनुरागें ॥
या अपराध्याते ॥ क्षमा पूर्ण करि प्रिय दयिते ॥१॥

पण प्रिये, आजपर्यंत तूं जिवंत होतींस तर होतीस कोठे ? किंवा निवर्तलीस तर पुनः सजीव कशी झालींस ? मी तर त्यावेळींच तुझा माझा कायमचा वियोग झाला असें समजत होतो.

दाक्षायणी—महाराज, या आपल्या शंकेचे समाधान मी करत्ये. राणींची न्यायसभेंत चौकशी चालली असता ती मूर्च्छींत पडली आणि तिला मीं आपल्या येथें आणून ठेवली. आणि आपणांस लटकेंच ती मेली असें सांगितलें. कारण त्या वेळीं आपण मिथ्या संशयानें पूर्ण घेरलें गेला होता तेव्हां तो जाण्याकरितां मला महाराजानां फसवणें भाग पडलें.

दिलीप—दाक्षायणीबाई, तुमचे उपकार मी कसें फेडावे.

लहानपणी मला खांद्यावर घेऊन तुम्ही वाढवलें. आणखी माझ्या चातुर्यानें मला मोहांतून काढून आज माझी प्रिया मला समर्पिली. तसेंच हे प्रधान वसुभूती, यांनीं सत्या-साठीं राजकृपेवर लाथ मारून आमच्या दोन्ही कुळांचें रक्षण केलें. (राणीस) प्रिये, या भद्रसेन भूपतीकडे अशी साशंक कां पहातेस. अगे हा माझा भाऊच आहे. मी चांडालानें व्यर्थ याविषयीं मिथ्या संशय घेतला. पण आतां त्याचा लेशही राहिला नाहीं. आणखी पहा. हा त्यांचा पुत्र माधव; याचें प्रेम आपल्या कन्येवर दैवानेंच जडवलें आहे; आतां हा आपला जामात होणार. तर चल आतां वाड्यांत आपण मोठ्या थाटानें यांचा लग्न समारंभ करून मग भाऊला परत जाण्याला परवानगी देऊं.

दाक्षायणी—आज कुलगुरूंच्या कृपेनेंच महाराजांनां हा आनंदाचा दिवस दिसला. आतां महाराजांची त्यापाशीं आणखी कोणती इच्छा राहिली आहे.

दिलीप—त्यांनीं सर्व मनोरथ सफल केलेच आहेत आतां आणखी कोणतें प्रिय होणे राहिले आहे ? तथापि त्यांच्या वरानें असें असो--

पद . चाल. धन्य तोंचिही.

प्रय वर्तन मत्सखिचें कामिनिनां होवो ॥ मजसम तत्पतिना नच मोह कधीं येवो ॥ध्रु॥ वसुभूती-सम सत्पथ आवडोचि सकलां ॥ या नृपसम हा वा त्या मित्र लाभ घडला ॥ विधिनिर्मों तुह्मासम ठिकठिकाणि अबला ॥ या योगें हा नृजन्म धन्य तेस पावो ॥ १ ॥

समाप्त.

ग्रंथकर्त्याची प्रार्थना.

पद. चाल. शंकरा पामरहानरही.

श्री रमणा ॥ शरणांगत भय हरणा सुरमुनिनुत चरणा ॥ धृ. ॥ प्रसन्न वदना पंकज नयना अहिवर शयना सुखसदना ॥ मुरमधु मथना अघसंहरणा विषवक् सेना जनार्दना ॥ तूं चुकवी माझ्या प्रभु जनना मरणा ॥ खग वहना ॥ १ ॥ मन्मथताता यादवनाथा वसुदेव सुता तवभजना ॥ लाविलि ही माति आतां सद्गति देई मजप्रति दयाघना ॥ ने त्वत्पदिं मजला दे निर्भय शरणा ॥ करि करुणा ॥ २ ॥ जशि सद्वनिता प्रिय या जगता तशि मत्कविता ही होवो ॥ तत्कीर्तीपरि या भुवनांतरि गाजुनिया खरि कीं राहो ॥ नच इच्छा दुसरी या अंतःकरणा ॥ सुदर्शना ॥ ३ ॥

समाप्त.

खोकला, दमा, गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु, वापरल्यानें बरे होतात हें जगत्प्रसिद्ध आहे **गळपट्टा**—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात. **लेखणी**--हातास कांपरें व स्मरण शक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभीत दिसणाऱ्या औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

विजेच्या वस्तुंची किंमत.

	कि. रु.	पि, पुतळीस रु, १।	धा, कब्यास रु. १॥
पितळी आंगठी.	१॥	चां, पुतळीस रु, २	धा, लेखणीस रु. १॥
चांदीचे आंगठी.	३	सो, पुतळीस रु. २२	रेश, गळपट्टा रु, १॥
सोन्याचे आंगठी.	२०	कमरपट्टा रु, ६	

सर्व इस्पितळामध्यें विजेचा प्रयोग रोग्यावर करितात. ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरे झाले आहेत ह्याबद्दल हजारो डॉक्टर साक्ष देतील.

जी. बी. नाईक आणि कंपनी.

पत्ता—मुंबई, भायखळा जुन्या दावणीसमोर;
पुणें, रविवार पेठ. घ. नं ६०.

लें पचूं लागतें. ज्यांस फार अभ्यास करावा लागतो किंवा फार वेळ लिहिण्यावाचण्याचें किंवा शिकविण्याचें काम करावें लागतें किंवा व्यापारधंद्याचे संबंधानें वारंवार हिंडण्याफिरण्याचे श्रम पडतात, किंवा फार वेळ एकाच ठिकाणीं बसून रहावें लागतें, त्या सर्व लोकांस **मेंदूची शक्ति तरतरीत राखून अंगांत तकवा व काम करण्यास हुशारी आणणारें व मनास उत्साह व आनंद देणारें फास्फरसाच्या गोळ्याप्रमाणें दुसरें स्वस्त औषधच नाहीं.** किंमत दर डबीस ८ आणे. एका डबींत १६ गोळ्या असतात.

अम्लपित्तावर फारच खात्रीचें चूर्ण.

जेवणानंतर कांहीं वेळानें घशांत जळजळणें, अन्न न पचणें, शौचास साफ न होणें, हे आम्लपित्ताचे आरंभीचे विकार होत. जसजसा रोग वाढतो तसतसे वांति, पोटशूळ वगैरे दुसरे विकार सुरू होतात. सदर्हू चूर्ण हे सर्व विकार दूर करितें. तें घेण्याचा क्रम डबीवर लिहिला आहे. एक डबी ६ दिवस पुरते किंमत दर डबीस ८ आणे.

तांबड्या धुपणीवर.

तांबडतोब गुण आणणारें औषध.

ह्यानें रक्ताची धुपणी (रक्तप्रदर) तीनच दिवसांत बंद होते. किंमत १२ आणे. टपालखर्च ६ पै.

रक्तमूळव्याधीवर गोळ्या.

मूळव्याधीपासून कितीही जरी रक्तस्राव होत असला तरी या गोळ्यांनीं ताबडतोब बंद होतो. किं० दर डबीस ८८ ट.८३

कोरड्या मूळव्याधीवर मलम व चूर्ण

या दोहोंचा उपयोग केल्यानें मूळव्याधीची आग, सूज, कळ व ठणका राहून कात्रे भरतात, व मोडांचा आकार कमी होतो. किं० प्रत्येकाच्या एका डबीस आठ आणे ट. खर्च ८५ आणे.

हिंवावर गोळ्या

चातुर्थिक असल्यास किं० ८१२ इतर प्रकारच्या हिंवास ८८ आण्याच्या गोळ्या बस होतात. यांचा गुण तर सर्वत्र प्रसिद्धच आहे, टपालखर्च दर डबीस ८१ आणा.

वज्रदंती किंवा दंतशोधनार्थ उत्तम पूड

ही नित्य दांतांस लावल्यानें दांतांची अशक्तता व तोंडाची दुर्गंधी नाहींशी होऊन हिरड्यांचा रक्तस्राव बंद होतो; व दांत बळकट होतात व त्याना कीड लागत नाहीं, किं० दर डबीस ६ आणे, ट, खर्च ५

पटकीवर फारच खातरीच्या गोळ्या,

आतिस्वस्त व गरीवांस फुकट

या गोळ्या नेहमीं संग्रहीं ठेवाव्या, त्या फार उपयोगी आ-

हेत, व निदान दोन वर्षेपर्यंत टिकतात, किं० दर डबीस ८८ बंगीखर्च ८॥ एक डबी एका रोप्यास पुरते.

कृमिहारक चूर्ण

यानें पोटांतील सर्व प्रकारचे कृमि नाहींसे होतात, एका डबींत १२—१३ इसमांस देण्यापुरतें औषध असतें, किं० दर डबीस ८८ आणे, ट, खर्च ८१

पुणें मेडिकल युनियन) डाक्टर गणेश कृष्ण गर्दे, एल्. एम्. आन्ड एस्.

जाहिरात.

खालील संगीत नाटकें आह्माकडे विक्रीस आहेत. सर्व घेतल्यास योग्य कमिशन देवू.

संगीत सौभद्र ॥।
संगीत शाकुंतल -॥।-
संगीत रामराज्यवियोग -॥।-
देवकृत.
सं. रामराज्य अंक ४।५ -।=
स्त्रीचरित्र अथवा

पाठारेकृत.
सं, संभाजी -॥।-
पाटणकरकृत,
सं, विक्रमशशिकला -॥-
सं, सत्यविजय -॥।-
सं, युवतीविजय -॥।-

त्याच्या मालकाडून काम सर्वोत्कृष्ट निघत असल्याबद्दल गि-ऱ्हाइकाकडुन सर्टीफिटे मिळत आहेत शिवाय आह्मी आपले छापण्याचे दर अगदीं माफक ठेवले आहेत तर एकवेळ अनुभव घेऊन आश्रय देण्याविषयीं देशबांधवास विनंति आहे.

जाहिरात.

विड्यांची वखार.

सर्व लोकांच्या सोयीसाठीं ही वखार आम्ही चैत्र शु. १ शके १८१७ पासून स्थापन केली असून येथें सर्व प्रकारच्या साध्या, कडक, मध्यम व सुवासिक अशा विड्या शहरांतील व परगांवांतील लोकांस फायदेशीर मिळतील अशी आम्ही व्यवस्था केली आहे. तर सर्वत्रांनीं आमच्या मालाचा अनुभव घेऊन आम्हांस उत्तेजन द्यावें. बाहेरगांवच्या लोकांस विड्या त्यानां जशा हव्या असतील तशा कळवाव्या म्हणजे आम्ही व्ही. पी. नें पाठवून देऊं.

पत्ता—श्रीधर गणेश वाडेकर.

म्यानेजर विजय प्रेस.

पत्ता—शुक्रवार पेठ घ. नं. ३६२.

जाहिरात.

लक्ष्मण भागू शेट पवार बुकसेलर यांचे दुकानीं मिळणारी पुस्तकें.

रतिकाळीं फारच आनंद देणारे व स्वप्नावस्था, मुष्टिमैथुनादि पुष्कळ विकारांनीं व आपोआप धातु व खर लघवीद्वारें जाऊन होणारी अशक्तता, क्षणांत रेतस्खलन, नपुंसकत्व येणें, इत्यादि विकार त्वरित नाहींसे करून वीर्यवृद्धि, स्तंभकता, शक्ति व बळकटी आणणारें हजारों औषधांस जिंकणारें, व हजारों लोकांस पसंत पडलेलें आशा ४० गोळ्यांच्या डबीस किं० १ रुपाया ट. ख. शिवाय. ३ डब्या मागविणारास टपालखर्च माफ.

एच. बी. कृत प्रसुतीमित्र.

हें स्वदेशी औषध स्त्री बाळंतीण झाल्यापासून तिसरें दिवशीं सुरू केल्यानें स्त्रियांना वायु पासून होणारे वायु दांतखिळ बसणें हातपाय दुखणें, सर्वांग चमकणें, आंग गळाठणें, भुक न लागणें, शौच्यास साफ न होणें वगैरे विकार त्वरित नाहींसे होऊन, मुलांस निरोगी दूध मिळून मुलें सुदृढ व निरोगी होतात. हें पुष्कळ दिवसांच्या अनुभवाचें व फारच गुणकारी असें औषध थोड्या खर्चांत मिळणें फारच दुर्मिळ असून बाळंतपणाच्या खर्चांत हा खर्च कांहींच नाहीं. सबब गरजु लोकांनीं मागवून आपल्या कुटंबाचा व लहान बच्याचा फायदा करून घेणें. दर

सात दिवसांचे बाटलीस किंमत रुपाया एक टपालखर्च शिवाय. माहितीपत्र सोबत.

पत्ता.

हरीपंत बारस्कर यांचें काष्ठौषधींचें दुकान तुळशी-बागेजवळ पुणें.

गोपाळ हरी बारस्कर.

जाहिरात.

आमचे दुकानी खाली लीहिल्या प्रमाणे पुस्तक विकत मिळतील,

इकडे लक्षद्या.

मे सन १८९५ अखेर

आमचे दुकानी खाली लीहीलेली निमे कीमतीने विकत मिळतील. की.

२ हाती मताई मोठी	१	।॥. शिवलीलाम्रृत पोथी	१
१ गुलबकावली मोठी	१	२ हरीविजय	१
१। हातीमताई लहान	१	२ रामविजय	१

.॥.	बेताळपंचविसी	१	२	गुरुचरित्र पोथी
१।	संसार चोपडी	०	१॥-	इंद्रजाल भाग १।२।३
१॥	जोतीष सार	१	-।=	वसंता विलास
१	नवरस गायन मोठें	१	-।-	डोहळ जेवण
.॥.	सहदेव भाडळी	१	-॥-	डीकस्नरी १
.॥.	भजनी मेळा भाग	१	-॥-	त्र्यंबकी वैद्यक १
.॥.	भजनी भारूड	१	१	औषधी चुटके १
१	सात बैठक	१	१	नविन नवनारीचरीत्र
.।=	पुराणांतील नकला भाग ६ प्रत्येकास		-।=	औषधी बटवा.
		१		अभीनळाचे चरित्र १
.।=	श्रावण कचेरी	१	०=	दंगा मुंबईचा १
.।=	पश्मीण कचेरी	१	-।-	दंग्याचे पवाडे
.॥.	मोडी पत्राचे मायने	१	-।=	संतमेळा
.॥.	सर्वोपयुक्त कथा	१	०≡	औरंगा वादी छबली
.।.	सिंवासन बत्तीसी	१	-।-	बऱ्हाणपुरी चमोली १

आमचा पत्ता पुणें पेठ कसबा येथें कांसारआळींत आगीन पिरासमोर घरनंबर ४४७ येथें रा० रा० दत्तु मारुती कांसार यांजकडे विकत मिळतील पत्ता स्वच्छ बाळबोध लिहावा.

सर्व्हेकडील सामान—साधारण लागणारे नकाशाचे कागद, रंग व स्केल पट्या व सर्व इतर सामान विकत मिळेल—

येणेंप्रमाणें सामान सर्व मंडळीस वेळच्यावेळीं मिळत नाहीं ह्मणून नवीन दुकान काढून सोय करून ठेविली आहे. परगांवीं मागविणें जाहल्यास पत्र पाठवावें ह्मणजे व्ह्यॉल्युपेबल करून पाठविण्यांत येईल.

लक्ष्मण मोरेश्वर ब्रह्मे दुकानदार.

पुणें पेठ बुधवार ड्राईंगचे दुकान.
